म.ग्रं.सं. ठाणे
विषय : काव्य
सं.क्र. : १०२८

REFBK-0003147
REFBK-0003147

ऐसें हे अवघेचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ।
असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवण भक्ती ॥

श्रीदासबोध.

3/10/2
३१०५ e2

# श्रीहरिहरेश्वरलीलामृत.

३७४० १०२e

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धी सर्वक्षेत्रेषु भारत ।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥

श्रीमद्भगवद्गीता.

सन १९१६.

किंमत ११ आणे.


०१०५ ८२

# शुद्धिपत्रक.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | ७ | करितस | करितसे |
| ६ | १५ | येये | येथें |
| ८ | ६ | का व्यासी | काव्यासी |
| १० | ५ | वाटली | वाढली |
| ११ | १५ | त्यजीली | त्यजिली |
| २१ | ५ | आयुष्याची | आयुष्याची हांव |
| २३ | २ | विच रती | विचरती |
| २४ | ८ | नवनवनाथादि | नवनाथादि |
| २८ | ११ | ठरलें | उरलें |
| २९ | १६ | मनन मने | मन्नमनें |
| ४० | ११ | सुहास्यवदन | मालाधरण |
| ४८ | ७ | करीत | करीन |
| ५६ | १४ | होता | होतां |
| ५६ | १५ | गजानान | गजानन |
| ५८ | ४ | पठा | पढा |

| | | | |
|---|---|---|---|
| ६३ | १० | नादो | नांदो |
| ७२ | ७ | गुणवर्णना | गुणवर्णनी |
| ७९ | ६ | करोनी | करानी |
| ७९ | १५ | अर्पणाधव | अपर्णाधव |
| ८० | ६ | योग्यांसी न | योग्यांसीच |
| ८० | १२ | माहर | माहेर |
| ९० | २ | लाण्यवती | लावण्यवती |
| ९१ | ३ | आत्मज्ञान | आत्मज्ञानियांत |
| ९४ | १७ | तेवां | तेव्हां |
| ११८ | ४ | प्रव्राजन | प्रजाजन |
| ११९ | ६ | मल्ला | पल्ला |
| ११९ | ८ | यतील क्षण | यातीलक्षण |
| १२८ | १ | शिवें ठेविलें | शिवें ठेविलें अर्धांगीं |
| १३० | ८ | भवनीश | भवानीश |
| १३१ | १३ | जगज्जीवनी | जगज्जननी |
| १३१ | १५ | उदरा | उदार |
| १३५ | १ | भतगण | भूतगण |
| १५० | ६ | कळसाशाध्यायीं | कळसाध्यायीं |
| १५५ | १२ | नमावें | न मावे |

REFBK-0003147
REFBK-0003147



श्रीकालभैरव-हरेश्वर.

3786

ॐश्रीशांतादुर्गायनमः

# श्रीगुरु देव दत्त दिगंबर अवधूत श्रीपाद श्रीवल्लभ नरसिंह सरस्वती अक्कल कोट निवासी राजाधिराज योगिराज सद्गुरू श्रीस्वामी समर्थ महाराज की जय.

## ॥ अध्याय १ ला ॥

श्रीगणेशायनमः आधीं नमूं श्रीकुलदेवता । शांता दुर्गा जगन्माता । श्रीमहालक्ष्मी विख्याता । गोमंतक ग्रामिची ॥ १ ॥ जियेचे योगावतार अनेक । श्रीसरस्वती स्वरूप कौतुक । जिचे स्मरणें दुःख शोक । पळे क्षण न लागतां ॥ २ ॥ जगदीश श्रीशंकर । भोळा चक्रवर्ती उदार । श्रीमांगिरीश नाम धर । प्रेमे सादर नमिला असे ॥ ३ ॥

ग्रंथारंभीं कुलदेवता स्मरण। करावें आराध्य देवतेचें पूजन। संत सज्जनां वंदन । तैसेचि माता पितरांसी ॥ ४ ॥ अक्कल कोट ग्राम सुंदर । तेथें प्रगटले सद्गुरुवर । श्रीस्वामी समर्थ शंकर । माझी आराध्य देवता ॥ ५ ॥ स्वामी समर्थ केवळ शंकर । कीं रमापती विष्णू निर्धार। ज्यांचिये स्मरणें मी पामर । संसारी जगलों आजवरी ॥ ६ ॥ हें दुस्तर भवचक्र । नवग्रह होतां वक्र । काम क्रोधादि नक्र । त्यांतूनि सोडविती श्रीगुरू ॥ ७ ॥ सद्गुरू कृपेचे सागर । आणि शांतीचें माहेर । सद्गुरूंचा महिमा थोर । मी पामर काय वर्णूं ॥ ८ ॥ आतां वंदूं ग्राम देवता । मुंबापुरी उद्योगरता । जिये पदावरी असंख्याता । लोक नांदती स्वानंदे ॥ ९ ॥ अहिल्या द्रौपदी सीता । पंचकन्यानमिल्याआतां । श्रीअनसुयाआत्रिकांता । श्रीदत्त-मातानमियेली ॥ १० ॥ स्मरतांकविश्रेष्ठव्यास । येईल काव्यस्फूर्तीस । ग्रंथलोकादरास । पात्र होईल झडकरी ॥ ॥११॥ मयूरादिकवीजन। तुकाराम रामदास संत सज्जन। त्यांचिया स्मरणें अधःपतन। संहार होईल निश्चयें ॥१२॥

काव्य ८२



मिराबाई आणि मुक्ता । संतिणीं थोर भक्ता । ज्यांनीं प्रेमाचा घेवोनि मक्ता । स्वानुभवें घेतला स्वानंद ॥ १३ ॥ जो एका जनार्दन । तोचि जनता जनार्दन । त्यासी करितों नमन । साष्टांगेसि प्रेमभरे ॥ १४ ॥ श्रीशिवलीलामृतादि ग्रंथ । रचूनि साधिला जनहितपंथ । ज्यानें सोडिला सर्व स्वार्थ । तो श्रीधर नमियेला ॥१५॥ श्रीमत् आद्य शंकराचार्य । आमुचे कुलगुरू आर्य । आत्मानंद सरस्वती गौडपादाचार्य । सादर तेही वंदिले ॥ १६ ॥ वत्स गौतमादी ऋषी । ज्यांनीं आराधिला पौरुषी । आदरेंवंदुनी सकलांसी । मार्ग क्रमण करितसे ॥१७॥ बालभक्त अगाध । ध्यातोहृदयीं प्रल्हाद । ज्यासाठीं श्री गोविंद । प्रगटला स्तंभी नृसिंहरूपें ॥ १८ ॥ ध्रुवाचें कोमल चरण । चुरितों चुकवाया मरण । अढळ पदाचिये धरण । जयें धरिलें भगवंती ॥ १९ ॥ श्रीकर चिलया विख्यात । भगवत्भक्त असंख्यात । स्मरणमात्रें सकल दुरित । दग्ध होई क्षण न लागतां ॥ २० ॥ ध्यातों हृदयीं श्रीरघुनाथ । मम जन्म दाता भाग्यवंत । मुंबा-

पुरस्थ सारस्वत । गीता भक्त प्रेमळ ॥ २१ ॥ तैसीच माझी जन्मदात्री । माता नामें सावित्री । तत्पद धरोनि गायत्री । प्रेमें स्तविली क्षणमात्र ॥ २२ ॥ पितयाचा बंधू चुलत । जयाचें नाम एकनाथ । ज्यानें मज दिधला गायत्रीमंत्र । मौंजी बंधन समयीं ॥ २३ ॥ तैसे चिकुलाचार्य दिनानाथ । देउलकर नामे कुलवंत । त्यांचिये स्मरण करोनी सुपंथ । मार्ग क्रमण करितस ॥ २४ ॥ देवा तूं ईश ईशान । मी केवल बाल अज्ञान । तव चरित्राचें कराया गान । ब्रह्मकुमरीही कुंठली ॥ २५ ॥ पुण्यथोडेसे मम गांठीसी । म्हणुनी उल्हास माझिये चित्तासी । क्षणमात्रगावया तव गुणासी । शक्ती देती श्रीगुरु ॥ २६ ॥ भगवत्सु प्रसाद । वाडवडिलांचे आशिर्वाद । माझिये मस्तकीं पडो प्रमोद । ग्रंथ सिद्ध व्हावया ॥ २७ ॥ श्रीगुरुनाथ तूं तारक । मी केवळ नाम धारक । मी अज्ञानी पामर अविवेक । स्फूर्ती दायक तूंचि स्वामी ॥ २८ ॥ तुझिया आज्ञेकरून । तुझेंचि करितों गुण गायन । कर्ता करविता निधान । तूंचि आम्हासी स्वामिराया ॥ २९ ॥ श्री शंकर

उमा रमण । गोविंद गोपाल नारायण । माधव मुकुंद मधु-
सूदन । नामें तुझीं अपार ॥ ३० ॥ सद्भक्तांसाठीं अव-
तार । धरुनि केले परोपकार । भक्ति ज्ञानाचें भांडार ।
अर्पिलें जगतासी ॥ ३१ ॥ आतां वंदू श्रीभगवद्गीता ।
जी सकल काव्याची माता । धर्म शास्त्राचें सार तत्वतां ।
वंदन तिजसी सदोदित ॥ ३२ ॥ संन्यास आणि कर्म योग ।
निवृत्ती प्रवृत्तीचे भाग । विस्तृत केले चांग । ज्या ग्रंथा
माझारी ॥ ३३ ॥ श्रीधर स्वामी कृत । प्रचंड श्री शिव-
लीला मृत । हरिलीला संत लीला मृत । वंदन करी तयासी
मी ॥ ३४ ॥ भगवंताची अनंत स्तोत्रें । भक्तें गायिलीं
पवित्रें । शिव स्तोत्र विष्णु स्तोत्रें । सूर्यस्तोत्र शनी महात्म्य
॥ ३५ ॥ दासबोध श्रीरामदासकृत । पवित्र श्रीहनुमान
स्तोत्र । ज्याचिया पठणें त्रिनेत्र । प्रसन्न होई झडकरी
॥ ३६ ॥ सदा ध्यातों श्रीगुरुचरित्र । आणि श्रीगुरु
लीलामृत । ज्यांमध्यें असे पुण्यचरित्र । मम आराध्य
देवतेचें ॥ ३७ ॥ स्तोत्र श्रीशांतेचें । असो सदा माझिये
वाचे । लघुस्तोत्र महालक्ष्मीचें । सदा व्हावें तत्पठण ॥ ३८ ॥

तुकाराम-वाणी अभंग । ज्ञानेश्वरी करी निसंग । नामदेव जहाला दंग । सद्गुरू भजनांत ॥ ३९ ॥ वंदू श्रीगीत गोविंद । रसाळ काव्य प्रेमानंद । शृंगार युक्त विनोद । जयदेव स्वामींचें ॥ ४० ॥ आर्या मयूराची । आर्यांस सुखवी साची । तैसीच केकावलींची । गोडी सेवा ॥४१॥ महाबली वामनपंडित । होवोनियां अभिमान गलित । अखंड गुरुसी सेवित । त्याचेंहि स्मरण करुंया ॥ ४२ ॥ रामजोशाची लावणी । सोहिऱ्याची धांवणी । आनंदाची पर्वणी । साधूं येथें ॥ ४३ ॥ गंगा यमुना सरस्वती । गोदावरी भागीरथी । भीमा चंद्रभागा सावित्री । नमितों सकल तीर्थांतें ॥ ४४ ॥ भगवन् क्षीरसागर । जयाचा जामात रमावर । तयासी माझा नमस्कार । तीर्थराज ज्या म्हणती ॥४५॥ तुह्मी श्रोते संत सज्जन । प्रेमळ पंडित चतुर गहन । तुमच्या पायीं माझें नमन । साष्टांगी सद्भावें॥४६॥ श्री हरिहर लीला कीर्तन । येथें असावें पूर्णावधान । मी बालक अज्ञान । म्हणोनि उपेक्षा न करावी ॥ ४७ ॥ शिशूचा कोमल कर । धरोनि शिक्षक चतुर । लिहवी

स्वहस्तें अक्षर । तेवीं शंकर लिहवीतसे ॥ ४८ ॥ श्रोते असा सावधान । बालपण केवल अज्ञान । निर्विषयी निर्विकार शून्य । व्यर्थ तेची जह्याले ॥ ४९ ॥ पुढें शैशव काल आला । मोठे खेळ खेळूं लागला । अचाट विटी दांडू खेळा । मन कांहीं विटेना ॥ ५० ॥ खो खो आणि आट्यापाट्या । बहुत जमविल्या गोट्या । हस्तीं घेवोनिया काठ्या । इतरासि हाणी अजाणतपणें ॥ ५१ ॥ शिशुपणी खेळ खेळे । पुढें आले तारुण्यचाळे । उष्ण रक्त हृदयीं उसळे । वाडवडीला मानीना ॥ ५२ ॥ देखतां युवती सुंदर । हृदय कामें थरथर । विवेकशून्य होवोनि अपार । अचाट कर्में करितसे ॥ ५३ ॥ ऐसें दुष्ट तरुणपण । आधींच या लाविजे वळण । हृदयीं सर्वदा नारायण । काम तयासी काय करी ॥ ५४ ॥ हा प्रल्हादाचा आशि- र्वाद । म्हणुनि सोडोनि दुःख खेद । मोह माया दुर्मद । सांडोनि भजन करावें ॥ ५५ ॥ पुढें येईल वृद्धपण । सर्व दुःखासि जें कारण । दुर्गंधी आणि घाण । देह विपरीत होईल ॥ ५६ ॥ देहा येतां दुर्बलता । मग कैसा

आठवील भगवंता । सांडोनिया सर्व अहंता । भजन करी आतांची ॥ ५७ ॥ असो देवा दयाघना । तुझिया मंगल गुण गाना । उदित होवोत माझिया भावना । श्रीपार्वती परमेश्वरा ॥ ५८ ॥ श्रीगजानना विघ्नेशा । मनमोहन पुराणपुरुषा । तुझ्या प्रसादें माझिया दुराशा । दग्ध होवोत तात्काली ॥ ५९ ॥ स्फूर्ती देई का व्यासी । तुझिये गुणगानासी । हेंचि मागणें हृषीकेशी । प्रसन्न होई दासासी ॥ ६० ॥ तुझी गावया पुण्य कथा । पुण्याशिर्वाद अक्षता । पडो माझिया माथा । सद्गुरुनाथा ज्ञानसिंधू ॥ ६१ ॥ तव गुण गान अती गोड । षड्रिपूंची चुकवील धाड । पुरवील मनींचे कोड । सत्य सत्य त्रिवाचा ॥ ६२ ॥ दासाची हांक ऐकली । श्रीस्वामि मूर्ती प्रगटली । हृदयाब्जीं उभी ठेली । गंभीर शब्द करितसे ॥ ६३ ॥ बाळा यशवंत होशिल । जरी सत्कार्य करशील । माझिये दासांची चाल । मीच झेली सर्वथा ॥ ६४ ॥ संकटीं माझे सद्भक्त । मजसी हांक मारित । मी धावोनि भगवंत । त्यांचे आर्त पुरवितों ॥ ६५ ॥

कोणी दुष्ट दुर्जन। माझिये भक्तां करितील छलन। त्यांचें करीन शासन। सुदर्शन दंडे करुनिया ॥ ६६ ॥ बाळा मी जे कां बोलेन। तें तूं झणीं करी लेखन। ऐसा गंभीर ध्वनी गर्जोन । हृदयांतरी बोलिला ॥ ६७ ॥ जेवि वर्षाव कालीं थाट। मेघांचा गंभीर गडगडाट। विजांचा क्वचित् लखलखाट। जन चमत्कार पहाती ॥ ६८ ॥ नभोदरांतुनी जलधार। कीं देवदयेची फुटली घागर। क्षेत्रज्ञासि तोषवी थोर। तैसेचि भक्त–मयूरांसी ॥ ६९ ॥ कीं स्वर्गाची कामधेनू साची। अभागी गळा पडोनि नाची। सीमा झाली सुदैवाची। दुर्दैव दग्ध जहालें ॥ ७० ॥ कीं दरिद्री जन्माचा। शोधूं पहातां शिपल्या कांचा। त्यासि सांपडे चिंतामणी साचा। तैसें मज जाहलें ॥ ७१ ॥ आधींच महाशब्द हौस। तयांत जेवीं फाल्गुन मास। तेवी मी अज्ञानी तामस। त्यांत कलिप्रस्थ अधर्माचे ॥७२॥ ऐसा मी अयोग्य अविवेक। देहधारी नामधारक। परी सद्गुरुनी शुभकारक। मजसी वर दिला प्रेमें ॥ ७३ ॥ गुरु प्रेमाची थोरवी। कोण जाणेल बरवी। असो गुरुजी लिह-

विती मत्करवीं । हें क्षेत्र महात्म्य ॥७४॥ नैमिष्यारण्यीं सूत । शौनकादिकां सांगत । धन्य ते श्रोतेसंत । धन्य सुकथा–मृतश्रवण ॥ ७५ ॥ ऋषी म्हणती सूता । तुझिया मुखें अनेक कथा । ऐकिल्या आम्ही श्रीगुरुनाथा । आवड बहु वाटली ॥ ७६ ॥ तरी सकल तीर्थ संयोग । ज्या क्षेत्रीं महाभाग । जहाला असेल अभंग । ते कथा-मृत पाजावें ॥७७॥ सूत म्हणें ऐका सज्जन । श्रीहरिहरेश्वर क्षेत्र प्रधान । एकशेंआठ तिर्थांचें वस्तीस्थान । जाणावे भाविक जनहो ॥ ७८ ॥ विधी हरी आणि हर । चवथी आदिमाया थोर । जे ठायी नांदती एकत्र । अत्यंत पवित्र स्थान तें ॥ ७९ ॥ तेचि कथा अत्यंत रसाळ । पुढें वदवील सद्गुरू दयाळ । श्रोते करुनि मन निर्मळ । सावचित परिसावे ॥८०॥ दीनवत्सला सद्गुरुनाथा । महाराज श्रीस्वामी समर्था । पुढिले अध्यायीं कथा । आपुली आपण वदावी ॥८१॥ श्रीहरिहरेश्वर लीलामृत । श्रीस्वामीसमर्थ सांगत । परिसोत प्रेमळ भाविक संत । प्रथमोध्याय गोड हा ॥ ८२ ॥ श्रीगुरुदेवदत्त.

कांड ८२

## अध्याय २ रा.

श्रीगणेशायनमः ॥ जयजयाजी गजवदना । त्रिपुरांतक-मनमोहना । तवचरणी करितां नमना । विघ्नें पळतील क्षणार्धें ॥ १ ॥ जय जय गणेशा गुणवंता । गोरक्षका गणनाथा सिद्धीबुद्धीचा दाता । सुख दायक सकळासीं ॥ २ ॥ महात्म्य श्रीहरिहरेश्वर । झडकरी लिहवी चतुर । सकल भारत नारी नर । प्रेमें गावोत तवगुण ॥ ३ ॥ ब्रह्मावतार श्रीपरशुराम । तेणें हारोनि क्षत्रिय तम । संपादुनी पृथ्वी उत्तम । अर्पिली सकल ब्राम्हणासी ॥ ४ ॥ ब्राह्मण म्हणती श्रीरामा । पृथ्वी दान दिलेंसी आम्हां । आतां सोडोनिया धामा । बाहेर व्हावें सत्वरी ॥ ५ ॥ जरी आपण न जाल । तरी दुष्ट जन तुज हांसतील । म्हणतील देवोनीया पृथ्वीफल । तिचें वैभव त्यजीना ॥ ६ ॥ ऐसे दूषण तुम्हासी । दुर्जन देतील हृषीकेशी । पृथ्वी सोडोनियां जासी । तरी उत्तम होईल ॥ ७ ॥ हांसोनिया श्रीहरी । म्हणी त्यजीली भूमी सत्वरी । करुनि धाम सागरीं । आरंभिली तपश्चर्या उत्तम ॥ ८ ॥

श्रीराम विश्वनायक । तेथेंचि केलें कौतुक । नवीन भूमी सात्विक । निर्माण केली चौसष्ट योजनें ॥ ९ ॥ नूतनजमीन निर्मिली । ती इष्ट वृक्ष फलें प्रसवली । बाग बगिचा सुंदर वेली । दुमदुमिली पक्षिस्वरें ॥ १० ॥ तये शांत स्थानीं । वास करिती चौसष्ट योगिनी अपर्णाध्वज कैलासाहुनी । ये स्थळीं प्रगटला भक्तकाजा ॥ ११ ॥ तेहतीस कोटी अमर । सर्व तीर्थांचा संभार । येस्थलीं शुद्ध विहार । करावया पातला ॥ १२ ॥ महावृक्षावरी वेली । प्रेमदाटें आलिंगिली । मदन बाणें विव्हळली । नरनारी पांथस्थ ॥ १३ ॥ जेवी कामी जन कायू । स्त्रीस स्पर्शें सुखदायू । तेवि पुष्पांचा सुगंध वायू । लता वेलीसि स्पर्शत ॥ १४ ॥ वृक्ष फलभारें लवत । कीं गृहस्थ शीलवंत । मान खालीं घालत । गुरु संतजनापुढें ॥ १५ ॥ जैसी खाण तैसी माती । येथिल खाणीं रत्नें चमकती । ऐशियापरी महेंद्रपर्वतीं । शोभती जैसी हिमालयीं ॥ १६ ॥ श्रीरामें रत्नयुक्त । निर्मिला हा महेंद्र पर्वत । म्हणीं केला शोभिवंत । बागाइत निर्मुनी

॥ १७ ॥ ऐशिया शांत स्थलीं । राहे क्षत्रिय निर्दली ।
नवलकथा जाहली । ती परिसा श्रोतेहो ॥ १८ ॥ श्री-
दत्तात्रेय महामुनी । अवचित पातले येस्थानी । ती
सुंदर मूर्ती पाहिली नयनी । भगवान परशुरामें ॥ १९ ॥
धन्य तयाचें जीवित । जयानें देखिला अवधूत । जयाच्या
माथां शोभत । पिंगटजटा तेजस्वी ॥ २० ॥ स्वरूप
अत्यंत सुंदर । वर्णवूं न शकती सुरवर । सिद्ध चारण
गंधर्व किन्नर । शेषादिक बुधजन ॥ २१ ॥ ऐसा सद्-
गुरू योगिश्वर । पाहुनी परशुरामें सत्वर । घातला साष्टांग
नमस्कार । हृदयीं अष्ट भावें दाटिला ॥ २२ ॥ जो
सकल अवाप्त काम । जयाचिया स्मरणें शांतिधाम ।
जयाचिया भजनें सकाम । निष्काम होती तात्काली ॥२३॥
उच्चारितां श्रीगुरुदेवदत्त । दग्ध होई सकल दुरित । जन्म
जन्मीचे वैरी आप्त । दास होतील तात्कालीं ॥ २४ ॥
निराकार निर्गुण । भक्तांकारणें सगुण । त्रिगुणातीत
असून । त्रिगुणात्मक जहाला ॥ २५ ॥ शांती आणि
ज्ञान । जयाच्या पादुका दोन । पूर्णावतारी अत्रिनंदन ।

पूर्णानंद आत्मरूप ॥ २६ ॥ जो सिद्धि बुद्धीचा दाता । अज्ञान मोह संहारिता । तयासी होय नमस्कारिता । श्रीपरशुराम भार्गव ॥ २७ ॥ नमन करुनी साष्टांगी । आलिंगिलें प्रेमरंगी । आसनीं बैसविला महायोगी । पूजा केली षोडशोपचारें ॥ २८ ॥ दिक्षागुरू भार्गवराम । तेणें पूजिला अनंत धाम । जनांचें व्हावया क्षेम । केवल निष्काम बुद्धीनें ॥ २९ ॥ सुखासनीं बैसविला । जो तेजें दिपवी सूर्याला । तो श्रीदत्त बोलता जाहला । परशुरामासि सप्रेमें ॥ ३० ॥ अहो हे विश्व विलक्षण । जेवीं सागरीं तरंगण । तेवीं शोभे विचक्षण । नानाप्रकारच्या आभासें ॥ ३१ ॥ पूर्णब्रह्म एकरूप । माया मोहें रूपारूप । लहान मोठें भेद अमूप । भ्रमविती सकल जनांसी ॥ ३२ ॥ सत्य केवल एक आत्मा । असत्य सकल रूपनामा । माया लीलें परब्रह्मा । बहुविध भासतसे ॥ ३३ ॥ जेवीं उदकाची उसळ । शांत होतांचि सकल । बुडबुड्यांचें सर्व बल । नष्ट होतसें तात्काली ॥ ३४ ॥ तेवीं शांत होतां मन । आत्मा आत्म्यांतच

रममाण । आत्म स्वरूपीं होतो लीन । विश्वविकार त्यजोनी
॥३५॥ जो सर्वार्थी सिद्ध जहाला । तो दारिद्रबलांतुनीं सुटला
जो आत्मरूपीं निमग्न झाला । त्याचा तुटला माया जाल
॥ ३६ ॥ अरे भार्गवराम । तूं साक्षात परब्रह्म । तूं पवित्र
अत्यंत सूक्ष्म । भक्तकाम कल्पद्रुम तूं ॥ ३७ ॥ तुझिया
स्वरूपीं सावमेय। या ब्रम्हांडांचा लय । तूंचि सुखाचें आलय ।
तूंचि महान सर्वांहुनी ॥ ३८ ॥ रूप आणि निवास स्थान
याची अपेक्षा महान । जो तूं निर्विकार निर्गुण । त्यां तुज
कां व्हावी ॥ ३९ ॥ भक्तजन-संकट पैलपार । उतरावया
सकल भूमिभार । तूं धरिसी नानावतार । येरव्ही निराकार
तूं अससी ॥ ४० ॥ हांसोनि उत्तरे भार्गव । हे दयाधन
गुरुदेव । भक्तांचा रक्षिण्यां भाव । तूं क्रीडसी स्वच्छंदें
॥ ४१ ॥ विश्वरूप दयानिधी । तूंचि हरि-हर-विधी ।
तूं कारुण्य प्रेम जलधी । तूं परंज्योती परमात्मा ॥ ४२ ॥
आनंद बीजा पासून । पहिलें उद्भवलें जग जाण । अणु-
रेणू मुळींहुन । सर्वी आनंदि आनंद ॥ ४३ ॥ ऐसें हें
ब्रह्मांड पहिलें । पुढें अज्ञान चिखलीं रुतलें । अनंत रूपीं

सांवरिलें । प्रेमें पोशिलें सर्वकाळ ॥ ४४ ॥ विवेक तुझा दूत । शांतीरूप तवनेत्र । तुज सम महात्मा पवित्र । कां श्रमत लोकहिता ॥ ४५ ॥ तरी हे भक्तानंद लहरी । येथेंचि रहावे श्रीहरी । जय जय भक्तसंकट वारी । अनुग्रह व्हावा दासासी ॥ ४६ ॥ येथुनि दहा योजनावर । महान क्षेत्र श्रीहरिहर । ज्या स्थानीचे नारीनर । सुखी असोत सर्वदा ॥ ४७ ॥ आधि व्याधी संसार दुःख । यांचा येथें नसावा धाक । लोक असावे तव भजक । पूर्ण विवेकी अंतरीं ॥ ४८ ॥ आपुला संचार सर्वत्र । तरी पावन करावें क्षेत्र । आपुली वास-लीला मात्र । अलंकृत होईल योगियांसी ॥ ४९ ॥ ऐकुनी रामाची प्रार्थना । श्रीदत्त सुहास्य वदना । जो आत्मस्वरूप लीना । तेथेंचि जहाला कल्पवृक्ष ॥ ५० ॥ ते दोघेही गुणनिधान । जेथें पावले अंतर्धान । तयांचे अस्तित्व अद्यापि जाण । भाविकां भेटतील निश्चयें ॥५१॥ त्या पुण्य कालापासुन । आज मिती साक्षात दर्शन । श्रीदत्त राजीवलोचन । पूजिती महेंद्रपर्वती ॥ ५२ ॥ जयांच्या दर्शनेंच । नष्ट होईल

दुर्दैवनाच । अज्ञान तमाची काळी कांच । फुटोनि जाईल जाणपां ॥ ५३ ॥ नामें चित्त पावन । प्रख्यात झालें क्षेत्र गहन । लक्ष्मीसह श्रीनारायण । वासकरी हरिहर क्षेत्री ॥ ५४ ॥ सोडोनि कैलास सुंदर । श्रीअपर्णाहृदयाब्ज भ्रमर । गिरिजेसह वसे थोर । ये स्थळीं जगद्गुरु जगदात्मा ॥ ५५ ॥ सावित्रीसह ब्रह्मदेव । चौसष्ट योगिनीसह गुरु-देव । श्रीहरिहर क्षेत्रीं वास्तव । केलें तेहतीस कोटी देवांनीं ॥ ५६ ॥ असंख्यात तीर्थें पावन । क्षणांत होतीं करितां स्नान । श्रीशुक्रतीर्थीं स्नान दान । मुख्य फल जाणिजे ॥ ५७ ॥ पश्चिमाभिमुख हरिहर । एकरूपें पश्चिम समुद्र । तीरीं वसती लोकाचार । शुद्ध व्हावया अज्ञजन ॥ ५८ ॥ एक वसे पर्वतरूपें । दुजा शोभे लिंग-रूपें । नाश करी त्रिविधतापें । पुरवित सकल कामना ॥ ५९ ॥ याची सेवा सुरासुर । करिती सकल नारीनर । याचा महिमा अनंत थोर । नामहि अनंत जयाचें ॥ ६० ॥ ब्रह्मा विष्णू महेश । त्रयमूर्तींचा एकत्र वास । शुक्रतीर्थ पापनाश । ऐसें महान क्षेत्र हें ॥ ६१ ॥ हरिहर क्षेत्राच्या

दक्षिणेस । गोकर्ण नामें क्षेत्र सुरस । गोकर्णचे उत्तरेस । दुर्गादेवी स्थानपैं ॥ ६२ ॥ तयाचे उत्तरेस पंचनदी । तिये तिरीं प्रेमानंदी । श्रीसप्तेश्वर नांदी । भक्त रक्षक पुराण पुरुष ॥ ६३ ॥ पुढें सागरांत कुनकेश । जेथें रंगांचे तीन प्रकाश । दृष्टीस पडती भक्तांस । पांढरा-लाल आणि पिंवळा ॥ ६४ ॥ तयाच्या उत्तरे गणेशान । तयाचें बहुत महिमान । सर्व सिद्धि होती पावन । सद्भ-क्तांसी निश्चयें ॥ ६५ ॥ त्याच्या उत्तरेसि सोमनाथ । पार्वती सह वसे शांत । आजमितीस यात्रोत्सवांत । सुप त्र बिल्व येती तेथें ॥ ६६ ॥ पुढें श्रीसंगमेशान । तो देई परमार्थ साधन । । जवळ कराडेशस्थान । असेश्री महेशा-चें ॥ ६७ ॥ जी मुक्तीलाभद । ती श्री गंगा सुखद । ये ठाईं तिचा नाद । श्रीदर्शनासी प्राप्त होई ॥ ६८ ॥ दाल्भे शनामें क्षेत्र । पुढें असे पवित्र । जो करी दारिद्र सत्र । केवळ दर्शनमात्रेंची ॥ ६९ ॥ पुढें श्रीव्याघ्रेश्वर । भक्त संकटांचा करी चूर । कामना संपूर्ण करी सर्व । तात्काळ मोक्ष भक्तीनें ॥ ७० ॥ दक्षिण भागीं अनेक ।

शिव स्थानांचा लौकिक । पार्वती सह मदनांतक । अनेक स्थळीं नांदतसे ॥ ७१ ॥ उत्तरभागीं श्रीमान । जीवनेश्वराचें स्थान । गूढ रूपें लोक पालन । जीवन देई जगतासी ॥ ७२ ॥ जीवनेश्वराच्या उत्तरेस । श्रीदीपराज कुसुमेश । तोडी सकल भवपाश । संसारिका प्राप्तसुखशांतीं ॥ ७३ ॥ तयाचे उत्तरे अमृ· तेश्वर । नांवासारखी करणी थोर । ज्याच्या सुगंधें इंद्रादि सुर । देवता सकल तृप्त होती ॥ ७४ ॥ जयाचें घेतां दिव्यनाम । पातकीहि पावती धर्म काम । श्रीवैजनाथ पुण्यधाम । वसे उत्तरेस अमृतेशाच्या ॥ ७५ ॥ पुढें च्यवन ऋषींचा रामेश्वर । आणि दुसरा कनकेश्वर । ज्या- चिया सांनिध्यें पुण्य अपार । सुखभोग प्राप्त होती ॥७६॥ पुढें क्षेत्र निर्मल । तेथिचें सेवितां तीर्थजल । धुवोनि जाई संसार मल । पावन होतील मुमुक्षु ॥ ७७ ॥ पुढें वैतरणी नदी । मिळे पश्चिमाब्धी । यमयातनांची गादी । भस्म करितें स्नानमात्रें ॥ ७८ ॥ ऐसें सकल तीर्थ महि- मान । सद्गुरु अवधूत निरंजन । भार्गवमुखें निरूपण ।

ऐकुनि तुष्ट जाहले ॥ ७९ ॥ दोघेही एकरूप । लौकीकी वागती द्वयरूप । तीर्थांचें महिमान अमूप । परस्परें श्रवण करिताती ॥ ८० ॥ जयाच्या पदीं सकल तीर्थें । वसतीं प्रेमें परमार्थें । जयाच्या ध्यानें पुरुषार्थें । प्राप्त होती चारही ॥ ८१ ॥ श्रीस्वामी समर्थ जगद्गुरू । जो तीर्थासही तारू । दुष्ट दानव नाश करूं । जगदानंद कंद जो ॥ ८२ ॥ जो मायाचक्र चालक । अनंतकोटी ब्रह्मांडनायक । ज्ञान आणि विवेक । ज्याचिया स्मरणें प्राप्त होती ॥ ८३ ॥ विधी हरिहर । एकरूप बनला नर । सगुणरूप सुंदर । बाळवेषी संन्यासी ॥ ८४ ॥ जय श्रीअनसुयात्मज । अनामातीत अधोक्षज । कामादि षड्रिपूंचा माज । स्मरणमात्रें निवारी ॥ ८५ ॥ त्यासि सांगे जामदग्न्य । सकल तीर्थांचें महिमान । प्रेमें ऐके आनंदघन । तेंचि पुढें वर्णिलें ॥ ८६ ॥ तीर्थांमाजी शुक्रतीर्थ । परम श्रेष्ठ पवित्र । ज्याचिया स्पर्शनें मात्र । पापें सकल संहारिती ॥ ८७ ॥ येथें सर्व साधन । अर्धक्षण जपध्यान । कोटिगुण प्राप्तपुण्य । हें महिमान जयाचें

॥ ८८ ॥ शुक्रतीर्थाच्या दर्शनें । श्रीहरिहराच्या प्रसादानें वाढतील अल्पपुण्यें । सुखी होईल मानव ॥ ८९ ॥ हा हरिहर पुण्यसंगम । देई सर्वांसि आनंद धाम । स्मृतिशास्त्र पुराण नियम । ऐसाचि निर्णय काढिती ॥ ९० ॥ जो घेईल हरिहर नांव । तयाची तारील संसार नांव । सकल आयुष्याची निवारील श्रीहरिहर ॥ ९१ ॥ जरी असेल दीन किंकर । परम पतीत दुराचार । एकदांचि उच्चारी श्रीहरिहर । पावन होईल सत्य जाणा ॥ ९२ ॥ जें गूढ परब्रह्म । जें वेदांसही अगम्य । जें एकमेवा द्वितीयम् । तेंचि हरिहर-लिंग ॥ ९३ ॥ जयाचे अपरिमित गुण । बोलवूं न शकती वाग्बाण । जो लक्ष्मीच्या फलासि कारण । बीज अक्षर ब्रह्मांचें ॥ ९४ ॥ ऐसा जो कृपाब्धी । तयासी नमावें यथाविधी । मग तो श्रीहरिहरविधी । आनंदवी प्रसाद लाभें ॥ ९५ ॥ हरिहराची उत्तम सेवा । हाचि सर्व शास्त्रांचा मेवा । नाश करील सकल दुर्दैवा । सत्य सत्य त्रिवाचा ॥ ९६ ॥ जरी असेल ज्ञान हीन । भक्ती हीन कला हीन । परी घेतां नित्य दर्शन । पुण्य संचय

अगाध ॥ ९७ ॥ मन करुनी निर्मल । आनंदें भजावा जाश्वनील । जयाचें चिंतन करितां बल । प्राप्त होईल अपरिमित ॥ ९८ ॥ संसार सागर दुर्धर । नाना आपत्ती दुःख अपार । यांतूनि सोडवील श्रीहरिहर । प्रेमभावें चिंतितांची ॥९९॥ जय श्रीहरिहरेश्वर । तुझिया स्वरूपाची स्मृतिधार । परमपदाचें दर्शन देणार । संसारत्रस्त मानवांसी ॥ १०० ॥ श्रीहरिहर गुण महिमा । श्रवण करितां सप्रेमा । मग काय उणें मुक्तिधामा । श्रवणें सार्थक सर्वही ॥ १०१ ॥ जगद्गुरू जगदीश्वर । स्वामी समर्थ हरिहरेश्वर । सिद्धारूढ सिद्धेश्वर । सुखकारी भक्तांसी॥१०२॥ श्रीदर्शन जो घेई । तयासी पावे जगन्माई । सकल जन्म सार्थक होई । हृदयीं धरितां शुद्ध भक्ती ॥ १०३ ॥ जामदग्नें गुरुमावलीसी । कथिला महिमा प्रेमेसी । आमुच्या सुदैवें आम्हांसी । प्राप्त झाला वाटतें ॥ १०४ ॥ श्रीगुरुकृपा सागर । निवारण्या आमुचा भयागर । ऐकती सकल तीर्थाचार । आमुच्यासाठीं भगवंत ॥ १०५ ॥ धन्य धन्य अत्रीसुत । केवल वय वर्षें सात । असतां घेती सन्यास

विश्रुत । जाहलें असें गुरुचरित्रीं ॥ १०६ ॥ केवल परोप-
कारार्थ । विचारिती श्रीस्वामी समर्थ । सद्भक्तांसी चारी
अर्थ । देती क्षण न लागतां ॥ १०७ ॥ जयाच्या हृदयीं
श्रीगुरुनाथ । तयासी काय न्यून पदार्थ । असो
श्रीहरिहरेश महा तीर्थ । यात्रा करावी भक्त
जनीं ॥१०८॥ सद्गुरूंची दासीं बहु प्रीती । अद्यापी दर्शन
देती । ऐशी अवलोकिली गुणख्याती । जगद्गुरू मायेची
॥१०९॥ जयासी जाहलें गुरुदर्शन । तो तीर्थांसही करी
पावन । तयाच्या पादुकांची धूळसान । तरी पडो मम
मस्तकीं ॥११०॥ श्रीगुरु मायेचें कौतुक । अगम्य अपार
सविवेक । प्रेमें भजावा त्रिपुरांतक । संसार खेळ त्यजोनीं
॥१११॥ प्रऱ्हादें सांगितली खूण । त्याची होतसे आठ-
वण । बालभावासी नारायण । संतुष्ट असे सर्वदा
॥११२॥ बालकांचें मन । अत्यंत कोमल पवित्र जाण ।
तैसेंची रहावें मन्मन । हेंचि मागणें समर्थासी ॥११३॥
बालकांचें निर्विकारी मन । तोषवी मातापितयासी पूर्ण ।
तैसा बालभाव सज्जन । प्रिय होय ईश्वरासी ॥११४॥

सदा मधुर बालभाव । परी निष्ठुर कालभाव । देहाभिमानादि दाव । साधी कैसा पहाहो ॥११५॥ असो बालांतःकरण । त्याहींवरी श्रीहरिहर स्मरण । जैसा आम्ररस गोड पूर्ण । शर्करा पडतां अधिकची ॥११६॥ बालपणापासुनीं । असावें श्रीधर स्मरणी । मग तो दयाळू चक्रपाणी । पार करील भवाब्धी ॥११७॥ जो त्रयमूर्ती त्रिगुणात्मक । तया माझी आणभाक । नवनीत गोड ताक । देई भक्तीचें॥११८॥श्री दत्तावधूत दिगंबर । जयाचे नव नवनाथादि अवतार । तयासि माझा नमस्कार । अष्टभावें साष्टांगीं ॥ ११९ ॥ श्री हरिहरेशाचे पश्चिमेस । वापी तीर्थ करी वास । सज्जनासी देई मुक्ती पायस । पावन करी महापतित ॥ १२० ॥ जयासी लौकिक पारलौकिक । मिळवावयाचें असेल सुख । त्यानें सांडूनि संशय दुःख । श्री हरिहर स्मरावा ॥ १२१ ॥ सूत सांगे शौनिका । अद्भुत रम्य कथानका । ज्यावरि श्रद्धा बसुनि देखा । तरले पतित असंख्यात ॥ १२२ ॥ हा श्री हरिहर कोण । भूमीवरी तीर्थ गहन । प्रगटलें कैसें महिमान । श्रोतीं

सावधान ऐकावें ॥१२३॥ वसिष्ठ सांगे दिलीपासी। एकदां लोह पर्वतवासी। षण्मुख श्री कार्तिकासी। अगस्ती प्रश्न विचारिती ॥ १२४ ॥ विघ्नेश बंधू षण्मुख स्वामी। सदा वसे महाकपाट धामी। केवल तपश्चर्या प्रेमी। दुजें कांहीं न जाणें ॥ १२५ ॥ महाक्रूर तारकासुर। तयाचा जेणें केला चूर। स्त्रियांसी ज्याचें दर्शन दूर। शिव-कुमार महायोगी ॥ १२६ ॥ पूर्वी विंध्यपर्वत वाढला। सर्व सुरगण घाबरला। अगस्तीमुनीसी शरण गेला। प्रार्थना केली ऋषीची ॥ १२७ ॥ आपुल्या योगमाये-करुन। विंध्याद्रिचें सस्तंभन। त्यासि केला ठेंगण। पुढें जाती दक्षिणादिशे ॥ १२८ ॥ संगें लोपामुद्रा सुंदरी। पतीच दैवत मानणारी। विदुषी आर्या प्रवास करी। निरंतर पतिसमागमें ॥ १२९ ॥ लोपामुद्रा सती चतुर। तिणें याचि पर्वतावर। धर्म विषय सिद्धांत थोर। निश्चित केले पतिसवें ॥ १३० ॥ जैसी शिव आणि पार्वती। तैसी या जोडप्याची ख्याती। षडानन स्वामी देखती। पर्वतीं संचार करितांना ॥१३१॥ सप्रेमें करुनी साष्टांग नमन।

तयांसि आश्रमीं नेऊन । षोडशोपचारें करून। पूजा केली स्वामींनी ॥ १३२ ॥ अगस्तीमुनी पुण्यवंत । परी काशीविरहें कष्टी बहुत । प्रश्न करिती स्वामी प्रत । क्षेत्र दाखवा उत्तम ॥ १३३ ॥ अहो श्रीगौरीप्रिया । शिव- नंदना कार्तिकेया । आनंद थोर मना माझिया । आपुलें दर्शन जाहलें ॥ १३४ ॥ तरी जैसें आनंद कानन । शिव शक्ती वसती दयाघन । तद्वत क्षेत्र दावुन । पावन मज करावें ॥१३५॥मग बोले शिव कुमर । समुद्रकांठीं श्रीहरिहरेश्वर । काशीसम श्रेष्ठ क्षेत्र । तयाची ऐकिजे पूर्व पिठिका ॥१३६॥ पूर्वी पाद्म कल्पांत । महाबल नामें थोर दैत्य । पराक्रमी जेवीं कृतांत । जयाचा बंधु अतीबळ नामें ॥१३७॥ या बंधु द्वयानीं । पादाक्रांत केली मेदिनी । सुरसैन्य युद्धीं जिंकुनीं । सकल घातलें बंदींत ॥ १३८ ॥ तेव्हां ब्रम्हा- हरी ईश । यांची प्रार्थना करी सुरेश । अती बलासि लाविला यम पाश । त्रिमुर्तीनीं रणामधीं ॥ १३९ ॥ मग सुर दळें वृष्टीं करुन । दैत्य दळ केलें तात्काळ चूर्ण । महाबल दैत्य धावून । आला झणीं त्रिमुर्ती वरी ॥ १४० ॥

ना. ........

क्रोधाविष्ट जाहला फार । न टिकती सुरसंभार । मग त्रिमूर्तीनीं माया थोर। स्मरिली सुयश मिळावया ॥ १४१॥ जय जगन्माये जगत्कारण । करितों तुजसी वंदन । निर्गुण जाहला गुणवान । तुझिया सत्ते जगदंबें ॥ १४२ ॥ तो अभेद रूप परमात्मा । पावला भेदरूप नामा । तूंचि प्रकृती सकल कामा । परमानंद प्राप्ती देशी तूं ॥ १४३ ॥ महामाये विश्वपालिनी । अनंत ब्रम्हांडाची स्वामिनी । शास्त्रासि अगोचर मोहिनी । तूं वाचेच्याहि पलिकडे॥ १४४॥ तुझें करितां सदा स्मरण । तुटे सकल भवभय मरण । सर्व संकटें निर्वाण । निवारिसी हे शांते ॥ १४५ ॥ जय दुर्गे जयकाली । महालक्ष्मी भक्त वाली । जय जोगेश्वरी प्रेमवल्ली । जय म्हाळसे सरस्वती ॥ १४६ ॥ ऐशी स्तुति ऐकुनी । संतुष्ट जाहली मोहिनी । महाबलासी मोह पाडुनी। काय वदविलें ऐकपां ॥ १४७ ॥ हो सकल सुरवर । मी प्रसन्न तुम्हांवर । कांहीं मागावा वर । पूर्ण सत्वर करीन मी ॥ १४८ ॥ ब्रह्मादि देव आनंदले । मनीं म्हणती झाले भले । प्रगट म्हणती महाबळें । मृत्यु पावे आमुचे

हातें ॥ १४९ ॥ महाबल असामान्य । म्हणे मीं धन्य धन्य । माझा प्राण घ्यावया अन्य । नसे कोणी याजगीं ॥ १५० ॥ तुम्हीं सर्व श्रेष्ठ सुर । मजसी याचितां वर । माझा वध दुष्कर । तरी अर्पितों तुह्मांतें ॥ १५१ ॥ धन्य धन्य तो जगीं । ज्यासि याचिती महायोगी । ऐसे असावें सुकृत अंगीं । तरीच जन्म साफल्य ॥ १५२ ॥ कमलपत्रीं जलबिंदु चमके । तैसें आयुष्य चंचल ऐके । जयीं यश बुडविलें दुर्लौकिकें । भार तयाचा भूमीसी ॥ १५३॥ बाळपणींच मरण यावें।अथवा गर्भपातही व्हावें।कीटकयोनींत जन्मावें । परी यशोहीन जन्म नको ॥ १५४ ॥ अहो मी सकल भोग भोगिले । आतां कांहीं न ठरलें । सुर वर सकल शरण आले । धन्य भाग्यशाली मीं ॥१५५॥ ऐसा तो दुराभिमानी । सगर्व वदे मान तुकवोनी । भस्मासुरासिजेवीं मोहिनी । आपुल्या पणेचि संहारी ॥ १५६ ॥ कोण कोणासी मारी । आपुलेचि आपण संहारी । आपण आपुलाचि वैरी । मित्रही आपुला आपण ॥ १५७ ॥ शिवलीलामृतीं कथा गोड । मारूनी भस्मासुर द्वाड ।

मोहिनी पुरवी सुरांचे कोड । तैसेचि येथें जाहलें ॥१५८॥ देवीनें मारिला राक्षस । महाबल दुष्ट तामस । म्हणें सकल सुर माझे दास । मी भस्म केली तद्यशो मंदिरें ॥ १५९ ॥ श्वासहीन केले विषनाग । दिगंती पळविले ब्राह्मण चांग । ऐशिया मदें तो भुजंग । हांकारी सकल सुरासी ॥ १६० ॥ म्हणें याहो सुरजन । तुम्हा पुढें माझी मान । करा देहाचें कंदन । मुक्ती द्या मजप्रती ॥ १६१ ॥ ऐसें वदुनी महाबळी । पृथ्वीवर टाकी देहबळी । मग वक्षावरी बैसला वन-माळी । एक क्षण नलागतां ॥ १६२ ॥ पोटऱ्यावरी बैसे ब्रम्हा । सदाशिव मस्तकीं उत्तमा । वरंबूही असुरो-त्तमा । प्रसन्न आम्ही तुजवरी ॥ १६३ ॥ महाबळ वदे देवाधिदेवा । तुम्हींच कारण विश्वोद्भवा । तुम्ही संहारितां जीवा । पालन हि करितां प्रेमानें ॥ १६४ ॥ आपुल्या कृपा कटाक्षानें । रक्षित सा भक्त जीवनें । तुम्हा सि असोत मनन मने । त्रिकाळीं जोडोनि हस्तद्वय ॥ ॥ १६५ ॥ तुम्हांसी जे भेददावित । तयांच्या सुखाचा

होत अंत । ब्रम्हा विष्णु प्रमथादिनाथ । एक रूपत्रय मूर्ती ॥ १६६ ॥ जयाची शक्ती त्रिविध । ज्यामुळें त्रिविध भेद । ज्याचिया अंगें प्रगटले वेद । त्यासि माझा नमस्कार ॥ १६७ ॥ जयाची करितां पूजा । पुरवी सकल संसारचोजा । अखंडीत उभा भक्त काजा । त्यासि माझा नमस्कार ॥ १६८ ॥ जयाचें अत्यंत कोमलचरण । स्पर्शतांचि चुके जन्ममरण । पद्मालंकित ज्याचें अंतःकरण । त्यासि माझा नमस्कार ॥ १६९ ॥ सत्वरज आणितम । मायायोगें घेतला जन्म । अनसुया सतीचा पुत्रोत्तम । त्यासि माझा नमस्कार ॥ १७० ॥ अनंतनामें धरोनि । जयें आच्छादिली धरणी । चंद्र सूर्य ज्याचे नेत्र दोनी । त्यासि माझा नमस्कार ॥ १७१ ॥ जो असे सर्व समर्थ । जेणें जोडे स्वार्थ परार्थ । सिद्धेश्वर सिद्धनाथ । तयासि माझा नमस्कार ॥ १७२ ॥ हीं पांच शब्दांची फुलपांकळी । सद्गुरू पदीं वाहिलीं । वाचितां स्तवितां निस्तरे कली । सत्य सत्य निश्चयें ॥ १७३ ॥ महाबली म्हणें त्रिमूर्ती । माझी व्हावी अखंड कीर्ती । एतदर्थ मद्देहा-

वरती । बैसोनिया रहावें ॥ १७४ ॥ मी उच्चारिलें तंव स्तोत्र । जो वाचेल ऐकेल सावचित्त । तयाचें इह आणी परत्र । कल्याण करावें दयाळा ॥१७५॥ माझी हीच प्रार्थना । सौख्य व्हावें साधूजना । तव मधुर यश गाना । खंड नसावा कल्पांतीं ॥१७६॥ स्कंद सांगे अगस्तीसी। महाबलाच्या स्तुतीसी । ब्रम्हा शिव हृषीकेशी । प्रसन्न होवोनी राहती ॥१७७॥ तथास्तु म्हणुनि भगवन् । तया देती वरदान । तुझी प्रार्थना होईल पूर्ण । लिंगरूपें राहील तव देह ॥१७८॥ महाबलेश्वर नामें प्रसिद्ध। तुझिया स्मरणें सर्व साध्य । भक्तांचे पाप होईल दग्ध । तुजसी नमन केलिया ।।१७९।। जे भक्त करिती तव पुजा। त्यांच्या रक्षीन सकल लाजा । सकल शत्रू ताप माजा-। पासूनि सुटतील ते भक्त ॥ १८० ॥ श्री शिवरात्र पुण्य दिन । तयांत गुरुवार अधिक जाण । त्यांत महाबलेशाचें दर्शन। मग त्या पुण्यासि पार नाहीं ॥ १८१ ॥ त्रिमूर्ती सांगती महाबलास । तुझें चरित्र वाचणाऱ्यास । काय करील कली तामस । सत्ता मात्रें आमुच्या ॥ १८२ ॥ तुझिया केवळ

स्मरण मात्रें। पवित्र होतील सर्व गात्रें। संतांचीं सकल चरित्रें। परमपवित्र जाणावीं ॥ १८३ ॥ हें महाबलेश्वर आख्यान। जे भावीक संतसज्जन। वाचितील करितील ध्यान। ईश्वर प्रसन्न तयासी ॥१८४॥ त्यांचें तुटेल भव-बंधन। वैरिही करितील तया नमन। कदाहि नव्हे तो दीन। निमग्न केवल शिवरूपीं ॥ १८५ ॥ दुसरा अध्याय महापर्वणी। भेटिती भार्गव दत्तमुनी। अक्कलकोटवासी मुनी। श्रीपाद श्रीवल्लभ ॥ १८६ ॥ दुजी परमपवित्र श्रेष्ठ। अगस्ती आणि कुमारभेट। कथा तीर्थीं बुडी नीट। द्यावी येथ साधकांनीं ॥ १८७ ॥ जगन्नाथा जगज्जीवना जगद्वंद्या जनार्दना। जनपालका मनमोहना। तुझी लीला वदवी पुढें ॥ १८८ ॥ श्रीहरिहरेश्वर लीलामृत। श्री-स्वामी समर्थ सांगत। भाविक भक्तपरिसोत। द्वितीयो-ध्याय गोड हा ॥ १८९ ॥ श्रीगुरुदेवदत्त.

## अध्याय ३ रा.

श्रीगणेशायनमः जयजयाजी योगीश्वरा । विश्वव्यापका विश्वंभरा । सुफलदायका सिद्धेश्वरा । प्राणिपात असो तुजला कीं ॥ १ ॥ सर्व श्रेष्ठ सावित्री । आणि कृष्णा धरित्रीं । उगम पावती जया पात्रीं । तें कथन करावें ॥ २ ॥ स्कंद म्हणें इल्वल नाशना । करा मधुकथामृत-पाना । करितों यथातथ्य निवेदना । तें सावचित्तें ऐकिजे ॥ ३ ॥ पूर्वी ब्रम्हा विश्वपती । तया गृही देवें केली वस्ती । त्रिमूर्ती महायाग आरंभिती । तेहतीस कोटी अमरांसह ॥ ४ ॥ इंद्रादि लोकपाल जेथें । छडी-दार होवोनि ठाकले तेथें । सिद्ध नाग गंधर्वांचे जथे । प्राप्त झाले यज्ञकार्यां ॥ ५ ॥ यज्ञ स्थंडिला समोर आर्या । ब्रम्हा ठेला यज्ञकार्या । तंव पुरोहितें यजमान भार्या । सावित्रींस पाचारिली ॥ ६ ॥ तंव तो यज्ञाचा अपूर्व थाट । करावा बहुत थाटमाट । लावण्य साजे शृंगार दाट । यांत गुंगली सावित्री ॥ ७ ॥ पुरोहितें साधावा सुमुहूर्त । यथासांग व्हावी यज्ञपूर्त । म्हणुनि

भगवन् श्री समर्थ । विष्णू निर्णय करिते जाहले ॥ ८ ॥ माधव म्हणें त्याकाळीं । अगदीं अडचणीच्या वेळीं । कनिष्ठिकेसि द्यावी पाळी । धर्मकर्मासि यथेप्सित ॥ ९ ॥ जरी सावित्री रागावेल । तरी आतां चालेल । यज्ञ मुहुर्त चुकेल । ऐसा प्रकार न व्हावा ॥ १० ॥ ऐकोनि शास्त्रोक्त भाषण । बुध जन डोलविती मान । गायत्रीसत्वरें बोलावून । अर्घ्यासनीं स्थापिली ॥ ११ ॥ सुरगण वाद्यें वाजविती । स्वस्तीवाचन करिती । ब्राह्मण वेद घोषिती । नाच करिती अप्सरा ॥ १२ ॥ ब्रह्मांड व्यापिलें नादें । सावित्री चकित उन्मादें । पातली सभेंत गडबडें । तों अपूर्व देखिलें ॥ १३ ॥ मंगलवेषें सुवासिनी । जयांसी ओवाळिती निरंजनीं । ब्रह्मा गायत्री दोनी । बैसली पाहे अभ्यंगत ॥ १४ ॥ सुरवात झाली यज्ञास । देखोनि चढे कोपास । म्हणे हो यज्ञ मुकुटावतंस । धर्म भ्रष्ट कैसे जहाला ॥ १५ ॥ धर्मपत्नी यज्ञाचें मुख्यांग । तिजवांचूनि चालविला याग । माझा अपमान केलाति महाभाग । म्हणुनि ध्यावा शाप हा ॥ १६ ॥ हे सर्व जल होवोत । गायत्री सह ब्रह्मा

खचित । ज्यानें दिली ही मसलत । तो विष्णूहि जलरूप होवो ॥ १७ ॥ हासिन्नला मधुकैटभारी । म्हणें सभेंत सत्वरी । पती आज्ञा मोडूनि नारी । जी आपुलाचि मिरवे मान जनीं ॥ १८ ॥ तीस धर्मपत्नी म्हणावें कैसें । जी घाली पतीस पिसें । धर्म अर्थ काम नासे । पतीस संकटीं घालितां ॥ १९ ॥ गुंगली शृंगारण्या शरीर । म्हणुनि केला निर्धार । धाकुटी पत्नी धर्माचार । करावयासि योग्य आहे ॥ २० ॥ यापुढील यज्ञकारण । भागे होईल त्वहस्तें पूर्ण । परी तूं शाप अकारण । आम्हां दिधलासि मूर्खत्वें ॥ २१ ॥ तरी घेई उलट शाप । तूंही होशील नदीरूप । पश्चिमतीरीं हरिसील ताप । सागरतीरवासी जनांचें ॥ २२ ॥ मग कृष्ण कृष्णारूपें । सदाशिव वेण्यारूपें । ब्रम्हा ककुद्मतीरूपें । पातले सकळ भूमंडळी ॥ २३ ॥ गायत्री आणि सावित्री । प्रगटल्या धारित्रीं । महाबलेश्वर पुण्यक्षेत्रीं । प्राप्त झाली जलरूपें ॥ २४ ॥ जेथें होतो कृष्णा संगम । तें स्थान अत्यंत उत्तम । त्याचिया दर्शनें शांतिधाम ।

मुक्तिलाभ तात्काळीं ॥ २५ ॥ कृष्णेचा संपूर्ण कथा । शेषही वर्णना असमर्था । एकशेंआठ शिवलिंगें इष्टयार्था । जिच्या तिरीं प्रगटलीं ॥ २६ ॥ सावित्री महाभिमानी महानदी होवोनी । यज्ञाचा विध्वंस करुनी । हलुहलु गेली सागराकडे ॥ २७ ॥ तंव तो भक्तकाज कल्पद्रुम । करुणासिंधू पुरुषोत्तम । सकल अवाप्त काम । मार्गीच गांठी सावित्री ॥ २८ ॥ तंव ती अभिमानी बाळी । कृष्ण दर्शनें खवळली । मोठ्या आवेशें वाहूं लागली । कृष्णें निषेध केला तिचा ॥ २९ ॥ कृष्णा रूप मधुसूदन । तीस म्हणें दुःखद अभिमान । मजकडे येई त्यजोन । पूर्ण विवेक धीर मनीं ॥ ३० ॥ माझा धरोनि विश्वास । जवळीं येई आसपास । जो धरी मानापमान–कांस । तो दुरावला कर्तव्या ॥ ३१ ॥ जोंवरी मनी आदर भाव । तोंवरी बसे प्रितीवाव । खोट्याभिमानाची हांव । हरताळ लावे प्रेमासि ॥ ३२ ॥ मी प्रेमासी भुकेला । मी भक्तांचा विकला । सर्व धर्माधर्म सुटला । माझियें मुळें ॥ ३३ ॥ हे साध्वी सावित्री । रागावसी अपात्री । हे ब्रह्मानंदे

चारुगात्री । हिताहित न देखसी ॥ ३४ ॥ मान द्वेष राग । षडरिपूंचे मुख्य भाग । करिती भ्रष्ट कर्म मार्ग । म्हणुनी सकल त्यजावे ॥ ३५ ॥ सावित्री म्हणें देवेशा । सर्वज्ञा जगदीशा । माझा करोनी अपमान ऐसा । मान चढविला सवतीचा ॥ ३६ ॥ तूं सगळ्यांत चतुर । ऐसा जाणावा समाचार । लोण्याचीहि सवत साचार । खपत नसे स्त्रियांसी ॥ ३७ ॥ श्रीधर बोले हांसोन । तूं स्त्रियांसी गुरु जन । मोठ्यांचे असावें मोठें मन । तरीच उपयोग मोठ्यांचा ॥३८॥ ऐसें असुनि मृदुले । कां रागावसी बळें । मुख तुझें कोमजले । न जाहले बरवेचि ॥३९॥ गायत्रीस धरुनि लोभ । तुज रागावुनी काय लाभ । मी भक्त कैवारी पद्मनाभ । सुखदायक सर्वांसी ॥ ४० ॥ कल्पतरु छायें बैसला पांथस्थ । तयाचे पुरवी सर्व मनोरथ । जरी दुर्वासनांचा अनर्थ । प्राप्त होईल पांथस्था ॥ ४१ ॥ तरी तयाचा बोल काय । कल्प वृक्षावरी होय । मी भाविकां सुखद होय । दुःखद अभाविकांसी ॥ ४२ ॥ हे साध्वी सावित्री । तव हास्यें धरित्री । आनंदवी चारुगात्री ।

हृदयीं शांत होवोनियां ॥ ४३ ॥ तुझे हस्तें महायज्ञ । लवकरीच घडेल सर्वज्ञ । ज्यायोगें सकल धर्मज्ञ । आनंदतील तात्काळीं ॥ ४४ ॥ ऐसा देवुनि आशिर्वाद । पर्वतरूप धरी गोविंद । श्रीशंकर परमानंद । तेही नांदती पर्वतरूपें ॥ ४५ ॥ दोघेही एक जहाले । " हरिहर " नाम पावले । पर्वत महात्म्य वाढलें । तैं पासुनी पुण्य क्षेत्रीं ॥ ४६ ॥ कोणीं म्हणती त्रिशिर । शिवाद्रिही म्हणती नर । हर्षणाचल विष्णू गिर । करुणाचल पुष्पाद्री ॥४७॥ आनंदाद्री ऐसें नाम । कोणीं ठेविलें निष्काम । अनंत नामें अनंत धाम । अनंत प्रेम जयाचें ॥ ४८॥ सावित्री हरिहर पर्वताकडे । वहात गेली रोकडे । दर्शन मात्रें सांकडें । दूर होई भाविकांचें ॥ ४९ ॥ कृष्णेसि संगम पावोन । मुक्त होती नदीरूप सुरजन । अवलोकुनी महापर्वत ध्यान । सर्वही चकित होती ते ॥ ५० ॥ प्रेमें पहातां त्यासी । सगुण सुंदर राजसी । मोहक मूर्ती ध्यानासी । प्राप्त होई मुमुक्षुस ॥ ५१ ॥ जो केवल दयासागर । ज्याचें स्तवनें मुक्त पामर । तो भगवान् श्रीहरिहर । मूर्ती-

मान प्रगटला ॥ ५२ ॥ सुरवरें केला जय जयकार । आनंदें कोंदलें अंबर । करुनि साष्टांग नमस्कार । अपार स्तवन करिताती ॥ ५३ ॥ उदयोस्तु श्रीहरिहरा । जय जयाजी त्रिगुण सुंदरा । जय जयाजी परात्परा । गुणाधारा जगदीशा ॥ ५४ ॥ जय शिवसांब करुणानिधे । जय शंकर नवनीत सुधे । तुझे स्तवनें चिदानंद लाधे । जय गोविंद हरे मुरारे ॥ ५५ ॥ जय केशव नारायण माधव । जय गणाधीप उमाधव । जय विष्णु रमाधव । जय मंगेश मधुसूदन ॥५६॥ जयकाल भैरव त्रिविक्रम । जय सदाशिव परशुराम । जय जोतिर्लिंग श्रीराम । तुजसी निष्काम भजावें ॥५७॥ जय ब्रम्हानंद श्रीधर । हृषिकेशी गिरिजावर । पद्मनाभ व्याघ्रांबरधर । दामोदर विश्वपते ॥ ५८ ॥ जय मुकुंद हेमवतीधर । संकर्षण परमेश्वर । प्रद्युम्न नीळकंठ नीलधर । वासुदेव त्रिपुरारी ॥ ५९ ॥ जय सद्गुरु अधोक्षज । श्री स्वामीसमर्थ महाराज । जयनारासिंह अक्कलकोटज । श्रीपाद श्रीवल्लभ ॥ ६० ॥ जय अनिरुद्ध जनार्दन । जय उपेंद्र उमार-

मण । श्री हरिहर नाम धारण । श्रीकृष्ण कृष्णा सख्या ॥ ६१ ॥ तुझी करावया स्तुती । सकल वेद थकती । विद्यादेवी सरस्वती । तीहि कुंठित जाहली ॥ ६२ ॥ तव महिमा थोर थोर । तव रूप इंद्रियां अगोचर । हे कमल नयन इंदिरावर । प्रसन्न होई भक्तांसी ॥ ६३ ॥ हे दक्षजामात दारिद्र हरा । देवाधि देवा दुःसह दूरा । दीन दयाळा कर्पूरगौरा । विघ्नेशा विश्व पालना ॥ ६४ ॥ अनादि अंता अनंता । ॐ काररूपा आधारभूता। आदि-पुरुषा अत्री सुता । अनाथनाथा शेषशायी ॥ ६५ ॥ रक्तांगरक्तवर्ण । पद्मनेत्र सुहास्य वदन । कंथा टोपी सुहास्य वदन । दंडकमंडलूधर विश्वपते ॥ ६६ ॥ जोगेश्वरी प्रिया शांताकारा । मृडानीशा निराकारा । लक्ष्मी-पते मायाधरा । जगद्वंद्याजाश्वनीळा ॥ ६७ ॥ त्रिताप-शमना त्रिदोषहनना । त्रिगुणातीता त्रिलोचना । त्रिपु-रमर्दना त्रिवदना । तारकासुरनाशना भवतारका ॥ ६८ ॥ कमलनयना कमलासना । कमलनाभा कमलशयना । कोमल पद युगुलधरणा । कौतुक चरित्र कथना कालांतका

॥ ६९ ॥ अनेक बाहूधारका । अनेक भक्त तारका । अनेक रिपू मर्दका । अनंतावतारी ॐ काररूपा ॥ ७० ॥ जय देवा हरिहरा । लीलामात्रें सगुणधरा । आमुचे स्तवनस्वीकारा । बोबडे बोल बालकाचे ॥ ७१ ॥ हरी विश्वसांवरता । हर संहार कर्ता । हरी आधारभूता । हर अंत जाणिजे ॥ ७२ ॥ दोघे ही द्वैतहीन । एकरूपें विश्वपालन । करिती स्वेच्छेंकरून । लीलानुग्रही समर्थ ॥ ७३ ॥ सकल विद्यांचें सार । सकल सुखांचें आगर । सकल ज्ञानाचें भांडार । श्रीहरिहर वेदरूप ॥ ७४ ॥ उदय व्हावा प्रेमाचा । येतदर्थ उद्भवला सगुण सांचा । जेवि नसतां रसाळ वाचा । मानव देह व्यर्थचि ॥ ७५ ॥ आचार नियम रहावे । भक्ती प्रेम वाढावे । दुष्टांचे शासन व्हावें । म्हणुनियां अवतारलीला ॥७६॥ देवा तुम्हीं भेदहीन । पूर्ण, अविनाशी ज्ञान । सत्य रूप सत्य गान । तुजनमन असो कीं ॥ ७७ ॥ अखंडा नंद चित्स्वरूप । जगताचे माय बाप । तुम्हां आवडती प्रेमालाप । अखंड भजन नामस्मरण ॥ ७८ ॥ तुजपुढें करितां गायन ।

निजानंदें डोलविसी मान। कीर्तन करितां नामदेवा समान। पुढें नाचसी कौतुकें ॥ ७९ ॥ हे जगद्गुरू सदाशिव। हे नाथ नारायण भार्गव। हृदयाकाशीं करी वास्तव। माझिया शुद्ध निजासनी ॥ ८० ॥ ऐसीं स्तोत्रें ऐकुनी। सुंदर मूर्ती रक्त नयनी। उभी ठेली प्रसन्न वदनी। काय वदे गंभीर स्वरें ॥ ८१ ॥ तों सर्व घालिती लोटांगण। मग श्रीहरी पंचवदन। गंभीर स्वरें नभांगण। घुमविता जहाला ते वेळीं ॥ ८२ ॥ बाळानों मी मधुसूदन। झालों तुम्हावरी प्रसन्न। देईन योग्य वरदान। मागावें झणीं सुरवरीं ॥ ८३ ॥ महापुरुष ऐसें म्हणत जयाचें मुख-कमल सस्मित। विकसित जहालें कीं अमृत। जें मृतासी अमर करी ॥ ८४ ॥ तेव्हां ब्रह्मा मुख्य प्रजापती। उठोनि न्याहाळी श्रीपती। उरीं दाटली अत्यंत प्रीती। शब्द नुमटे त्यामुळें ॥ ८५ ॥ जयाचा महिमा उत्तम। वर्णावया कुंठित सुरोत्तम। तो मंगल परमधाम। आज्ञापी ब्रह्मदेवासी ॥ ८६ ॥ ब्रह्मदेवा उत्तम सज्ञ। मेळवुनि पुनः आरंभीं यज्ञ। जो विध्वंसाया कोणी

न प्राज्ञ । या त्रिभुवन मंडळीं ॥ ८७ ॥ तेव्हां आरंभिला याग । देती सकल हविर्भाग । यज्ञ कृत्य यथासांग । संपूर्ण झालें भगवत्कृपें ॥ ८८ ॥ येथें आठवे दासोक्ती । कीं ज्याचिया अंतरीं ईशभक्ती । त्यासी वरी सर्व शक्ती । कृपा करिती समर्थ ॥ ८९ ॥ सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करिल तयाचें । परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥९० ॥ साधूंचा हा महामंत्र । हाचि योग परमपवित्र । हृदयीं साठविण्यापात्र । हाचि मंत्र जाणिजे ॥९१॥ साधावया मंगल कार्य । प्रथम स्मरिजे श्री आर्य । अधिष्ठावा आचार्य । महा प्रयत्नें करोनी ॥ ९२ ॥ प्रयत्नांती परमेश्वर । परी नुसतें प्रयत्न घोर । केलिया कार्य न साधे थोर । पुजावा परमेश प्रयत्ना पूर्वी ॥९३॥ हा अनुभव नसे लटका । याचें वर्म जाणे तुका । रामादि साधू भाविकां । मान्य असे ही खुण ॥ ९४ ॥ असो यज्ञदेवा संतोषवोनी । ब्रह्में कूप खणोनी । स्नान केलें दिव्य जलानीं । ब्रह्मकूप त्या नांव ॥ ९५ ॥ येथें स्नान करितां अक्षय । सकल पापा होय क्षय । ब्रह्म-

हत्यादिपापें दुर्जय । भस्म होती तात्काल ॥ ९६ ॥ ब्रह्म कूपाचे जलें । पितृतर्पण करिती भले । उत्तम गती पावले । पूर्वज त्यांचे सत्य जाणा ॥ ९७ ॥ ब्रह्मकूपाचे करावें स्नान । हरिहरेशाचें ध्यावें दर्शन । सप्त जन्म पाप निरसन । होवोनी सुखी नारीनर ॥ ९८ ॥ संगे देव ऋषी घेवोनिया । शिव विष्णु पद नमोनियां । ब्रह्म स्त्री सावित्री माया । तीस संगती घेतलें ॥ ९९ ॥ हरीनें सावित्रीचा मान । केला बहुत प्रकारें करून । सकल सिद्ध गंधर्वादि करिती नमन । भूत गण महर्षिही ॥ १०० ॥ सावित्रीस झालें सुख । प्रसन्नांतःकरणें हास्य मुख । नमोनि विष्णु आणि पंचमुख । पातली पतिसह मुख्यजागी ॥ १०१ ॥ सुरवर म्हणती धन्य सावित्री । परी एक न्यून येरितीं । जरी प्रगटेल गायत्री । तरी त्रिवार धन्य तूं ॥ १०२ ॥ ऐसें बोलती सुरजन । मान तुकविती बुधजन । सावित्रिनें आवाहन । करितांचि प्रगटे गायत्री ॥ १०३ ॥ जी जगदोद्धारिणी । ब्रह्मानंदवर्धिनी । तीस वंदिती देवमुनी । ठेली उभी कुंडा-

समिप ॥ १०४ ॥ सुरवर पुष्पवृष्टी करिती । गंधर्वगायन करिती । चारण अपार स्तोत्रें गाती । नृत्य करिती अप्सरा ॥ १०५ ॥ तेज झळकलें नभीं । वाजती महा-दुंदुभी । ऐसा महायज्ञ पद्मनाभीं । पूर्ण केला त्रियांसह ॥ १०६ ॥ यज्ञ समाप्तिचें अवभृथ स्नान । करुनि होती सर्व पावन । तों तेजस्वी सुदर्शन । चक्र प्रगटलें विष्णूचें ॥ १०७ ॥ अमर झाले भयत्रस्त । तारा तारा ऐसें म्हणत । श्रीहरी अभय देत । भयभीत सुरांसि ॥१०८॥ धममायु हें सुदर्शन । मी पाचारिलें करोनि चिंतन । महाक्षेत्रीं करावया रक्षण । सकल भक्तजनांचें ॥ १०९ ॥ होईल निर्माण चक्रतीर्थ । तयाचे पानें पर-मार्थ । साधितील इष्टार्थ । स्नानें दानें सर्व सिद्धी ॥११०॥ मग देवांसहित पद्मासन । चक्रतीर्थी करी स्नान । श्रीहरि-हरेश्वराचें दर्शन । घेती प्रेमें तेधवां ॥ १११ ॥ ते श्रीहरि हर । एकात्मता पावती गिरिवर । जे त्रिगुणात्मक त्रिरूप धर । माझा नमस्कार तयासी ॥ ११२ ॥ जेवीं नादी आणि सुगंधीं । एकचि वायू वाहे सुधी । तेवी श्रीहरिहर

विधी । यांत नाहीं भेदभाव ॥ ११३ ॥ आत्मतेजाचा चिदानंद । तोचि श्रीअपर्णानंद । पार्वती हृदयाब्ज मिलिंद रमाधव मुकुंद श्रीहरी ॥ ११४ ॥ स्कंद म्हणती मुनिश्रेष्ठा जो अतिंद्रिय द्रष्टा । जो घालवी सकल कष्टा । त्याची स्तुती सर्व करिती ॥ ११५ ॥ महर्षी जाहले शांत । जे प्रथमाचि निर्विकारी अत्यंत । त्याहीवरी प्राप्त श्रीअनंत । मग त्या सुखासी पार नव्हे ॥ ११६ ॥ श्रीहरिहराची स्तुति । अंतरीं धरोनि अखंड प्रीती । सर्व श्रेष्ठ प्रेमें करिती । सदा ध्याती हरिहर ॥ ११७ ॥ देवाधिदेवा लोकपालका । उत्पत्तीस्थिति लयकारका । स्वयंभू सर्व सामर्थ्ययुक्ता । तुज दंडवत सदा कीं ॥ ११८ ॥ राहोनिया प्रपंचांत । तूं करिसी प्रपंच अंत । स्वार्थ परार्थ सत । अनंतरूप तूं असती ॥ ११९ ॥ तूंचि केवल शाश्वत । नित्यशांतिनें विलसत । ज्ञानमय चित्सत् । वंदन तुज त्रयमूर्ते ॥ १२० ॥ तूं प्रकृतीमय असुन । निवृत्ती लेवविसी जाण । मायापती असुन । सहजानंद ब्रम्हरूप तूं ॥ १२१ ॥ तूं संसारविनाशन । सत्य तत्वपूर्ण । तूं

सकलांचे जनन। वैभवशाली तूंचि स्वामी ॥ १२२ ॥ तूं निराकारी आकारधारी। तूं मायामोहन मुरारी। जगचालक मधुकैटभारी। तुझी स्तुती अशक्य आम्हां ॥१२३॥ नेती नेती म्हणोनी। वेदही जहाले मौनी। तेथें काय करील वाणी। इतरांची ॥ १२४ ॥ ब्रह्मा हरिहर। सगुणरूपें गोचर। विश्वस्वरूप प्राणाधार। करोत कुशल सर्वांचे ॥ १२५ ॥ ऐशी स्तुती ऐकोन। प्रसन्न विधी हरीउमारमण। म्हणती सकळ सुरजन। उत्तम वर मागावा ॥ १२६ ॥ मुनी म्हणती त्रिभुवनेश्वर। आम्ही धन्य खरोखर। जरी तूं प्रसन्न सर्वेश्वर। तरी एक वर द्यावाजी ॥ १२७ ॥ येस्थळीं जे करिती यात्रा। त्यांच्या चालाव्या सकल मात्रा। पूर्ण व्हाव्या इच्छापवित्रा सकल यात्रेकरूंच्या ॥ १२८ ॥ तुम्हांसि पाहे भेदभाव। त्यासि नसे मोक्षवाव। सद्भक्तांची संसारनांव। तुम्हीं चालविता सुखरूप ॥ १२९ ॥ अज्ञानियांचें व्हावया कल्याण। एक रूप होवोनि पूर्ण। येथेंचि वसावें जाण।

भक्तांसि दर्शन द्यावया ॥ १३० ॥ यावरी म्हणती त्रिमूर्ती । आम्हीं बसूं या तीर्थी । एक रूपें धरित्री । वरी विचरूं महानंदें ॥ १३१ ॥ आम्हीं हरिहरेशान । नामें प्रसिद्ध होउन । सर्ववस्तूंचा लाभ करून । देवूं सर्व स्मर्त्यांसी ॥ १३२ ॥ कोणीं समबुद्धी साधुपुरुष । एथ भक्ती करितील शेष । त्यांचें कठिण तरी मनीष । पूर्ण करीत सत्य जाणा ॥१३३॥ तुम्ही आमुची केली स्तुती । अंतरीं धरूनि अखंड भक्ती । जे प्रेमें पठण करिती । परम ज्ञानी होतील ते ॥ १३४ ॥ हा अध्याय करितां पठण । त्यांचें चुकेल भव भय मरण । त्यासि प्रसन्न हरिहरेशान । सदापुढें उभा तयाच्या ॥ १३५ ॥ श्राद्धसमयीं पठण करितां । तृप्त होतील पूर्वज पिता । नित्यपाठ प्रेमें करितां । कल्याण त्याचें होईल ॥ १३६ ॥ सावित्री गायत्री महिमान । प्रगट झाले श्री हरिहरेशान । सद्गुरू श्री आनंदघन । सदा वर्षवो मधुरसुधा ॥ १३७ ॥ श्री हरिहरेश्वर लीलामृत । श्री स्वामीसमर्थ सांगत । प्रेमें ऐकोत सज्जन संत । तृतियोध्याय गोड हा ॥ १३८ ॥ श्री गुरुदेवदत्त अवधूत.

## अध्याय ४ था.

श्रीगणेशायनमः जयजयाजी ॐकारा । जयजयाजी ईशानईश्वरा । जयजय श्रीहरिहरेश्वरा । आत्मोध्दारा जगद्गुरू ॥ १ ॥ स्कंद म्हणती अगस्तीस । मागील अध्यायीं कथा सुरस । प्रगटले श्रीजगन्निवास । हरिहर पुण्यक्षेत्रीं ॥ २ ॥ साधूंसी दिधलें अश्वासन । मी झालों प्रगटमान । सुगती प्राप्त व्हावी म्हणुन । माझिये भक्तांसी ॥ ३ ॥ हें क्षेत्र असे मोक्षद । फलद्रुम होती चहूं वेद । उत्तम कीर्ती सुनाद । होईल याचे दर्शनें ॥ ४ ॥ ज्यास पाहिजे भाग्यसुख । त्यानें ध्यावें हरिहरेश मुख । सर्व दुःखाची करी राख । स्वामी दर्शन सुखरूप ॥ ५ ॥ जो विश्वाचा धाता । जो पतितां मोक्षदाता । जो सकल मंगलकर्ता । तो राहे पर्वतरूपें ॥ ६ ॥ ज्ञान देणारी गायत्री । संपत्ती देणारी सावित्री । दोघींचा संगम धरित्रीं । ब्रम्हकुंड तया नाम ॥ ७ ॥ तैसेचि श्रीशुक्रतीर्थ। चुकवी सकल अनर्थ। केवल दर्शनेंचि प्राप्त सर्वार्थ । स्नानें पुण्य अगाधचि ॥ ८ ॥ शुक्र म्हणजे तार । तार

म्हणिजे प्रणव ॐकार । या ठाईं प्रगटला अमृतेश्वर । म्हणुनि नाम शुक्लतीर्थ ॥ ९ ॥ श्रीहरिहर क्षेत्रीं । सागर कृष्णा सावित्री । शुक्लतीर्थ आणि गायत्री । पंचमहा संगम ॥ १० ॥ ह्मणूनी यासी पंचनद तीर्थ । नाम पडले यथार्थ । येथें भेटेल श्रीगुरुनाथ । अगाध महिमा तीर्थांचा ॥ ११ ॥ कोणी ह्मणती वैष्णवतीर्थ । कोणी ह्मणती ब्रह्मतीर्थ । क्षोभघ्न अग्नीतीर्थ । कोणी अरिघ्न ऐसे ह्मणती ॥ १२ ॥ जेंवी अग्नी भस्म करी । तेंवी स्नानें पापें दुरी । भस्म होवोनी जाती सारीं । ह्मणोनी अग्नीतीर्थ नाम दिल्हें ॥ १३ ॥ निपुत्रिका श्रेष्ठ गती । मिळते या पुण्य क्षेत्रीं । ह्मणुनी पुत्रपद प्रीतीं । कोणी ह्मणती बुधजन ॥ १४ ॥ कोणी म्हणती ब्रह्महत्या निवारण । कोणि ह्मणे याग कुंड जाण । ऐसें नाना भक्त जन । संबोखिती नानाविधें ॥ १५ ॥ तीर्थांचें महात्म्य थोर । ह्मणोनि पिंड देती येर । पूर्वजांचा संभार । जाई मोक्षासी तात्कालें ॥ १६ ॥ करितां शुक्ल तीर्थीं पिंडदान । पितर संतोषिती संपूर्ण । तीर्थ राज सागर ही संलग्न । उधान

3986

वेळी होय येथें ॥ १७ ॥ चोरुन अथवा रागावुन । संकेतें अथवा हास्यमिषें करून । घेती जे हरिहरेशाचें दर्शन । पुनर्जन्म तया नाहीं ॥१८॥ कोणी अर्ध क्षणमात्र । वास करील येथें पवित्र । तयाचें सकल गात्र । मुक्त होई पापातुनीं ॥ १९ ॥ हे मूढा कलिकालका । जों वरी शुक्ल तीर्थ जल तारका । योगें चमके पुण्य भूमिका । तों वरी लपे पाताळीं ॥ २० ॥ अथवा ब्रम्हांड सोडोनी । बाहेर जा निघोनि । ज्यांचि मती कलिमलानी । अत्यंत मलीन झाली असे ॥ २१ ॥ ऐसे असोत दुष्ट दुर्जन । परि प्रेमें घेती दर्शन । तरी पाप मुक्त होवुन । उद्धरिती स्वकुळा ॥ २२ ॥ मृत्युकाळीं स्मरे श्रीशिवलिंग । तो असला जरी मांग । योग सिद्धीस पावे अभंग । पुढिलिया जन्मीं निश्चयें ॥ २३ ॥ हृदयीं प्रेम अखंडित । रोमांच अंगी दाटत । अष्ट भाव विलसत । माझिया दर्शनें जयासी ॥ २४ ॥ त्याच्या रोमरंध्रापासुन । पापें उद्धवली जाण । भस्म होतील मुळींहुन । माझिये कृपें करोनिया ॥ २५ ॥ आज पासोनि कृतांता । त्यजोनि

जाई पृथ्वी तत्वता । मृत्योबा सोडी ममता । माझिये भक्त देहाची ॥ २६ ॥ जपासि सांगे हरिहर । तूं दूर करी अहंकार । शुक्रतीर्थ पृथ्वीवर। प्रस्थापित जाहलें असे ॥ २७ ॥ पवित्र उदक यांतिल । मस्तकीं धारण करील । त्याचें जरामरण हरील । सत्य सत्य त्रिवाचा ॥ २८ ॥ प्रेमभक्ती हरिहर पायीं । हाचि मोठा योग होई । दुःखसंकट नष्ट होई । श्रीहरिहर चरण सेवें ॥ २९ ॥ हरिहर मृदु चरण । सर्वांचें करी तारण । नको अधिक वर्णन । सूर्य प्रकाशासम सत्य असे ॥ ३० ॥ जेथें वसती श्रीस्वामीसमर्थ । सर्व श्रेष्ठ तें तीर्थ । दर्शनमात्रें परमार्थ । प्राप्त क्षण न लागतां ॥ ३१ ॥ अनेक प्रकारच्या सिद्धी । तपसिद्धी ज्ञान सिद्धी । इतर स्थानीं लागे अवधी । येथें प्राप्त निमिषार्धांत ॥ ३२ ॥ शुक्र तीर्थीं स्नान करितां । हरीहर उभा तत्वतां । मग तयासि सायुज्यता । प्राप्त होतां काय नवल ॥ ३३ ॥ इतर साधन व्यर्थ पाहीं । योग याग नको कांहीं । केवळ शुक्ल तीर्थ डोहीं । स्नान करितां पुरे असे ॥ ३४ ॥ पुण्य क्षेत्रीं घडला वास

त्याचा चुकला सर्व त्रास । भूत प्रेत पिशाच्च खास । पळुनि जातील देहांतुनी ॥ ३५ ॥ ब्राह्म नामें कृत युगांत । वैष्णव त्रेता युगांत । ब्रह्म हत्याघ्न द्वापारांत । शुक्ल तीर्थ कलींत म्हणती ॥ ३६ ॥ जेथें वाहे सावित्री । ज्या स्थळीं ज्ञान दात्री । वास करी श्रीगायत्री । तेथें मुक्ती निरंतर ॥ ३७ ॥ अहो श्रीअगस्ती मुनी । शेष सहस्रमुखांनी । अथवा भीषणमुखानी समर्थ नोहे वर्णना ॥ ३८ ॥ ऐशा रिती शिवपुत्र स्कंद । सांगतां अगस्तीस आनंद । क्षेत्रीं पातला पुण्यप्रद । आनंदकंद दर्शना ॥ ३९ ॥ घेवोनि दर्शन स्वामींचें । अगस्ती प्रेमें नाचे । धन्य तुम्हीं श्रोते साचे । श्रवणीं सादर बैसलां ॥ ४० ॥ श्रीहरिहरदर्शनें । शुक्लतीर्थी स्नानें । अगस्ती प्रसन्न वदनें । पावले सौख्य अक्षय ॥ ४१ ॥ शुक्लतीर्थीचे इशान्य । तेथें विष्णु पद धन्य । नमितां पितर स्वर्गमान्य । होतील तात्काळीं परलोकीं ॥ ४२ ॥ विष्णुपदीं देतां पिंड । त्याचे पूर्वज ब्रह्मांड । फोडोनि भोगिती स्वर्गकुंड । प्रेत योनी नासती ॥ ४३ ॥ मुक्ती मिळावी भक्त पित-

रासी । म्हणुनि ईशें एक पद गयेसी । दुसरे ठेविलें मक्केसी । तिसरें स्थापिलें शुक्रतीर्थी ॥ ४४ ॥ विष्णुपद मोक्षप्रद । दर्शनेचि प्राप्त मोक्षपद । स्पर्शकरितां मद । कामक्रोधादि दग्ध होती ॥ ४५ ॥ पूर्वजोद्धाराची कामना धरून । येथें करावें पिंडदान । हेंस्थळ कुल तारण । सत्य जाण वचनातें ॥४६॥ येथें करील गोदान तरी शतकोटी गोदानासमान । ऐसें अगाध महिमान । श्रीहरिहर क्षेत्रांचें ॥ ४७ ॥ गायत्रीची दिशा पश्चिम । तेथें अलौकिक सिद्धाश्रम । शूलतीर्थधाम । स्थापिलें तेथें ब्रह्मदेवें ॥ ४८ ॥ तेथोनि दूर अंतरावर । पश्चिमेस चक्रनामें तीर्थ । श्रीलक्ष्मीकांत स्थापित । निर्माण जाहलें असें ॥ ४९ ॥ याचे उत्तरेस नागराज । साधावया सज्जन काज । जिरविण्या शत्रूंचा माज । प्रगटे ब्रह्म देव कृपें ॥ ५० ॥ नागतीर्थीकरितां स्नान । घडे नागनाथ दर्शन । तो शिव मित्र तक्षकभगवान । सायुज्य मुक्ती देतसे ॥ ५१ ॥ सर्प भय विषबाधा । कधींच न होती बुधा । याचें उत्तरे गौतमसुधा । ब्रह्महत्या

निवारी तीर्थ ॥ ५२ ॥ याच्या दक्षिणे दीर्घ तम्थानें । कमंडलू तीर्थ स्थापिलें मोदानें । तेथें करितां स्नान दानें । भ्रूणहत्या पापनाशी ॥ ५३ ॥ त्याचे उत्तरेस कामधेनुपद । जेथें श्रीवल्लभ श्रीपाद । दोहन करितां आनंद । न माये ब्रह्मांडीं ॥ ५४ ॥ या तीर्थांचे दर्शनें । पाप पळे भेणें । पूर्वेस आदिमायेनें । स्थापिलें श्री गौरीतीर्थ ॥ ५५ ॥ श्री जगदंबा भवानी । जपा बैसली येचि स्थानिं । महाघोर तप आचरूनी । शूळपाणी तोषविला ॥५६॥ तिजसी द्यावया सौख्यदान । जाश्वनीलें केलें पाणिग्रहण । येथेंच पाडवें ( पाडवें ) श्राद्ध करुन । पिंडदान देती पितरासी ॥ ५७ ॥ स्नान करुनि तर्पणानंतर । पिंड देतां तृप्त पितर । पूर्वजांचा व्हावया उद्धार । तीर्थयात्रा करिताती ॥ ५८ ॥ याचे पश्चिम भागीं । गंगा तीन प्रवाहें विभागी । येथें स्नान करितां अंगीं । व्याधी निरसन तात्काल ॥ ५९ ॥ विशेषें करुनि रविवारीं । अथवा संक्रमण ग्रहणापूर्वी । स्नान करितां बंध दुरी । सर्व कर्म मोक्षदायक ॥ ६० ॥ याचिया

पूर्वभागीं तीर्थ । नाम तयाचें ब्रह्मतीर्थ । ब्रह्मलोक उत्तमार्थ । स्नानदानें फलप्रद ॥ ६१ ॥ या पूर्वे विष्णुतीर्थ । पुढें असे नंदितीर्थ । प्रसन्न होवोनि भोलानाथ । नंदीस्तव प्रगटविलें ॥ ६२ ॥ येथें करितां स्नान । साक्षात होई शिवदर्शन । पुढें दक्षिणेस पावन । रुद्रतीर्थ असे मोठें ॥ ६३ ॥ याच्या दूर पश्चिमेस । असे तीर्थ गणेश । येथें पूजिता परमेश । पुत्र धन देई निश्चयें ॥ ६४ ॥ श्रीगणेशप्रसादानें । दुरी पळती सकळ विघ्नें । प्राप्त होतील काव्यरत्नें । विद्या मोक्षासि कारण ॥ ६५ ॥ कर्में होई जीवबंधन । त्यांतुनि सुटण्या विद्या कारण । भगवत्गीता उपदेशी ज्ञान । मुख्य विद्या जाणिजे ॥ ६६ ॥ विद्येचा अधिपती । त्याचें नाम गणपती । भक्तकाजा श्रीपति । पुत्र जाहला शंभुचा ॥ ६७॥ तो होता प्रसन्न । मग जगीं काय न्यून । जो ऋद्धिसिद्धीचा भगवान । गजानान गणेश ॥ ६८ ॥ ज्यासि नसे विद्यालेश । त्यानें स्मरावा विघ्नेश । अज्ञान माया पाश । तटातट तुटती तत्कृपें ॥ ६९ ॥ गणेश तीर्थ महिमान ।

पुढें यमद्वार नाशकारण । वैतरणी नदी वाहन । स्नान येथें करावें ॥७०॥ येथें करा पिंडदान । आणि पवित्र गोदान । सकल कुल पाप नाशन । स्नान दानें होई कीं ॥ ७१ ॥ पुढें सूर्य तीर्थ असे । रविवारी आश्विन मासे । स्नान केलिया खासे । सूर्य लोक प्राप्त होई ॥ ७२ ॥ पुढें जवळ देव कोटी । तेथें सेवावा धूर्जटी । करावी भक्तानीं दाटी । रामेश्वरलिंग पूजना ॥ ७३ ॥ रामतीर्थीं करावें स्नान । रामेशाचें मुखीं भजन । भवभय दुःख नाशन । भजन श्रीहरीचें ॥ ७४ ॥ ऐशिया क्रमें पर्वत प्रदक्षिणा । सहस्र अश्वमेध फलद जाणा । दैन्य दुःख मरणा । पासुनि मुक्त सदा नर ॥ ७५ ॥ पश्चिम समुद्रतीर । तेथें वसती ब्रम्हा हरिहर । आदि मायेसह साक्षात्कार । त्रैमूर्तीचा तेथें असे ॥ ७६ ॥ सुरवर त्यांची पूजा करिती । ऐशी क्षेत्राची महती । अवश्य अवलोकी सुंदर मूर्ती । आदि मायेसह ॥ ७७ ॥ शुक्लतीर्थीं स्नान करुनि जाणा । योग्य रीती करी प्रदक्षिणा । होईल तुझ्या तारणा । पूर्वजांचें उद्धरण ॥ ७८ ॥ पर्वत प्रदक्षिणा करितां । आनंदें भजावें

उमाकांता । रोमरंध्रांतुनीं तत्वतां । पाप पळे घर्मरूपें ॥७९॥ त्यासी येलोकी सुखभोग । पर लोकी मोक्ष लाभ । तयाचे हृदयीं पद्मनाभ । साक्षात प्रगटें जाणिजे ८० ॥ ही तीर्थ कुसुमावली । आदरें पठा प्रभातकालीं । रक्षील तुम्हा चंद्रमौळी । सत्य सत्य त्रिवाचा ॥ ८१ ॥ श्रीहरी हर ध्यावोनि हृदयीं । तीर्थावली श्राद्ध समयीं । पठण करील आनंद मयी । सदातृप्त पितर त्याचे ॥ ८२ ॥ जैसें तीर्थ आनंद कानन । तैसेंचि हरिहर क्षेत्र महिमान । चुकवील भवभय बंधन । येथें आदर धरावा ॥ ८३ ॥ जयशिव शंकर उमानाथा । श्रीस्वामी समर्थ सद्गुरुनाथा । साधावया आमच्या परमार्था । वदवी तुझी लीला पुढें॥ ८४॥ श्रीहरिहरेश्वर लीलामृत । श्रीस्वामी समर्थ सांगत । आदरें परिसोत संत । चतुर्थोध्याय गोड हा ॥ ८५ श्रीगुरुदेव दत्त अवधूत.

## अध्याय ५ वा.

श्रीगणेशायनमः ॐ नमः सिद्धं । ॐ नमो श्री जगज्जननी । कुल देवते भवानी । श्रीगजास्य षडास्य जननी ।

ग्रं.

शांतादुर्गा शिवप्रिया ॥ १ ॥ शांताकार शांतवदन । शांती प्रिय सुहास्यवदन । सुशील सदाचार पालन । शांभवी सुबोध दायिनी ॥ ३ ॥ जय जगदंबे जोगेश्वरी विष्णु भगिनी जन्म मृत्युनिवारी । जानकी प्रिय स्मरानंदकारी । जन्मदात्री जान्हवी ॥ ४ ॥ कारुण्य सिंधू कैवल्यवासिनी । कालांतके कुमुदिनी । कौरव मर्दन श्रीकृष्ण भगिनी । कालीमाते नमोनमः ॥ ५ ॥ जय माया चक्रचालके । दुष्टमर्दिके सुखदायके । सिंह वाहके मुकुटधारिके । मोक्ष दायके नमोनमः ॥ ६ ॥ माते मातोश्री मृडानी । मीमांसकमार्ग दायिनी । श्रीमंगेशममते मृगनयनी । महालक्ष्मी महासरस्वती ॥ ७ ॥ महालसे मयासुरमर्दिनी । मीपण दुरभिमानहारिणी । मोहिनी रूप धरूनी। लाजविलें त्वां सुरांसुरासी ॥ ८ ॥ तुझी करावया स्तुती । कुंठली वेद श्रुती स्मृती । तेथें माझी अल्पमती । काय करील जगन्माते ॥ ९ ॥ परी सकल स्त्रियांची चाल । कीं बाळकाचे बोबडे बोल । सांठविती हृदयांत खोल । म्हणुनि धजलों तव स्तवना ॥ १० ॥ काव्याचा कठीण कारभार ।

जाड्या शब्दांचे अवडंबर । संस्कृत वाणीचा संभार । मुळींच नसे मजपासी ॥ ११ ॥ स्मरुनी श्रीगुरुमाऊली । वाहतों शब्द कुसुमावली । या भोळ्या बोबड्या बोलीं । प्रसन्न होई बाळासी ॥ १२ ॥ आधींच देह अमंगळ । त्यावरी अज्ञान काजळ । हृदयीं ज्ञानज्योत निर्मळ । प्रगटलीच नाहीं ॥ १३ ॥ मग काव्याचा सुगंध । मजसी कोठला निर्बंध । परी तव महिमा अगाध । पोहोंचवील मज परतीरा ॥ १४ ॥ मी असे पतीत अज्ञानी । परी तूं माझी कुलजननी । तरी अंबे भवानी । भाग्यवंत करी मज ॥ १५ ॥ नको मज देहाचें सुख । करी माझ्या कर्माची राख । मन्नेत्र पाहोंत तव मुख । हेचि मागणें स्वामिनी ॥ १६ ॥ ज्या कुळीं मज जन्म दिधला । सदा रक्षी त्या मत्कुला । पूर्वज नेउनी स्वस्थळा । अक्षय पदीं स्थापिगे ॥ १७ ॥ कृष्णे गंगे गोदावरी । अमरजा सावित्री । पंच कन्या गायत्री । धरित्री रूप तूंचि माये ॥ १८ ॥ जय महिषासुरमर्दिनी । महामाये मोक्षदायिनी । भक्त मनोव्यथा नाशिनी । तुळजापुर भवानी

नमोनमः ॥ १९ ॥ कलकत्याची कालीमाता । कैवल्य संस्थानीं श्रीशांता । जगदंबा करवीर प्रांता।तूंचि होसी एकरूप ॥२०॥ मीं पतीत अल्पमती । करूं ठाकलों तव स्तुती । जैसा पतंग दीप ज्योती । पकडूं पाहे मायावशे ॥ २१ ॥ रती भर नसे काव्य ठाव । मजसी शब्दांचा अभाव । करूं पहातों तुझें गाव । हास्यास्पद मुळींच ॥ २२ ॥ परी धरुनी संतकांस । श्रीगुरु पदकमल सुरस । ध्यातों हृदयीं कोमल मूर्तीस । जगन्माये तूझिया ॥ २३ ॥ नेणता मी जाणून । मजसी देई दिव्य ज्ञान । प्रेम दृष्टीं अवलोकुन । पाहे मजकडे मातोश्री ॥ २४ ॥ बाळाविषयीं पूर्ण ममता । एक मातेसीच योग्यता । मातृहृदय जाणता। मातेविण अन्य नसे ॥ २५ ॥ बाळ नोळखी मातेसी । तिचें मन बाळा पासी । ऐसें माझिया नेत्रेसी । तूंच अवलोकिसी ॥ २६ ॥ मग आतां कां रुससी । नको भ्रमवूं मच्चित्तासी । टाकीं मेळवोनि प्रेमरसीं । तत्स्तुती तीर्थी बाळासी ॥ २७ ॥ मीं असे पतीत खळ । तूं शोभविलें मत्कुळ । जेवीं माता स्नेहाळ । ओढीबाळ

पितयाकडुनि ॥ २८ ॥ ऐसी ऐकिली तव कीर्ती। म्हणुनि ध्याइली सुंदर मूर्ती। करी माझी उदर पूर्ती। कथा मृत पय देवुनी ॥ २९ ॥ सोनियाचा किरिट । तुझिये डोयीं शोभे नीट। वरी रत्नजडित थाट । लखलखाट हिऱ्या मोतियांचा ॥ ३० ॥ विशाल भाल आकर्ण नयन। टिळा चिरी शोभायमान। दाभणी काप मुगुट जाण। भाली कर्णी शोभती ॥ ३१ ॥ कंठी सतेज मंगलसूत्र। दोनवेळा वरिला त्रिनेत्र। ज्याचें दर्शन सौभाग्य दात्र। तो श्रीशिवशंकर ॥ ३२ ॥ आणीख शोभे गळसरी। वज्रठीक ठुशी सारी। दंडीवाकी तुलबंधी भारी। पाटली कारली मणगटीं ॥ ३३ ॥ दशांगुली रत्नें चमकती। चहूंकडे प्रकाश देती। रत्नमय दंतपंक्ती। शोभें कुंदकळ्या समान ॥ ३४ ॥ शोभे उन्नत उरोभाग। त्यावरी खेळती फणिनाग। पान्हा फुटतां महाभाग। गजानन षण्मुख आनंदती ॥ ३५ ॥ वरी शोभे वैजयंती । स्कंद आणि गणपती । दुग्धासाठीं भांडती। प्रेम विनोद हृदयांत ॥ ३६ ॥ कोमल जगदंबा चरण । जोडवी मासोळी

पैंजण । रुमझुम वाजतां ध्यान । विसरे श्रीजगन्नाथ ॥ ३७ ॥ आपाद मस्तकपर्यंत । पुनः ध्यावे रूप हृदयांत । मुखकमलीं मधुरस्मित । शोभे नथ नासिकीं ॥ ३८ ॥ किरिटापासूनि पाद मत्स्य । ध्यायीं तुझें अज्ञान-वत्स । त्याचें निवारोनि आलस्य । तव कथारसीं जागवावें ॥ ३९ ॥ आई मज देईवर । तव स्तोत्र गावोत नारीनर । तारुनि दुस्तर भव सागर । नेई सकला अक्षयपदीं ॥ ४० ॥ विकारांचें नको नांव । विचारांची असो हांव । फल पुष्प भारें लवो गांव । दुःख जावो पळोनी ॥ ४१ ॥ जगी नांदो आनंद । हृदयीं प्रकाशो आनंदकंद । अवतरो श्रीगोविंद । पुनः पुनः या जगीं ॥ ४२ ॥ तूं आमुची कुलस्वामिनी । आम्हां घेतलेसि ओढुनी । मनीं कुलाभिमान राखुनी । रक्षी आम्हां सर्वस्वें ॥ ४३ ॥ काम क्रोधांचा अनिवार । होतो मजवरी मार फार । आई धावें तार तार । सोडवी मज पापांतुनी ॥ ४४ ॥ माझिये पापाच्या राशी । न मोजविती कोणासी । बोल न लागो कुलासी । मोहातुनी रक्षी

जगदंबे ॥ ४५ ॥ दैन्य पाप आणि ताप। निरसोनि जावोत आपोआप। हरीहर कीर्तन आलाप । सुस्वर श्रोतीं ऐकवीं ॥ ४६ ॥ तूं दीनांची मावली । मजकरी कृपा सावली । घालूनिया ज्ञानांजली। सावध सत्वरी करी मज ॥ ४७ ॥ कर्माची गती गहन। कोणां नावरे मनोव्यथन । होतें बहुत दुःसहजीवन। धांव पांव गे माये ॥ ४८ ॥ भवाब्धींत दुष्टकालें । मम-संसार यान डळमळले । जणूं वादळ बहू झालें । पूर्व-कृत ॥ ४९ ॥ या दुःखांतुनी न सोडविसी । तरी जन हांसतील तुसी । भूक लागली बाळकासी । तरी आईच शमवी ॥ ५० ॥ तरी माते धावें वेगें । आतां स्तब्ध बसली कांगे । आईस पान्हा फुटो न लागे । ऐसें कधीं घडलें नसे ॥५१॥ श्रीगुरु दासानुदास तुझा सुत। इतुकेनि मी भाग्यवंत । जरी एरव्हीं पतित । तरी तुझें त्वां जपावें ॥ ५२ ॥ तूं विद्या साक्षात । महासरस्वती शोभत । मसी ठेविसी अज्ञानांत । तरीतें हास्यास्पद ॥ ५३ ॥ तूं साक्षात महालक्ष्मी । दारोदारीं हिंडतो मी। द्रव्य मिळविण्या उपाय

नामी । सेवा करितो दुसऱ्याची ॥ ५४ ॥ तुझी पादपद्मा-
स्तुती । असावी मज काव्यप्रीती । सद्गुरुसेवा सदा ती ।
निष्काम भक्ती असावी ॥ ५५ ॥ शांतादुर्गा
शांतनाम । शांतमूर्ती शांतधाम । शांतशक्ती
शांतप्रेम । शांतिरूप आदिमाया ॥ ५६ ॥ नमो जग-
दंबे कुलदेवी । साक्षात विद्या-सिद्ध देवी । माझिया
हस्तें लिहवी । श्रीहरिहरेश्वर लीलामृत ॥ ५७ ॥ उदयोस्तु
उदयोस्तु म्हणतां । मोक्ष येईल हाता । तव भजनगुण
गातां । सर्व सिद्धी तात्काळीं ॥ ५८ ॥ मी जरी भाग्य-
हीन । तरी तुज सदा शरण । शरणांगतांचें रक्षण ।
हेंचि ब्रीद तुज शोभे ॥ ५९ ॥ तूंचि जगाची माता ।
श्रीजनार्दन जनता । श्रीगुरुमाउली म्हणतां । अधिकाररूपें
शोभसी ॥ ६० ॥ तव शक्तीनें भगवंत । परब्रह्म त्रिगु-
णातीत । युगायुगीं अवतार घेत । साधूसज्जनरक्षणार्थ
॥ ६१ ॥ तूंचि होवोनि अत्रिजाया । दाविली अनिवार-
माया । त्रैमूर्तींची दिव्य काया । बनविलीस बाळरूपें
॥ ६२ ॥ श्रीशंकर झाले दुर्वास । साधूंचा तोडावया

पाश । ब्रह्मा होवोनि हिमांश । जना आनंदवी पौर्णिमेसी ॥ ६३ ॥ श्रीविष्णू भगवान । साधावया जग कल्याण । श्रीदत्त नामाभिधान । घेती जन सुखावया ॥ ६४ ॥ भवनाढ्य वैचित्र । तूंचि असती सकल सूत्र । भक्तजना इह परत्र । सुख देसी जगदंबे ॥ ६५ ॥ तुझीं नामें अनंत । तूं सदयमूर्ती शांत । तव करणी अगाध अत्यंत । दयासागर वत्सले ॥ ६६ ॥ सकल आलस्य सोडोनी । जे लागती तव भजनीं । डोलतील मधुरगानीं । ब्रह्मानंदें नाचती ॥ ६७ ॥ क्रोध तयांसी करील काय । न चले कामाचा उपाय । मद सकल जिरोनि जाय । दग्ध होई मत्सर ॥ ६८ ॥ लोभ न ठाके पुढती । जेथें कवी तव गान गाती । सकल रिपू पळती । तव इच्छामात्रें ॥ ६९ ॥ तव इच्छें वागती ग्रह । होती दुर्जनासी दुःसह । सज्जनांसी त्यांचा दाह । न होई त्वत्कृपें ॥ ७० ॥ जय जय शांता शांता । ऐसे वाचे प्रेमें वदतां । ब्रम्हध्वनीं तत्वतां । उमटेल हृदयाब्जीं ॥ ७१ ॥ ये रितीं करी मज धन्य । नको मज कांहीं अन्य । तव गुण नव्हती

सामान्य । मज पूर्ण अनुभव असे ॥ ७२ ॥ वयासी असतां वर्षें बारा । आला होता ग्रहदशाफेरा । अंगीं विष भिनुनी सैरवैरा । अंथरूण धरिलें लेखकें ॥ ७३ ॥ ते वेळीं पुण्यपुरीं । केले सकल उपाय भारी । गुण येइना अणुभरी । व्याकुळ जननी जाहली ॥ ७४ ॥ तूं कृपाळू जगन्माता । तये वेळीं दावोनि ममता । जननीस देवोनि दृष्टांता । पाठविलेसि मंडणगडीं ॥ ७५ ॥ तेथें आमुचे मातुळ । भाऊसाहेब पुण्यशील । उपनाम रेगे उज्वल । खोत मंडणगडाचे ॥ ७६ ॥ तये घरीं सुखासनीं । बसली आहेसि पुण्य शोधनी । जलामृत पाजितां तुज स्मरुनी । मद्देहींचें विष उतरिलें ॥ ७७ ॥ सर्व देह निर्मळ झाला । ऐशिया देवोनि जीवनाला । मजवरी उपकार केला । उत्तीर्ण नोहे कल्पवरी ॥ ७८ ॥ मातृऋण कधीं न फिटे । जरी जहालें ज्ञान फुटें । मातेपुढें लटपटे । ज्ञानी असों कीं संन्यासी ॥ ७९ ॥ माते माझिया देहाचें । कातडें काढूनि साचें । पादत्राण बनविलें त्याचें । तरी कल्पनाहि योग्य नव्हे

॥ ८० ॥ मम देह अमंगळ । तव चरण अत्यंत कोमल । स्पर्शितां तव चरणकमल । फोड येतील भीती मज ॥ ८१ ॥ वाटे देहाची कुरवंडी । तव वरूनी करावी आवडीं । परी रोमरंध्रीं अज्ञानबेडी । न तुटे सहसा ही ॥ ८२ ॥ असो तुझे उपकार अनंत । आमुचे कुलावरी होत । येथें वर्णन करितां समस्त । ग्रंथ विस्तारेल बहुतची ॥ ८३ ॥ तरी आतां ऐसें व्हावें । तव स्मरण सतत असावें । तव दास्यीं सदा रहावें । आमुच्या वंशजें ॥ ८४ ॥ आमुचे उत्तम कुलांत । उपजोत कुलीन कन्या सुत । ज्यायोगें पूर्वजाप्रत । प्राप्त होईल तव पद ॥८५॥ पिता शंकर माता भवानी । हाचि वसो भाव मनीं । श्रीसद्गुरू विद्याधनी । सेवोत माझिये वंशज ॥ ८६ ॥ भाविक आणि भाग्यवंत । पुण्यवान आणि पवित्र । सुशील सदाचारी सर्वत्र । सुकीर्ती होवो तयांची ॥ ८७ ॥ शास्त्रीं सांगितलें प्रमाण । सुपुत्र जैसा धनुष्यीं बाण । एकतरी व्हावा निर्माण । जो उद्धरील सकळ पिढ्यांसी ॥ ८८ ॥ मदेहीं बहुत पाप । होतो मजसी

पश्चात्ताप । मी नव्हे पूर्ण निष्पाप । योग्य नव्हे वंशकाजा ॥ ८९ ॥ माता शिणविली बाळपणीं । गर्वें उन्मत्त तरुणपणीं । काय होईल वृद्धपणीं । तूंचि जाणसी जगदंबे ॥९०॥ तूं मजसी जिवदान दिलें । त्याचें म्यां काय भलें । न जाणें काय केलें । वाटे व्यर्थचि वांचुनि ॥ ९१ ॥ तूं जरी करिसील कृपा । तरी मार्ग होईल सोपा । जाळुनियां सकल पापा । शुद्ध होईन अंतर्बाह्यीं ॥ ९२ ॥ मग तुझें नाम गावया । अनंतमूर्ती ध्यावया । सद्गुरुचरण सेवाया । योग्य होईन तात्काळीं ॥ ९३ ॥ माझें सुखस्वप्न ऐसें । नको भंगूं सुरसे । माझिये मनीं दाटो पिसें । तव भजनाचें सदोदित ॥ ९४ ॥ जय शांते गौरी गिरिजे । झणीं प्रसन्न होयिजे । कृपादृष्टीं अवलोकिजे । अज्ञान बाळकासी ॥ ९५ ॥ तूं असती प्रीतिदेवता । तूंचि नीतीन्यायदेवता । अखंड समाधी लाविसी ज्ञाता । तूंचि देवी परमानंदें ॥ ९६ ॥ सर्व जगत कर्माधीन । कर्म असे तुझिया आधीन । तुझिये प्राप्त झालिया ज्ञान । मग कर्म काय करी ॥ ९७ ॥ जय हेमलते दाक्षायणी । चंद्रभागा

चंद्रायणी । पार्वती सांबरमणी । कौमारी कैवल्यवासिनी ॥९८॥ गंगा भागिरथी गोदावरी । कृष्णा वेणा कावेरी । नर्मदा सिंधु सावित्री । सर्वतीर्थरूप तूं ॥ ९९ ॥ जय शांतादुर्गा आई । जय महालक्ष्मी माई । जय महालसा बाई । देई मज दूध लोणी ॥ १०० ॥ जय मंगेश मनोहारिणी । जय अंबे कुलस्वामिनी । अनंत ब्रम्हांडरूपिणी । पाव गे आदिमाये ॥ १०१ ॥ जय जय महासावित्री । जय जयाजी धरित्री । जय जयाजी गायत्री । दुमदुमलें जगत् जयकारें ॥१०२॥ उदो बोला उदो बोला । अंबाबाईच्या नांवाला । जगन्माउलीची प्रेमलीला । नांदो सदा स्वानंदें ॥ १०३ ॥ जगदंब जगदंब म्हणुन । माझी वाचा घेवो ज्ञान । सदोदित लेखन वाचन । असो भगवतीगुणांचें ॥ १०४ ॥ शांत होवोनि कवळ्यास । शांत कराया सद्भक्तांस । मारुनि दुष्ट असुरांस । वससी तेथें जगदंबे ॥ १०५ ॥ तीच मूर्ती महालक्ष्मी । बांधवडी मुक्कामीं । महालसा महाडदोळ ग्रामीं । सदा नांदसी भक्तास्तव ॥ १०६ ॥ तीच तूं श्रीजोगेश्वरी । वास करिसी श्रीहरिह-

रेश्वरीं । भक्तकाज कैवारी । उभी सदा तिष्ठसी तूं ॥ १०७ ॥ जें स्थान अत्यंत पवित्र । तेथें तव वास सर्वत्र । सुखी ठेविसी कुलकलत्र । भजन तुझें केलिया ॥ १०८ ॥ ह्या ओंव्या एकशें आठ । श्रोते करा प्रेमें पाठ । ही स्तुति समुद्रलाट । निघाली मुक्तिमंदिरा ॥ १०९ ॥ कीं ही वाग्वैजयंती । ठेविली श्रीपादपद्मावर्ती । हृदयीं दाटली अखंड प्रीती । अष्ट भाव दाटले ॥ ११० ॥ कीं करावया वैरीयांचें हनन । सुटले हे अमोघ बाण । कीं हें अमृताचें सांठवण । मृतांसाठीं सांचिलें ॥ १११ ॥ जिवंत असोनि मृतासम । कोणी असतील माझ्यासम । त्यांनीं वाचितां ऐकतां सुगम । अवगत चहुं पुरुषार्थ ॥ ११२ ॥ बालकाचे बोबडे बोल । मातृ हृदयीं बैसती खोल । यासीं मुळीं नसे मोल । जरी धराल आदरें ॥ ११३ ॥ मज करूनी निमित्तमात्र । श्रीहरिहरलीलामृत । आदिमायास्तोत्र । श्रीसद्गुरु लिहविती ॥११४॥ श्रीहरिहर लीलामृत । पारायण प्रदक्षिणा प्राकृत । अर्धे संपविली येथ । श्रीगुरुकृपाप्रसादें ॥ ११५॥

शास्त्रीं लिहिलें प्रमाण । संपालिया अर्ध प्रदक्षण । थांबोनिया अर्धक्षण। नमस्कार करावा॥ ११६॥म्हणुनीं चुंबिले श्रीचरण। धरोनिया निजकर्ण। चुकाया दुःख भय मरण । नमस्कार घातला साष्टांगें ॥ ११७ ॥ प्रेमें स्तविला श्रीगुरुनाथ । जगदीश अपर्णानाथ । अक्कलकोटस्थ स्वामी समर्थ। सिद्धेश्वर सिद्धनाथ ॥ ११८ ॥ देवा माझी लेखणी । स्तब्ध राहिली तव गुणवर्णनां । जेथें खुंटली ब्रह्मनंदिनी । तेथें ही बापुडी काय करी ॥ ११९ सद्गुरु श्री स्वामीसमर्थ । पुढें दाखवाजी सुपंथ । दासासि प्रसन्न श्रीगुरुनाथ । अश्वासित ते वेळा ॥ १२० ॥ श्रीहरिहरेश्वरलीलामृत । तुज करीं लिहवीन समस्त । परि त्वां न व्हावें गर्व भ्रांत । चित्तीं शुद्ध रहावें ॥ १२१ ॥ या कली कर्म अवनी । माझें माझें म्हणती प्राणी । अभिमानें जाती फुलोनी । न जाणती परमेशा ॥ १२२ ॥ सकल ईश्वराधीन । मान व निमित्त मात्र कारण । मग कां धरावा वृथाभिमान । मी मीपणाचा ॥ १२३ ॥ ऐसें बोधोनि श्रीगुरुवर । हृदयस्थ सिंहासनावर । स्वानंदें बैसले प्रेमसागर । आशि-

वंचन देउनि ॥ १२४ ॥ कर्ता करविता नारायण । त्यानें केलें मनीं प्रेरण । श्रीहरिहरलीलामृत श्रवण । भक्त्यादरें करूंया ॥ १२५ ॥ रघुनाथनंदन नामधारक । श्रोतियां- विनवुनीं देई भाक । आदरें श्रवण करा कौतुक । श्रीहरि- हर आदि मायेचें ॥ १२६ ॥ पुढें कथा अत्यंत सुरस । वदवितील समर्थ राजस । सावध करोनि कर्णनेत्रांस श्रोतीं प्रेमरसीं मिळावें ॥ १२७ ॥ श्रीहरिहरेश्वरलीला- मृत । श्रीस्वामीसमर्थ लिहवित । आदरें परिसा सज्जनसंत । पंचमोऽध्याय गोड हा ॥ १२८ ॥ श्रीगुरुदेव दत्त अवधूत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

## अध्याय ६ वा.

श्रीगणेशाय नमः । ॐ नमः सिद्धं । ॐ नमो श्रीहरिहरेशा । सच्चिदानंद सुरेशा । मायातीता पुराणपुरुषा । तुझी लीला वदवीं पुढें ॥ १ ॥ चवथ्या अध्यायीं भगवान । स्कंद अगस्तीस करती कथन । तीर्थ क्षेत्र महिमान । श्रोतीं साद्यंत वाचिलें ॥ २ ॥ पुढें अगस्ती महामुनी । हरीहरमूर्ती विलोकिती नयनीं । रूप सुंदर मन्मथाहुनी । पहातां देहभान हरपलें ॥ ३ ॥ सुरम्य हरिहरस्थान । कल्पवृक्षांचें आच्छादन । सर्वत्र पसरिलें म्हणुन । शीतल वाटे अत्यंत ॥ ४ ॥ वाटे साक्षात कैलास । कीं श्रीलक्ष्मीनिवास । योग्य जलसुधारस । या क्षेत्रभूमीचें ॥ ५ ॥ ये क्षेत्रभूमाता । पुरवी सकल ममता । येथिंचे दगड पहातां । चिंतामणिसम शोभती ॥ ६ ॥ येथील जलकुंडांत । दिव्य रस भरले अनंत । वनस्पतीजन्य ज्योत । सदा प्रकाशे ये क्षेत्रीं ॥ ७ ॥ कमलमाला वनमाळा । येथिंचे जन घालोनि गळां । लक्ष्मीपती जाश्वनीळा । समान शोभताती ॥ ८ ॥ आद्यपुरुषाच्या अवतारलीला ।

चमकती तेजें वेळोवेळां । तेवीं अनंत वनमाला । श्रीप· र्वतराया शोभविती ॥ ९ ॥ महा विष्णू शोभे सर्वधर्मे । तेवीं आज बाजूस प्रेमें । शांत घन गंभीर नामें । जल- प्रवाह वहातसे ॥ १० ॥ पांथस्थ उन्हानें संतप्त । होवो· नि दाट छायें जात । कीं भवदुःखें होवोनि तप्त । शांति· सुखार्थ जाती सद्गुरुपाशीं ॥ ११ ॥ अशोकवृक्षाखालीं बैसोन । सुख पावती कामी जन । परस्परांचें दर्शन । स्पर्श· नेंहि पाप नासे ॥१२॥ जेवीं सच्छिष्य भाग्यवंत । श्रीगुरु· सेवा करुनी अखंडित। ब्रम्हसुखानुभव घेतात । तेवीं अनु- भवती सिद्धदंपत्यें ॥ १३ ॥ येथें जे करिती वास। त्यासि नसे दुःखभास। जेवीं तृप्त योगियास । यमदुःख नसे कदा ॥ १४ ॥ जिवन्मुक्त येथें रहाती । तेवीं पशुपक्षी- ही वागती । स्वाभाविक शत्रुत्व टाकिती । निर्भयें रहाती ये क्षेत्रीं ॥ १५॥ ये स्थळींचे जन। सदा करिती आत्म- संयमन । कोणीं दुष्कृत्यें करून । दुःखांत पडत नसे येथें ॥१६॥ शांत दांत शुभलक्षणी। ऐसे क्षेत्रवासी जाणीं। दिव्य श्रीपर्वत पाहोनी । जन्म साफल्य होतसे ॥ १७ ॥

शास्त्रीं लिहिलें प्रमाण । संपलिया अर्ध प्रदक्षण । थांबोनिया अर्धक्षण। नमस्कार करावा॥ ११६॥म्हणुनीं चुंबिले श्रीचरण। धरोनिया निजकर्ण। चुकाया दुःख भय मरण । नमस्कार घातला साष्टांगें ॥ ११७ ॥ प्रेमें स्तविला श्रीगुरुनाथ । जगदीश अपर्णानाथ । अक्कलकोटस्थ स्वामी समर्थ। सिद्धे-श्वर सिद्धनाथ ॥ ११८ ॥ देवा माझी लेखणी । स्तब्ध राहिली तव गुणवर्णनां । जेथें खुंटली ब्रह्मनंदिनी । तेथें ही बापुडी काय करी ॥ ११९ सद्गुरु श्री स्वामीसमर्थ । पुढें दाखवाजी सुपंथ । दासासि प्रसन्न श्रीगुरुनाथ । अश्वासित ते वेळा ॥ १२० ॥ श्रीहरिहरेश्वरलीलामृत । तुज करीं लिहवीन समस्त । परि त्वां न व्हावें गर्व भ्रांत । चित्तीं शुद्ध रहावें ॥ १२१ ॥ या कली कर्म अवनी । माझें माझें म्हणती प्राणी । अभिमानें जाती फुलोनी । न जाणती परमेशा ॥ १२२ ॥ सकल ईश्वराधीन । मान व निमित्त मात्र कारण । मग कां धरावा वृथाभिमान । मी मीपणाचा ॥ १२३ ॥ ऐसें बोधोनि श्रीगुरुवर । हृदयस्थ सिंहासनावर । स्वानंदें बैसले प्रेमसागर । आशि-

वचन देउनि ॥ १२४ ॥ कर्ता करविता नारायण । त्यानें केलें मनीं प्रेरण । श्रीहरिहरलीलामृत श्रवण । भक्त्यादरें करूंया ॥ १२५ ॥ रघुनाथनंदन नामधारक । श्रोतियां-विनवुनीं देई भाक । आदरें श्रवण करा कौतुक । श्रीहरि-हर आदि मायेचें ॥ १२६ ॥ पुढें कथा अत्यंत सुरस । वदवितील समर्थ राजस । सावध करोनि कर्णनेत्रांस श्रोतीं प्रेमरसीं मिळावें ॥ १२७ ॥ श्रीहरिहरेश्वरलीला-मृत । श्रीस्वामीसमर्थ लिहवित । आदरें परिसा सज्जनसंत । पंचमोऽध्याय गोड हा ॥ १२८ ॥ श्रीगुरुदेव दत्त अवधूत.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

---

## अध्याय ६ वा.

श्रीगणेशाय नमः । ॐ नमः सिद्धं । ॐ नमो श्रीहरिहरेशा । सच्चिदानंद सुरेशा । मायातीता पुराणपुरुषा । तुझी लीला वदवीं पुढें ॥ १ ॥ चवथ्या अध्यायीं भगवान । स्कंद अगस्तीस करती कथन । तीर्थ क्षेत्र महिमान । श्रोतीं सांग्रंत वाचिलें ॥ २ ॥ पुढें अगस्ती महामुनी । हरीहरमूर्ती विलोकिती नयनीं । रूप सुंदर मन्मथाहुनी । पहातां देहभान हरपलें ॥ ३ ॥ सुरम्य हरिहरस्थान । कल्पवृक्षांचें आच्छादन । सर्वत्र पसरिलें म्हणुन । शीतल वाटे अत्यंत ॥ ४ ॥ वाटे साक्षात कैलास । कीं श्रीलक्ष्मीनिवास । योग्य जलसुधारस । या क्षेत्रभूमीचें ॥ ५ ॥ ये क्षेत्रभूमाता । पुरवी सकल ममता । येथिंचे दगड पहातां । चिंतामणिसम शोभती ॥ ६ ॥ येथील जलकुंडांत । दिव्य रस भरले अनंत । वनस्पतीजन्य ज्योत । सदा प्रकाशे ये क्षेत्रीं ॥ ७ ॥ कमलमाला वनमाळा । येथिंचे जन घालोनि गळां । लक्ष्मीपती जाश्वनीळा । समान शोभताती ॥ ८ ॥ आद्यपुरुषाच्या अवतारलीला ।

चमकती तेजें वेळोवेळां । तेवीं अनंत वनमाला । श्रीप-
र्वतराया शोभविती ॥ ९ ॥ महा विष्णू शोभे सर्वधर्में ।
तेवीं आज बाजूस प्रेमें । शांत घन गंभीर नामें । जल-
प्रवाह वहातसे ॥ १० ॥ पांथस्थ उन्हानें संतप्त । होवो-
नि दाट छायें जात । कीं भवदुःखें होवोनि तप्त । शांति-
सुखार्थ जाती सद्गुरुपाशीं ॥ ११ ॥ अशोकवृक्षाखालीं
बैसोन । सुख पावती कामी जन । परस्परांचें दर्शन । स्पर्श-
नेंहि पाप नासे ॥१२॥ जेवीं सच्छिष्य भाग्यवंत । श्रीगुरु-
सेवा करुनी अखंडित । ब्रम्हसुखानुभव घेतात । तेवीं अनु-
भवती सिद्धदंपत्यें ॥ १३ ॥ येथें जे करिती वास । त्यासि
नसे दुःखभास । जेवीं तृप्त योगियास । यमदुःख नसे
कदा ॥ १४ ॥ जिवन्मुक्त येथें रहाती । तेवीं पशुपक्षी-
ही वागती । स्वाभाविक शत्रुत्व टाकिती । निर्भयें रहाती
ये क्षेत्रीं ॥ १५॥ ये स्थळींचे जन । सदा करिती आत्म-
संयमन । कोणीं दुष्कृत्यें करून । दुःखांत पडत नसे येथें
॥१६॥ शांत दांत शुभलक्षणी । ऐसे क्षेत्रवासी जाणीं । दिव्य
श्रीपर्वत पाहोनी । जन्म साफल्य होतसे ॥ १७ ॥

अगस्तीस हा अनुभव । म्हणोनि करूं लागले वास्तव । जाणोनि क्षेत्रमहात्म्य अभिनव । घोर तप आरंभिलें ॥ १८ ॥ शुक्लतीर्थ गंभीर । ज्यांचें स्मरणें कर्मांचा चूर । त्याजवळी तपश्चर्या थोर । अगस्ती मुनींनीं आरंभिली ॥ १९ ॥ त्रिरूपात्मक श्रीशिवलिंग । स्थापन करिती गिरिवर चांग । जप करुनी एकाक्षर अभंग । दंग जाहले आत्मरूपीं ॥ २० ॥ सिद्ध स्थळाच्या प्रभावानें । आणि मुनीच्या तपःतेजानें । कोटी मायेच्या योगानें । लिंगांतुनी प्रगटला महापुरुष ॥२१॥ कोटी भास्कराचा प्रकाश । कीं कोटी विजांची रास । कोटी चंद्र सम शांत तेजस । तेवीं रूप पुरुषाचें ॥ २२ ॥ वाटे तयाच्या मुखावरून । ओंवाळून टाकावे कोटि मदन । सकळ सुर करिती वंदन । जयजयकारें गर्जती ॥ २३ ॥ तयाचा महिमा अनंत । तयाचें नाम अनंत । तयाची शक्ती अनंत । न वर्णवे कोणासी ॥ २४ ॥ रत्नें चकाकती मुकुटावरी । त्यांचा प्रकाश पडे बाहूवरी । त्या तेज ज्योतींनीं अधांतरीं । मंदीर जणुं उभारिलें ॥२५ ॥ हेम-

रेखांकित मुकुट । त्यावरी बसविले हिरे नीट । कर्णीं कुंडल तेज थाट । लखलखाट चहूंकडे ॥ २६ ॥ भालीं मंगल चंद्र । नेत्र विलक्षण सुंदर । दंत अत्यंत शुभ्र अगणीत कपोलकांती ॥ २७ ॥ ओष्ठ रक्तवर्ण दिसती । त्यांतूनि अमृतस्राव होती । नासाग्रीं दृष्टी होती । त्या महापुरुषाची ॥ २८ ॥ भिंवया जेवीं अमोघ बाण । जेव्हां करिती चलन । वाटे तेव्हां ब्रम्हांड जाण । नाचवीत कौतुकें ॥ २९ ॥ करुनी प्रसन्नतेनें स्मित । उभा ठेला जगन्नाथ । वैजयंती गळ्यांत । शोभत होती ज्याचिया ॥ ३० ॥ तेजःपुंज आजानुबाहू । त्यांत शोभती तीं आयुधें पाहूं । जीं करिती स्वेच्छें नाहूं । भक्तांच्या रिपुरक्तें ॥ ३१ ॥ भक्त दयाळू देवाधिदेव । शंख चक्र गदा माव । ढाल दंड तलवारलांव । भाला अर्गळा मुसळही ॥ ३२ ॥ तो पीतांबरधारी । अनेक भूषणें देहीं धरी । घुंगुर बांधिले कमरीं । पट्टा शोभे मकराकृती ॥ ३३ ॥ कौस्तुभ चमके मध्यभागीं । जवाहिर लेई धवलांगीं । तयाचा प्रकाश जागोजागीं ।

लखलखे दिव्य प्रभा ॥ ३४ ॥ बिरुडे आणि तोडर। दाविती पराक्रम थोर। ऐसा भगवन् श्रीहरिहर। दिव्य पुरुष मंगलमूर्ती ॥ ३५ ॥ जयाचे असती अगम्य गुण। जो असे सकलांचा प्राण। देहवाचा आणि मन। यांत असुनी निराळा ॥ ३६ ॥ ऐसा तो पुरुषोत्तम। परब्रह्म परमधाम। धरुनी सगुण रूप नाम। उभा ठाकला मुनीपुढें ॥ ३७ ॥ दिव्यासन मांडून। इच्छा क्रिया शक्ती ज्ञान। ही जयें टाकिली अवरोधुन। मुनीसी दर्शन तो देई ॥३८॥ ॐकार नाद केला प्रगट। सर्वज्ञता अनादिबोध लाट। तृप्ती स्वातंत्रता तिखट। यासह झाला विराजमान ॥ ३९ ॥ बैसला उत्तम सिंहासनीं। जेवीं सुजनहृदयकमलिनी। त्यांत परमात्मा बैसोनी। आनंदवी भक्तांसी ॥४०॥ कीं सद्गुरूपरमहंस। स्मित वदनें दासास। द्यावया शांतिसुखास। मांडी घालोनि बैसले ॥ ४१ ॥ कीं देवी शांतादुर्गा। सोडोनी कैलासस्वर्गा। गोवें संस्थान कैवल्यदुर्गा। बैसली भक्ता सुखवाया ॥ ४२ ॥ कीं श्रीमंगेशी गिरिजाकांत। आनंद काननीं शोभत। गोकर्ण

महाबळेश्वर क्षेत्र । तेथेंहि शोभे दयाळू ॥ ४३ ॥ अथवा बांधिवडे मुक्कामीं । शोभे श्रीमहालक्ष्मी । महाडदोळ ग्रामीं । महालसा शोभत ॥ ४४ ॥ जगदंबा करवीर प्रांता । गौड देशीं कालिमाता । सुंदरस्वरूप देखतां । महानंद होतसे ॥ ४५ ॥ कीं शांत सुरम्यवनीं । श्रीसर· स्वती बैसे ध्यानीं । वीणा वाजवी मृदु करोनीं । तो नाद जाणती कविश्रेष्ठ ॥ ४६ ॥ कीं शौनकादिक ऋषी समस्त । मध्यें शोभे कवी सूत । शास्त्रें पुराणें सांगत । उद्धारार्थ जगाच्या ॥ ४७ ॥ तेवीं जगच्चालक । शोभला गणनायक । समोर शोभे रावणांतक । श्रीविष्णू गरुड वाहन ॥ ४८ ॥ ब्रह्मदेव शोभे सव्यांगीं । चतुर्वेद पाठक चांगीं । द्वारीं तिष्ठती अखंड योगी । हस्त जो- डोनी उभे सदा ॥ ४९ ॥ महा तेजी दिक्षा गुरू । लख- लखे अग्नी सुरू । त्याचे सव्यभागीं नारू । दक्षिणा उभी होती ॥ ५० ॥ यमदिशेस श्रीभैरव । बैसला अपर्णाधव । सुदर्शन चक्र अभिनव । ज्वाला निघती ज्यांतुनी ॥ ५१॥ उत्तम कमलासन । वरी बैसला हास्यवदन । आठशक्तिनें

युक्त असुन । मातृका मंडली शोभत ॥ ५२ ॥ दुर्गा-
कार्तिकेय गणपती । सरस्वती बैसली संभोंवती । अणि-
मादि सिद्धी सेवती । आठही जयासी सर्वदा ॥ ५३ ॥
सूर्यचंद्रादि ग्रहमाला । वसुरुद्रांचा भोंवतीं पाळा । जयाची
सेवा देवमाळा । करीत होती सप्रेमें ॥ ५४ ॥ पराअपरा
आप्ती । ज्यांची योग्यांसी न प्राप्ती । विद्वेच्छा प्रकृती ।
आणिक संगती मायाभुती ॥ ५५ ॥ अधिष्ठित झाल्या
सकलकला । जयाचे मस्तकीं निर्मेला । शेष नागफणी
बला । झांकलें तेज शरिरांचें ॥५६॥ कल्पतरूंची शीतल
राई । त्यांत बैसली जगताची आई । सुंदर आस-
नाचें रक्षण बाई । मनोहर विमानें केलें असे
॥ ५७ ॥ जो प्रेमाचा सागर । जो शांतीचें माहर ।
त्यासि अवलोकुनी मुनिवर । अष्ट भावें दाटिन्नला ॥५८॥
घातला साष्टांग दंडवत । जगदीशाची स्तुती करित ।
रोमांच अंगीं दाटत । नेत्रीं प्रेमाश्रु वाहती ॥ ५९ ॥
स्वानंदें मन भ्रांत । गळा प्रेमभरें दाटत । मुखें म्हणे नाथ
नाथ । पायीं मिठी मारिली ॥ ६० सर्व ताठा अभिमान।

सोडोनि घाली लोटांगण ।मग तो संकटनाशन । अभयकर ठेवी मस्तकीं ॥ ६१ ॥ तो कोमल करस्पर्श । सावध करी मोहपाश । जैसा अमृतें परामर्श । घेतां मृत अमर होती ॥ ६२ ॥ मग म्हणती श्रीकल्याण । मुने होवो तव कल्याण । शुभ कार्य कारण । वर उत्तम मागावा ॥ ६३ ॥ जे माझेचि भक्त । त्यासि या भुवनीं अप्राप्त । नव्हेचि कांहीं निभ्रांत । ज्यासि मी प्रसन्न ॥ ६४ ॥ स्कंद म्हणती कृपावलोकनें । आणि अमृतस्पर्शानें । गडबडला उज्वल वाणीनें । तो अगस्ती महामुनीं॥६५॥ क्षणएक स्तब्ध राहुनी । पुनःमूर्ती अवलोकुनी । तो धन्य अगस्ती मुनी । स्तुति करिता जाहला ॥ ६६ ॥ आनंदमूर्ती स्मित मुख । देखोनि मुनी पावे सुख । विसरला त्रिताप दुःख । डोलूं लागला स्वानंदें॥६७॥ अगस्तीं हृदयीं पूर्ण भक्ती । परमेशाची करी स्तुती । हे पुरुषोत्तम तव ख्याती । ब्रह्मादिकां उमजेना ॥ ६८ ॥ तूं चिदात्मा श्रेष्ठ जाण । तूं सर्व साक्षी नारायण । धरोनि तव मृदु चरण । नमन करितों साष्टांगीं ॥ ६९ ॥ जेवीं सागरीं उसळे लाट । तेवीं त्वत्स-

रुपाचा थाट । अखिल विश्व शोभे नीट । चोखट त्रिगुणात्मक ॥ ७० ॥ ज्यापासूनि निर्माण साकार । जो मुळीं निराकार । आत्मसंवेद्य प्राणाधार । त्यासी वंदन पुनः पुनः ॥ ७१ ॥ हें सकल व्यक्ताव्यक्त जग । उत्पन्न जाहलें आत्म्यांत चांग । निर्मिला सुमनांचा बाग । मायामोहें विस्तीर्ण ॥ ७२ ॥ तूं परमात्मा मूर्तिमंत । प्रगटलासी श्रीमंत । तेव्हां जाहलों मी भाग्यवंत । सकळ तप फळां आलें ॥ ७३ ॥ माझें जन्म आणि कुल । जहालीं आजी धन्य सुफल । नेत्रीं देखिला पयःफेनधवल । श्रीहरिहर जगदात्मा ॥ ७४ ॥ त्रिगुणात्मक त्रिलोचन । त्रिदोषहारक त्रितापशमन । त्रिपुरांतक त्रिवदन । हास्ययुक्त कोमलांग ॥ ७५ ॥ ज्ञानस्वरूप ज्ञानदेव । पूर्ण नाटकी अभिनव । तारी तारी भवार्णव । जगद्वंद्या जगदीशा ॥ ७६ ॥ जन्मसाफल्य होवोन । आत्मा श्रेष्ठपदीं होय लीन । त्या परम स्थितींत पूर्ण । विलसीत होते गुणरूप मायेचे ॥ ७७ ॥ प्रकृती गुणानें भासमान । होसी परमेशा सगुण । जो तूं निराकार निर्गुण । नटसी

अनुरूप लीलेनें ॥ ७८ ॥ धर्माचा व्हावा जय । म्हणुनी तुझा होईल उदय । निःपात करण्या दुःखदाय । परित्राणार्थ साधूंच्या ॥ ७९ ॥ विधी होवोनि चतुर । रचिलें हें विश्वांबर । पशूपक्षी नारीनर । वृक्षलता पाषाणादि ॥ ८० ॥ विष्णू होवोनि करिसी पालन । हृदयीं दयाठेवा ठेवुन । नानावतार घेवोन । राक्षिसी जना दयाब्धे ॥ ८१ ॥ रुद्रावतार घेवोन । पृथ्वीलय करिसी जाण । तूं कलाहीन असून । कला कार्तिकेय तूंचि होसी ॥ ८२ ॥ तूं लहान अणूपेक्षांही । मोठा मोठ्यापेक्षांही । स्थावर जंगम विश्व तूंही । अजन्मा जन्महीनही नव्हे ॥ ८३ ॥ महामायेच्या आधीन । तेव्हां होसी सगुण । येरव्हीं निराकार निर्गुण । गुणातीत तूंचि होसी ॥ ८४ ॥ इंद्रियादी अवयव । नसतां जाणसी सर्व । दुर्जनांचा हारिसी गर्व । विपुल तेजीं वास तुझा ॥ ८५ ॥ तूंचि असती सन्मूर्ती । तुझिये पदीं सकल कीर्ती । तूं द्वयातीत कल्याणमूर्ती । आनंदात्मक तूंचि स्वामी ॥ ८६ ॥ हे परापरा निर्बंधस्वरूपा । आत्मज्ञेया ॐकाररूपा ।

श्रीहरीहर विश्वरूपा । तुज नमन पुनः पुनः ॥ ८७ ॥
ऐश्या प्रकारें काव्य रीती । संस्कृत वाणीनें कवी अगस्ती ।
श्रीहरिहराची करूनी स्तुती । प्रसन्न करी परम पुरुषा
॥ ८८ ॥ पुरुषोत्तम शूलपाणी । बोलिला गंभीर वाणी
मी प्रसन्न तुज मुनी । वर इच्छित मागिजे ॥ ८९ ॥ परो-
पकारी मुनी अगस्ती । म्हणे निरंतर करी वसती । या
परमपूज्य उत्तम क्षेत्रीं । कल्याणार्थ भक्तांच्या ॥ ९० ॥
आणिक एक ऐसें व्हावें । तव दर्शनें सुख लाभावें ।
मन तव पदीं सदा रमावें । जिंकावे काम क्रोधादिक
॥ ९१ ॥ मग वदती भगवंत । मुनिश्रेष्ठ मद्भक्त ।
स्वदेही परोपकारार्थ । कष्टसी केवळ दयाळा ॥ ९२ ॥
तव मुखें वर्णिलें स्तोत्र । तें पठण करितील पवित्र ।
त्यासीं इहपरत्र । सुखी ठेवीन मत्पदीं ॥ ९३ ॥ त्यांसीं
मी सदा प्रसन्न । जे माझें करिती भजन । प्रेमें करितील
संकीर्तन । नाचेन त्यांपुढें आनंदें ॥ ९४ ॥ वत्सा तूं
जाणसी मनीं । जे सदा माझे भजनीं । गुंग असतील कर्म-
अवनीं । त्यांस सुलभ सर्वही ॥ ९५ ॥ जगांतील वस्त

दुर्लभ । त्यांचा होईल भक्तांसि लाभ । जे धरिती हृदयीं दंभ । त्यांचा शास्ता मीच असें ॥ ९६ ॥ जे या ग्रंथाचा आदर करिती । त्यासी न दारिद्र्यभीती । रिपुत्रासापासोनि मुक्ती । न बाधती दुःखरोग ॥ ९७ ॥ कलिदोषानें भयभीत । तरी त्यांसी रक्षीं मी अनंत । पुत्रहीनासि पुत्र प्राप्त । होईल मत्प्रसादें ॥ ९८ ॥ विद्याहीन असेल नर । त्यासी करीन काव्यचतुर । जणुं व्यासाचा अवतार । पुराणपुरुष कविमधें ॥ ९९ ॥ ॥ ९९ ॥ आयुरारोग्य वैभव । मत्कृपें प्राप्त होईल सर्व । ग्रंथपठणें संसारनाव । भवभय पार करील ॥ १०० ॥ माझे सर्व बालक । यासी म्हणतील अर्थसाधक । हें भाग्यवंतांचें कौतुक । माहेरघर होईल ॥ १०१ ॥ ऐसें वदतां श्रीहरिहर । सुरनरें केला जयजयकार । सिद्धगंधर्व चारण मुनिवर । पूजा करिती हरिहराची ॥ १०२ ॥ दिव्यांगना नृत्य करिती । ब्राह्मण वेद स्तोत्र गाती । गंधर्व गायन करिती । संत करिती कीर्तन ॥ १०३ ॥ श्रीहरिहरेश दिव्यलिंग । चहुं अर्थांचें कोठार अभंग । कीं जें

ब्रह्मदेवें तेजचांग। हृदयांत ठेविलें होतें ॥ १०४ ॥ तेंचि तेज होवोनि प्रसन्न। ये क्षेत्रीं पावलें उन्मन। व्हावया दुःख मृत्यूंचें हनन। संत सज्जन सुखवावया ॥ १०५ ॥ असो भगवंत पावले अंतर्धान। देवोनि उत्तम वर-प्रदान। सर्व देव करिती नमन। करिती स्तुति अग-स्तीची ॥ १०६ ॥ खरा साधू तूंचि होसी। ऐसें ह्मणती स्वर्गवासी। थोरवी साधूंची दासी। इतरा साध्य नव्हे हो ॥ १०७ ॥ या कलिकालांत कल्पतरू। केवळ एकचि श्रीगुरू। साधु समागम थोरू। न लभे गुरुकृपें विना ॥ १०८ ॥ संतसमागमाविण। कदा नोहे अनु-भवज्ञान। ज्ञानाविण वैराग्य शून्य। वैराग्याविण शांती नव्हेची ॥ १०९ ॥ असो श्रीस्वामी आज्ञेनें। तेहतीस कोटी देवानें। सिद्ध वनस्पतीचीं सानें। रूपें धरिलीं तात्कालीं ॥ ११० ॥ सकल सूक्ष्म रूपधारी। सिद्ध गंधर्व सुरवरीं। धरूनी रूपें दुहेरी। करिती पुजा लिंगाची ॥ १११ ॥ हरीहर पर्वतासी करोनि नमन। अगस्तीनें मयुराद्री स्थान। आपल्या योगमायेंकरुन। निर्माण जवळींच केलें असे

॥ ११२ ॥ तेथें अद्यापि वास करिती । संत सज्जन नयनीं देखती । दुर्जनासी सदा अधोगति । ते काय देखतील ॥ ११३ ॥ ज्या जवळी पुण्य ठेवा । तेचि पहातील अगस्ती देवा । असो त्या पासूनि देवाधिदेवा । श्रीहरिहरेश्वर म्हणताती ॥ ११४ ॥ जे शुक्रतीर्थी करोनि स्नान । श्री समर्थांचें घेतं दर्शन । पूर्ण कामीं ते जन । होतील दीर्घायुषी सत्य जाणा ॥ ११५ ॥ सलोकता नामक मुक्ती । प्राप्त होते करितां भक्ती । ऐसी श्रीशिवशक्ती । अनुभव घेती संतजन ॥ ११६ ॥ आतां मयुराद्री अगस्ती स्थान । त्याचें परिसा अद्भुत आख्यान । वढोसुद नामक एक स्थान । तेथें एक सोनार वास करी ॥ ११७ ॥ एके दिनीं श्रीदत्तमुनी । हिंडतां पातले ये स्थानीं । पूर्व पुण्य उदया आलें म्हणुनी । दर्शन जाहले त्या सोनारा ॥ ११८ ॥ तो फसव्या सोनार । परी देखिलें श्रीगुरुवर । तयासी करूनी नमस्कार । आदरातिथ्य केलें सद्गुरूंचे ॥ ११९ ॥ पुढें कांहीं कालें तो वंचक । यमपाशें झाला खाक । फसविले होते अनेक लोक । त्यामुळें

मयूरयोनीं जन्मला ॥ १२० ॥ मयूर गिरिवरीं अनु-
दिनीं । मधुर काढी केकाध्वनी । श्रीहरिहरेशदर्शनीं ।
दग्ध झालीं सकल पापें ॥ १२१ ॥ गिरिवरी दर्शना-
साठीं । उडोनि जाई अन्न न पोटीं । सर्व ज्ञान
बुद्धी लटपटी । व्यर्थ होती भूक तहाने पुढें ॥ १२२ ॥
भुकेची शांती न झाली । म्हणोनि प्राणज्योती
निमाली । भूक तहानें स्वर्ग बळी । बनती दास यज्ञाचे
॥ १२३ ॥ असो तो मयूर । त्यजोनि पंचप्राण जोर ।
शुक्र तीर्थीं पडला येर । पूर्वपुण्येंकरोनियां ॥ १२४ ॥
मयूर देहांतुनी सुटला । दिव्य देह तात्काळ पावला ।
अग्नीवत तेजें बनला । देवें बैसविला विमानीं ॥ १२५ ॥
स्वर्गीं उत्तम भोग भोगुन । कर्मभूमींत चिर भ्रमण ।
खेचर नामाभिधान । सिद्ध होवोनी अवतरला ॥ १२६ ॥
ऐसा शुक्रतीर्थाचा प्रभाव । दर्शनेंचि प्राप्त अनुभव ।
ज्या स्थळीं साधूंचें वास्तव । तोचि तीर्थराज जाणिजे
॥ १२७ ॥ नुसतें जल नव्हे तीर्थ । नलभे मुक्ती परमार्थ ।
जेथें बसती स्वामी समर्थ । तोचि तीर्थराज जाणावा

॥ १२८ ॥ तयाचे केवल दर्शनें । भक्तीयुक्त मनानें । करितां स्नानें दानें । अगाध पुण्य परियेसा ॥ १२९ ॥ या निःसत्व संसारीं । क्षण एक संतसंग जरी । घडेल तरी खरोखरी । संसार सुफल जाणावा ॥ १३० ॥ संसारांत लटपटी । संपत्ती यशादि खटपटी । कांहीं नको उठाउठी । योग्य एक संत समागम ॥ १४१ ॥ जयासी कलिकाल रोग । बाधूं पाहे सवेग । त्यानें धरावा संतसंग । मग मुक्ती तात्काल पुढें ॥ १३२ ॥ आपणां-सारखे करिती । ही साधूंची श्रेष्ठ महती । त्यांची योग्यता ख्याती । इतर कोणी न जाणे ॥ १३३ ॥ ज्या देशीं असती संत । तेथें वास करी भगवंत । त्या देशासी माझा दंडवत । सत्य सत्य त्रिवाचा ॥ १३४ ॥ असो तो पापी सोनार । पूर्वकर्में झाला मोर । प्रसन्न होतां श्रीहरिहर । उद्धार केला पापियाचा ॥ १३५ ॥ शरणागतांचें रक्षण । हेंचि भगवत्ब्रीद पूर्ण । जैसें भक्तांचें अंतःकरण । तैसेंचि तारण तयांचें ॥ १३६ ॥ अगस्ती मुनी चतुर । व्हावया जगदोद्धार । महालिंग स्थापिलें थोर । हरिहरेश पर्वतीं

॥ १३७ ॥ एके दिवशीं एकांतीं । लोपामुद्रा महासती । मुनीपत्नी लाण्यवती । प्रश्न करी स्वामीसी ॥ १३८ ॥ लोपामुद्रेचा अधिकार । मी वर्णूं न शकें पामर । विदुषी पवित्रता चतुर । थोर ख्याती तियेची ॥१३९॥ ती वदे हे स्वामिन् । हरिहर लिंग अवलोकुन । विस्मित झालें मन्मन । देखोनि महात्म्य पर्वताचें ॥ १४० ॥ जे यात्रा करिती ये स्थळीं । त्यासी प्रसन्न चंद्रमौळी । तरी मज सांगा ये वेळीं । साधन मोक्षप्राप्तीचें ॥ १४१ ॥ जे भक्त या स्थळीं । येवूं न शकती कदाकाळीं । त्यांस कोणतें कर्म बळी । पोहोंचवील मोक्षपदा ॥ १४२ ॥ परिसोनि पत्नी-वाक्य मधुर । प्रसन्न झाले मुनिवर । म्हणती प्रश्न केलासि थोर । लोकहित साधावया ॥ १४३ ॥ लोकां व्हावें मुक्तीज्ञान । म्हणोनि कथितों गुह्यज्ञान । हृदयीं होवोनि सावधान । परिसावें आर्यें ॥ १४४ ॥ जेवीं अक्षरांत ॐकार । गुरूंमध्यें श्रीशंकर । देवांमध्यें मुरलीधर । ऋषी-मध्यें भृगुऋषी ॥ १४५ ॥ ईशामध्यें सायंभुव मुनी । मुनीमध्यें कपिलमुनी । कीं वसूमध्यें अग्नी । पर्वतीं मेरू

पर्वत ॥ १४६ ॥ गतीमध्यें शिवरूप गती । पुरोध्यांत बृहस्पती । कवींमध्यें व्यासख्याति । नर नारायण मुनीश्रेष्ठ ॥ १४७ ॥ कीं अश्वामध्यें उच्चैःश्रवा । आत्मज्ञान श्रीदत्त बरवा । क्षात्रियांत श्रीराम पहावा । श्रेष्ठ म्हणोनियां ॥ १४८ ॥ मनकर्णिका तीर्थांत । काशी सकल तीर्थांत । श्रीशिवसेवा योग्य प्रभूंत । तेवीं श्रीपर्वत उत्तम जाणा ॥१४९॥ जयाचा महिमा अनंत । जो मोहिनी मदनंत । जो ब्रह्मवाणीस ज्ञात । तो ईश ब्रह्मवेद्य ॥ १५० ॥ जे मानव दुराचारी । वसोनियां पुण्यक्षेत्रीं । निरंजन प्रकाशक श्रीहरी । हरदर्शन न घेती ॥ १५१ ॥ तयांसी नलभे श्रेष्ठ गती । याकरितां करोनी आरती । अनुदिनीं पूजावा श्रीपती । अवलोकीं श्रीनिरंजन ॥ १५२ ॥ एक याम केलिया यात्रा । साधिती सर्व सिद्धी मात्रा । तीन प्रहरीं प्रजापात्रा । प्राप्त होईल तयातें ॥ १५३ ॥ पांच यामें सांतपन । दहा यामें वेदपठण । फलप्राप्ती होईल पूर्ण । निश्चयें जाणा श्रोते हो ॥ १५४ ॥ महा रुद्रा शंभरानीं । अती रुद्रा दोनशेंनीं । महामंत्र आठशेंनीं ।

सहस्रानीं योगसिद्धी ॥ १५५ ॥ शुक्लतीर्थी स्नान करितां । कोटीपुण्य प्राप्त होतां । हरिहर सद्भावें नमितां । अनंत पुण्य जोडी नर ॥ १५६ ॥ भर्ग हा बुद्धि प्रेरक । आणि सर्व प्राणपोषक । तोचि ज्ञानाचा मालक । जरी अज्ञेय चित्ता असे ॥ १५७ ॥ असो देहाची शुद्धिव्हावी । म्हणोनि आश्रमें संचरावीं । देहशुद्धीच्या अभावीं । कर्में होती बंधक ॥ १५८ ॥ करितां श्रीदत्तस्तवन । मूढ होती विद्यासंपन्न । त्रिगुणात्मक देह विस्मरण । होईल त्रयमूर्तीकृपें ॥ १५९ ॥ आतां आत्मज्ञानी आणि बालक । यांमधील भेद ऐक । ज्ञानिया ज्ञान विवेक । बालक दिसे अज्ञानी ॥ १६० ॥ माझिया बाल श्रोतियासी । नमस्कार माझा बहुवसी । बाळांनो भजा वेगेंसी । श्रीगुरुनाथ समर्थ ॥ १६१ ॥ पहा कयाधूत्रा बालवीर । पित्यानें आणिला प्रसंग दुर्धर । परी संकटांतुनी घोर । मुक्त झाला नृसिंहकृपें ॥१६२॥ त्यानें सांगितले स्वगज्यांसी । तेंचि सांगतो तुम्हांसी । तुम्हीं बालसंत म्हणोनी आदरेंसी । तुम्हांसीच सांगणें

॥ १६३ ॥ जों वरी तुमचें मन कोमल । नसे संसार हलहल । तों वरी तें ठेवा अढळ । श्रीनारायणपदीं ॥१६४ ॥ बाळ लागे ईशभजनीं । तरी होय क्षणीं आत्मज्ञानी । श्रेष्ठही लागती भजनीं । ऐशिया बाल भक्ताचें ॥ १६५ ॥ म्हणें माता वसुंधरा । जरी ईशपदीं थारा । घेईल माझा बाल हिरा । तरीच मी धन्य ॥ १६६ ॥ बालकांची मनोवृती । सकल नारी नर जाणती । मानापमानाची न भीती । ब्रम्हमय सर्व जगत् ॥ १६७ ॥ पुढें कालें करोन । बालभाव जाई निघोन । विकसित होतें मन । संसारजाळें करोनियां ॥ १६८ ॥ लोकमोहाचा संसर्ग । प्राप्त होई मद गर्व । विसरुनी चिदानंद सर्व । अज्ञानगळीं सांपडे ॥ १६९ ॥ संपला शैशवकाल । गुरुजन करविती चौल । वेदपाठाचें कैंचे मोल । मुंडनविधी व्यर्थची ॥ १७० ॥ यथासांग न घडे कर्म । वेळीं न सुचे धर्माधर्म । हस्तें घडे विवेकशून्य कर्म । तेथें वेदमंत्र काय करी ॥ १७१ ॥ जगताची तारती । जगप्रसिद्ध गायत्री । सद्गुरु उपदेश करिती ।

मौंजीबंधनसमयासी ॥ १७२ ॥ मायामोहामुळें । गायत्री-वैभव नकळे । म्हणे हे सकल जन खुळे । स्नानसंध्या करितातीं ॥ १७३ ॥ श्रीगुरूजवळी अध्ययन करिती । त्यांची सदा सेवा करिती । असोनियां गर्भश्रीमंती । हस्ती घेती भिक्षापात्र ॥ १७४ ॥ ऐसें म्हणती ते अनार्य । जाणोनि सेवी आर्य । सदोदीत सत्कार्य । करीत रहावें ॥ १७५ ॥ कामक्रोधें मन बहुत । जेधवां होई-हळुंवट । तेव्हां आठवावा श्रीगुरुनाथ । तोचि सोडवी तापांतुनी ॥ १७६ ॥ ब्रम्हचर्य प्रथमाश्रम । साधावया शुभकाम । धर्म अर्थ मोक्षाचे धाम । मूळ पाय तयांचा ॥ १७७ ॥ हा जरी राहे सुदृढ । तरीच होईल प्रज्ञावाढ अज्ञान तमाचें तेढ । जाईल निरसोनियां ॥ १७८ ॥ प्राणायाम करून । अद्वैत स्वरूपीं भगवान । एकांतीं चिंतन । तल्लीन व्हावें आत्मरूपीं ॥ १७९ ॥ जे स्वरूप गुणातीत । जे अनादी अनाद्यंत । तेजस्वरूप ज्ञान-ज्योत । परमाक्षर स्वहंध्वनी ॥ १८० ॥ जीव होई शिवीं रममाण । तेवां कामादि जाती पळुन । येरव्हीं इंद्रिय-

दमन। होणार नाहीं कदापी ॥१८१॥ ज्यासि नव्हे इंद्रिय-
दमन । तो केवळ पशूच जाण । लौकिक हांव त्यजोन ।
लीन होई परब्रह्मीं ॥ १८२ ॥ जे स्वात्मस्वरूपीं तल्लीन
होती । त्यांचा विकला लक्ष्मीपती । श्रीगुरु ज्याचि ये अखं-
डचित्तीं । त्यापुढें तिष्ठत उभाचि असे ॥ १८३ ॥ आत्म-
ज्ञानियांची स्थिति । बुद्धी हीच जन्मदात्री । मन राखिलें
पवित्रीं । तेंचि गंगास्नान जाणा ॥ १८४ ॥ पिताजी
श्रेष्ठ ज्ञान । गुरुजी केवल प्राण । गृह श्रद्धा निर्वाण ।
आत्मज्ञानियांसी ॥ १८५ ॥ हस्तपाप सहचर । मेखला
स्त्रीसुंदर । मन हा उदार सान्मित्र । आत्मज्ञानियांसी
॥ १८६ ॥ इंद्रियशुद्धी शौच । परम साम्राज्य जप हेंच ।
अद्वैत बुद्धी संध्याच । आत्मज्ञानियासी ॥ १८७ ॥ ऐसा
आत्मज्ञानी ब्रह्मचारी । ऐशिया रितीं आचरी । तरी
पोहोंचे पूर्ण शिखरीं । वैभवाच्या ॥ १८८ ॥ ब्रह्मरूप
होवोनि तात्काळ । ठेवीं ब्रह्मपदीं भाळ । मग अज्ञान संसार
गाळ । कोठला गांठीं त्याचिये ॥ १८९ ॥ सागरीं लय
पावे जल । तैसा भगवत्रूपीं केवल । लीन होई ब्रह्मबाल ।

शिशूपर्णीच जाणिजे ॥ १९० ॥ बाळानों श्रुतिवाक्य भलें। आचरणीं आणाल चांगलें। भक्तीज्ञान वैराग्यदलें। श्रीहरिहर सेवाल जरी ॥ १९१ ॥ अंतरीं ठेवोनि पवित्रता। जरी सेवाल माता पिता। श्रीगुरुपद तत्वतां। जरी ध्याल सदोदित ॥ १९२ ॥ तरीच जीवीत फळां आलें! तुमचें कुळ धन्य झालें। सगळे पूर्वज मिळाले। चिरपदीं जाणा बाळांनो ॥ १९३ ॥ मी जाणोनि अपवित्र। दुष्ट कामी अपात्र। न धरा संशय अणुमात्र। या बोलाचा ॥ १९४ ॥ हें माझें नव्हे लिहिणें। हें सद्गुरूंचें करणें। प्रल्हाद भक्ताचें बोलणें। हृदयीं ठेवा सदोदित ॥ १९५ ॥ तुमचें बालमानस। जेवीं गंगाजल सुरस। आत्मरूपीं होवोनि समरस। श्रीस्वामी समर्थ सेवा वेगीं ॥ १९६ ॥ पुढील पिढीचे पितर। तुह्मींच बाळानों चतुर। आमुची चुकवावया येरझार। द्या आशिर्वाद बापांनों ॥ १९७ ॥ माता भवानी पिता शंकर। हेचि भावना साचार। हृदयीं धरितां तराल। खचित भवाब्धडोहीं ॥ १९८ ॥ विद्यादाते गुरुराज। हृदयीं ठेवोनि तत्पंकज-

विद्यादेवीस आज । प्रसन्न घ्या करोनी ॥ १९९ ॥ जरी म्हणाल उद्यां करूं । क्षणक्षणा पळे कालवारू । महत साध्य थोरू । नासेल तुमचे विलंबें ॥ २०० ॥ बाळांनो विद्यामाउली । तुम्हांसी होईल सुखसाउली । आराधितां श्रीगुरुमाउली । जी प्राप्त होतसे ॥ २०१ ॥ जरी मी पापी अधम । तरी हा उपदेश सुधेसम । सद्गुरूंचा असे उत्तम । म्हणुनी यासी न धिःकारावें ॥ २०२ ॥ नातरी म्हणाल हा दुर्जन । याचें लिखित ऐकेल कोण । याल सोडोन । वाचन या ग्रंथाचें ॥ २०३ ॥ म्हणोनि आधींच लिहिलें । हें काव्य भलें । सद्गुरूनीं लिहविलें । मीं न जाणें कांहींच ॥ २०४ ॥ काव्यरचनाची प्रेरणा । ज्याची त्यांनीं केली जाणा । उगीच कुशंका घेवोनि नाना । कलंकवूं नका मनश्चंद्र ॥ २०५ ॥ असो बाळ-गोपाळ सकल । त्यांचें पदीं कोमल । ठेविली माझी क्षुद्र भाल । त्रिकाल आत्मशुद्धीस्तव ॥ २०६ ॥ बाळांनो तुमच्या संगें । मी पावेन मुक्ती वेगें ।

जेंवीं प्रल्हादभक्तियोगें । असुराधम सायुज्य पावला ॥ २०७ ॥ कोणी ह्मणती शिशूजन । त्यांसी वडिलेंन किजे नमन । हें शास्त्र मज न मान्य । कारण आहे उघडचि ॥ २०८ ॥ सिंहाचा छावा लहान । वृद्ध बोकड दाढी लंब पूर्ण । यांत द्याल कोणास मान । तुह्मींच सांगा शास्त्रज्ञहो ॥ २०९ ॥ असो सदाचारें वर्तोनी । बाळांनो सेवा ब्रम्हनंदिनी । सद्गुरूसी सदा स्मरोनी । ह्मणीं व्हा कुल दीपक ॥ २१० ॥ आतां बालिका ग्रंथ वाचिती । अत्यंत प्रेमादर चित्तीं । त्यांचे मृदु चरण प्रीतीं । भिजवीन माझिये प्रेमाश्रुंनीं ॥ २११ ॥ कन्यकांची योग्यता अपार । उद्धरती सासर माहेर । उभय कुलांचा भार । असे सुकन्यकेवरी ॥ २१२ ॥ मुलींनो तुम्ही भावी माता । गुरुजन सेवा बहुता । आनंदवावा भर्ता । सासूश्वशुरादिक ॥ २१३ ॥ पुरुषासवें सर्व धर्म । अर्थ मोक्ष परमकाम । गृहिणी पद उत्तम । साधावें सुकन्येनें ॥ २१४ ॥ कुलांची भावी पिढी । तुम्हांकडे पाहे तांतडी । कीं चालवाल सुरळीत गाडी । संसाराची ॥ २१५ ॥ कन्यके माये मी पतित ।

परी तुज आलों शरणांगत । मी अंध अत्यंत । दावी मज सन्मार्ग ॥ २१६ ॥ अहिल्या सावित्री सीता । मीरा मुक्ता पुण्यवंता । सती अनसूया पतिव्रता । यांसमान तूं होई ॥ २१७ ॥ तुझी जेव्हां होईल प्रगती । तेव्हां मज मिळेल गती । भावी पिढीवरती । अवलंबून आहे माझें जिणें ॥ २१८ ॥ आतां तुम्हीं बंधु भगिनी । मला हांसूं नका स्वमनीं । पश्चात्ताप होतो मन्मनीं । कृतकर्मादिकांचा ॥ २१९ ॥ सदा धरोनि सुपंथ । आदरें स्मरा श्रीगुरुनाथ । मज अंधाचा धरोनि हात । श्रीभगवंत दावा वेगीं ॥ २२० ॥ मी खल दुष्ट दुर्जन । दुराचारी अपवित्र पूर्ण । म्हणोनि मज त्यजोन । न जावें सूज्ञांनी ॥ २२१ ॥ दुर्जन असो कीं अधम । त्यासी तारी सत्समागम । जरी मद्देह अमंगळ परम । असे जाहला कर्मवशें ॥ २२२ ॥ तरी मज श्रीगुरुपाय । तारितील हें खचित होय । मग तुम्हीं सज्जनीं काय । म्हणोनि कंटाळावें मजसी ॥२२३॥ असो सर्व संत श्रोते हा ग्रंथ वाचिती एकचित्तें । तयांसी माझीं दंडवतें । अखं-

डीत सदा ॥ २२४ ॥ असो ऐसियापरी ब्रह्मचारी । वर्तोनियां सदाचारी । लीन होईल श्रीहरी हरीं । सत्य सत्य त्रिवाचा ॥ २२५ ॥ श्रीहरिहरेश्वरलीलामृत । श्रीस्वामी समर्थ सांगत । ऐकोत भाविक संत । षष्ठोऽध्याय गोड हा ॥ २२६ ॥ श्रीगुरुदेवदत्त अवधूत.

## अध्याय ७ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसद्गुरवे नमः । ॐनमोजी श्रीहरिहर । मागिले अध्यायीं साधार । ब्रम्हचारी सदाचार । निवेदिला त्वां कृपें ॥१॥ पुढें स्कंदपुराणीं कथा । पावन होय श्रोता वक्ता । श्रीहरिहरलीला गातां । अत्यंत आवडी धरावी ॥ २ ॥ सूत सांगे शौनकांसी । श्रीगुरू लिहविती मत्करेसी । तें हरिहरचरित्र प्रेमेंसी । साद्यंत सावधानें परिसावें ॥ ३ ॥ प्रथमाश्रमीं ब्रह्मचारी । श्रीगुरूंची सेवा न करी । विषयसुखांत मन धरी । तरी प्राप्त अधोगति ॥४॥ विषयसूख महाद्वाड । पाडील ज्ञानें ओसाड । अंतःकरण होईल पिसाड । आशा पिशाची संचरे ॥५॥ आशेचा बंधू आळस । तोचि उद्योगारि तामस । दैन्यभ्रमादि योगें

59860

नष्ट । होतें तात्काळ ब्रह्मचर्य ॥ ६ ॥ धनलालसा उत्पन्न होत । मग दंभाची गांठ पडत । मानापमानाचा दाब त्वरित । पडतो हृदयाब्जावरी ॥ ७ ॥ मग निष्कृती नामक कन्या । दोष कृत्यासी जी मान्या । ब्रम्ह-चारी मानोनि धन्या । तीस वरी तात्काळ ॥ ८ ॥ मग कामकथांची रुची घेवुन । मनासि भ्रांती होते जाण । कामाचें वारें वाहून । फार आवडे संसारसुख ॥ ९ ॥ काम असे अंगहीन । पुष्पें जयाचीं शस्त्रें तीक्ष्ण । कामाचें सामर्थ्य विलक्षण । ज्ञातेहि केले पादाक्रांत ॥ १० ॥ कामाचा मान चढला । भोंवऱ्यांत ब्रह्मचारी सांपडला । मग त्याचा विवाह भला । मातापिता करिताती ॥ ११ ॥ सुंदर आणिली नोवरी । कामें मन आसक्त भारी । मद्यप्याचे हस्तीं ज्यापरी । मद्य झारी भरोनि द्यावी ॥ १२ ॥ नोवरीचे स्वरूप गुण । शास्त्रज्ञ करिती वर्णन । शरीर सुंदर मोहक वदन । चपल नयन असावे ॥ १३ ॥ गोरी श्यामवर्णा वा निमगोरी । सदा असावी हांसरी । ओष्ठ बिंबफलासरी । नेत्र असावे पद्मासम ॥ १४ ॥

आवाज गोड सतीचा । लाजाळु स्वभाव साचा । सडपातळ आहार बेताचा । कोमलांग शुभकांती ॥ १५ ॥ नजर मोहक बोटें सरळ । अंगकातडी भारी नितळ । स्वच्छ शरीर वाणी प्रेमळ । अंग सुगंधी केशहीन ॥ १६ ॥ डोई कुरळ केश भार । कपाल उन्नत फार । ऐसें मुख असावें सुंदर । देखोनि लाजे पूर्ण चंद्र ॥ १७ ॥ अंतरीं नसावी दुर्मुख । मातापित्यांस देई सुख । ऐसें गुणयुक्त सुनमुख । पहावें सासुश्वशुरांनीं ॥ १८ ॥ भावंडें बहुत असलेली । असावी चालीची चांगली । व्यवहारीं दक्ष चतुर भली । निष्कपट उत्तम कुलींची ॥ १९ ॥ ऐसें सुकन्यालक्षण । लाभण्या लागे बहुत पुण्य । संसारीं दिसती बहुत धन्य । कज्जेदलाल कैकेया ॥ २० ॥ नेत्रारक्त जेवीं खदिरांगार । नेहेमीं थरथरे अधर । वचन कदा नव्हे मधुर । कुरुप कर्कशा नारी ॥ २१ ॥ फसवी निंदक रडतोंडी । पतीवरी सदा तोंड सोडी । ऐशिया स्त्रीपासोनि सोडी । वांचीव बाप्पा हरिहरा ॥ २२ ॥ जहाला दुष्ट स्त्रीसंग । होई गृहस्थाश्रमभंग । मग सत्कर्म

यथासांग । कैसी होतील या जगीं ॥ २३ ॥ म्हणोनि करा योग्य निवड । जरी असेल मानसीं आवड । संसारसुखाची भरण्या कावड । सद्गुणी नोवरी पर्णावी ॥ २४ ॥ गुरु अग्नी आणि द्विज । समक्ष करावें विवाह काज । स्नान संध्यादि दिन काज । करावीं आवश्यक गृहस्थानें ॥ २५ ॥ गृहस्थाचा धर्म जाणा । माता पिता गुरुकन्या । पत्नी पुत्र याचक जाणा । अतिथी पोषण करावें ॥ २६ ॥ सदा अग्नी पूजावा । पुरुष यज्ञ करावा । श्रीहरिहर भजावा । मनोभावें सर्वकाल ॥ २७ ॥ करावें वेदशास्त्राध्ययन । तयार करावे शिष्य शिकवुन । देव ऋषी पितर भूतजन । यांसी बलीहरण करावें ॥ २८ ॥ भिक्षू याचक प्रवासी । यांस न ठेवी उपाशी । येरिं तीं गृहस्थाश्रमवासी । वर्तत जावें ॥ २९ ॥ कामें न जावें जखडोन । वंशविस्तारा योग्य मैथुन । स्त्रीपुरुषें असावीं तरुण । चिंतारहित प्रेमळ ॥ ३० ॥ धैर्यें कामविकार । शांतीनें क्रोधागर । लज्जेनें मद पामर । विवेकें मोह जिंकावा ॥ ३१ ॥ सर्वत्र आत्मबुद्धीनें हिंसा । आत्म-

विचारें द्वैत दासा । आणी वठणीस दुराशा । उदार उच्च दृष्टीनें ॥ ३२ ॥ मन संतुष्ट ठेवोन । अलिप्त असावें संसारांतून । प्राप्त सुखदुःखापासून । मन ढळों न द्यावें ॥ ३३ ॥ दक्षतेनें भीतीचें । दयेनें पापाचें । अभ्यासें प्राणवायूचें । आलस्याचें उद्योगें ॥ ३४ ॥ विवेकें चंचलत्वाचें । नियमन करावें साचें । सदा भजन श्रीहरिहराचें । करोनि काल कंठावा ॥ ३५ ॥ माया-त्यागें दंभाची । संतोषें तृष्णेची । सहिष्णुत्वें सुख-दुःखाची । खोड मोडावी ॥ ३६ ॥ विरक्तीनें निष्फल वाद । मोडोनी त्यजीं कामुक नाद । हृदयीं ध्यावोनि चिदा-नंद । सावध असावें संसारीं ॥ ३७ ॥ रात्रंदिन इंद्रिय-दमन । करितां नारायण प्रसन्न । मग तो देई वरदान । सज्जनसाधूसंगाचें ॥ ३८ ॥ साधूसंगें चिर समाधी । मग सुटेल सर्वोपाधी । संसारांत राहोनि साधी । परमार्थ-मोक्ष साधन ॥ ३९ ॥ नरासी वैराग्य प्राप्त होत । सर्व भवव्यवसाय सुटत । भ्रम सकल निरसत । केवल साधू-समागमें ॥ ४० ॥ ऐसा मुमुक्षु गृहस्थ । तोचि होईल

मोक्षस्थ । सर्व प्रकारें श्रीगुरुनाथ । संरक्षी त्यासि संसारीं
॥ ४१ ॥ जेवीं जलांत पद्म राहे । परी अंगीं जल न
साहे । तेवीं अंतरीं विरक्त राहे । व्यवहार पाहे बाह्यांगीं
॥ ४२ ॥ अंतरीं सावध न होसी । तरी मोहक माया
पाशीं । पडशील तूं प्रणयपाशीं । धुंद संसारीं होसील
॥ ४३ ॥ तरुणीचें अंग सुंदर । कामाची तलवार । करील
तुजसी ठार । कालवशें ॥ ४४ ॥ जरी रूपवंत
सती । वागे योग्य प्रेमरितीं । तरी भर्त्यासी धरोनि
हातीं । आपुल्या कह्यांत ठेविते ॥ ४५ ॥ भार्या
कुरूप दुःशील । तरी समूळ नाश करील । वंशवृक्षाची
ही वेल । ऐसी विचित्र असे कीं ॥ ४६ ॥ असो संसार
करोनी नेटका । साधी परमार्थ बांका । कामादिकाचा
झटका । लागोंचि नेदी ॥४७॥ आधींच दुर्लभ नृजन्म ।
त्यांत अधिक द्विजोत्तम । त्याहुनी अधीक संतसमागम ।
श्रीगुरुकृपा अधिकाधिक ॥ ४८ ॥ कोटी जन्मांचें पदरीं
पुण्य । तेव्हां दया करी श्रीभगवान । प्राप्त सुपुत्र गुणवान ।
श्रेष्ठ कुलदीपक ॥ ४९ ॥ नाहीं तरी जगांत । पुत्र करिती

अनर्थ । मातापिता गुरुभ्रात । यांसी दुःखद होती बहू ॥ ५० ॥ मातापित्यानीं करावे नवस । सहन करावे अत्यंत त्रास । परी बाल निपजे तामस । अत्यंत बालिश अवगुणी ॥ ५१ ॥ नवमास वाहुनी उदरांत । माता साहे क्लेश अत्यंत । प्राप्त झालिया अवगुणी सुत । मग त्या दुःखासि पार नाहीं ॥ ५२ ॥ त्रास देई इतराला । ऐसा सुत प्राप्त झाला । मग तया मौंजी-बंधनाला । चौल कर्म करिती विधियुक्त ॥ ५३ ॥ तो म्हणे हें काय खूळ । कसली स्नान संध्या मेळ । चला जाऊंया खेळूं खेळ । आट्या पाट्या चेंडु फळी ॥ ५४ ॥ ये रितीं गेलें बालपण । पुढें आलें तारुण्यपण । आंगीं ताठा अभिमान । मी विद्वान म्हणोनी ॥ ५५ ॥ विद्या देवी सरस्वती । ती केवळ शांतीची मूर्ती । सहास्यवदन वीणा हातीं । भजनरंगीं डोलत ॥ ५६ ॥ ऐसें विद्येचें स्वरूप । आणि हे करिती गर्वालाप । म्हणे मी विद्वान असे बाप । कविश्रेष्ठ व्यासांचा ॥ ५७ ॥ ऐसे मदोन्मत सुत । पाहे माता चिंतायुक्त । पतीस म्हणे सावचित ।

बाळ निवळेल विवाहें ॥ ५८ ॥ सुंदर पहावी नोवरी । बाळाचा विवाह करी । मग तो शांत होवोनि संसारीं । दक्ष राहिल निश्चयें ॥ ५९ ॥ जननीचें हृदय कोमल । म्हणे आतां निवळेल माझा बाळ । बापडी उमजेना ते काल । गृहीं शिरला प्रत्यक्ष कली ॥ ६० ॥ सुंदर नोवरी पर्णिली । दोघेंही मदनें व्यापिली । म्हणती वडिल माणसें वृद्ध झालीं । कांहीं तयांसी कळेना ॥ ६१ ॥ कुपुत्र सांगे पितयासी । बहुत देखिलेंति संसारासी । आतां स्वस्थ चित्तेंसी । एके बाजूस बैसावें ॥ ६२ ॥ मी घरचा मुख्य यजमान । कोणी नायकिजे तुमचं वचन। कुशब्दें ताडे पिता भगवान । तें न लिहवे ये ग्रंथीं ॥६३॥ पिता म्हणजे गुरुवर । त्यासी कुशब्दें ताडे नर । तो पावे तत्काल यमपूर । सत्यसत्य त्रिवाचा ॥ ६४ ॥ अंतःगृहीं धरोनि सासूसी । सूनबाई ठेविती बाजूसी । अनुदिनीं करिती कलहासी । महा अनर्थ मांडिला ॥ ६५ ॥ ऐसा संसार दुःखपूर्ण । वर्णितां रोमांच उठती जाण । अधिक न लिहवे वर्णन । या दीन चित्राचें ॥ ६६ ॥ श्रीहरिहर-

भजनीं । लाविण्या हातीं धरिली लेखणी । कां विटाळूं अधीक कथनीं । लीला अवगुणी मानवांच्या ॥ ६७ ॥ असो ऐसें संसारजाल । परी प्राप्त होतील बाळ । गुणवंत कन्यास्नेहाळ । तरी सार्थक स्वार्थाचें ॥ ६८ ॥ पुत्र असावा शीलवंत । आज्ञाधारक वैराग्यवंत । मातापितागुरुभ्रात । आज्ञा कधीं नुल्लंघी जो ॥ ६९ ॥ तरीच धन्य मातापिता । पितृऋणांतुनी तत्वतां । मुक्त होवोनि सार्थकता । होईल जन्माची ॥७०॥ सुकन्या आणि सुपुत्र । करितील स्वकुल पवित्र । उद्धरितील पूर्वज कुलगोत्र । उभय कुलांचें ॥ ७१ ॥ असो श्रीगुरुसेवा । श्रीगुरुप्रसाद मेवा । उत्तम वैराग्याचा ठेवा । आणि कुसंगत्याग ॥ ७२ ॥ समदृष्टी संतोष हीं वर्तनें । अधिकाधिक भाग्याचीं लक्षणें । आनंद ब्रह्माचें लेणें । तेजाचें मूळ होय ॥ ७३ ॥ जरी साधणें आत्महित । वर्तन ठेवणें शुद्ध अत्यंत । प्रेमळ परोपकार बुद्धी मात्र । सदा हृदयांत ठेविजे ॥७४॥ आलस्य त्याग करावा । परी अती कष्ट न करावा । धर्मार्थ काम साधावा । उत्तम गृहिणीसह

॥ ७५ ॥ पोळ गाय अश्वत्थ । अग्नी देउळ श्रीगुरुनाथ ।
यासी प्रदक्षिणा भक्तीयुक्त । सदा करावी गृहस्थें ॥७६॥
शांत दांत सदाचारी । उदार योगसाधन करी । ज्ञानी
शीळवंत श्राद्ध करी । व्रतस्थ राहोनि सर्वदा ॥ ७७ ॥
एकांतीं करी भजन । सदा परमार्थचिंतन । ऐसा
गृहस्थ असून । यतीप्रमाणेंच जाणावा ॥ ७८ ॥ नऊ
प्रकारचे शौच । स्नान जप होम शौच । तर्पण देवता-
र्चन शौच । अहिंसा त्याग संतोष पैं ॥ ७९ ॥ नऊ
उत्तम प्रकार । स्नानाचे सांगती चतुर । वैराग्य सरलता
थोर । दिक्षा प्रसन्नता वासना ॥८०॥ रती निष्ठा शांती
शम । हें स्नानचि उत्तम । ऐशिया स्नानें अधमाधम ।
शुद्ध होईल मुळींहुनी ॥८१॥ आतां सांगती सहा दोष ।
काम मद लोभ रोष । दंभ मत्सर अनृत पाश । नाश
करिती जीवाचा ॥ ८२ ॥ कायिक वाचिक मानसिक ।
तीन प्रकारें जप कौतुक । आतां ध्यानप्रकार देख । श्रोतीं
ऐकिजे सावचित्तें ॥ ८३ ॥ प्राणठायीं अश्विनीकुमर ।
नेत्रीं भगवान सूर्य । जिव्हेंत ध्यान धर । वरुण राजेंद्राचें

॥ ८४ ॥ चहूं दिशा कर्णांत । वायू न्यासी त्वचेंत । वाणींत अग्नी धगधगीत । मुखीं इंद्र न्यासिजे ॥ ८५ ॥ पदीं न्यासावा कैलासपती । करीं साधिजे श्रीलक्ष्मीपती । यम न्यासावा गुह्यांती । प्रजापती उपस्थांत ॥८६॥ ये रितीं करोनियां न्यास । अहंभावीं जप रुद्र तामस । मानसीं चंद्र-राजस । जपावा मुमुक्षुनें ॥८७॥ बुद्धीचे ठाईं क्षेत्रज्ञ । चित्तीं ईशान प्रज्ञ । व्यक्तीं ईश्वर ब्रह्मज्ञ । देहीं सद्गुरू चराचर रूपीं ॥ ८८ ॥ ऐसा करा कायिक जप । अथवा साधिजे मानसिक जप । सप्तपाताळ भूर्भुव जप । प्रेमभावें साधावा ॥ ८९ ॥ नाभीपर्यंत स्वर्लोक । हृदयापर्यंत महर्लोक । कंठापर्यंत जनलोक । तपोलोक तालुपर्यंत ॥ ९० ॥ भू मध्या सत्यलोक । त्यावरी जाणा वैकुंठ-लोक । पुढें विज्ञान आनंदलोक । त्यापुढें श्रेष्ठ अक्षरपद ॥ ९१ ॥ जे अक्षराहि पलिकडे । त्याचेंचि चिंतन करा रोकडें । न पहावें इतराकडे । योगियानें ॥ ९२ ॥ मूल भागीं श्रीगणेश । गुह्य ठायीं ब्रम्हेश । नाभींत सौभाग्यद रमेश । हृदयीं शिव मोक्ष साध्य ॥ ९३ ॥ कंठांत जीव

देहधारी । भ्रूमध्यें पुरुष जरा मृत्यु हारी । ज्ञानरूप गुरु शुक्रांक शिरीं । ज्योतीरूप सुवर्णांडा पलिकडे ॥ ९४ ॥ ज्योति रूपांत चिन्मूर्ती । विज्ञानांत आत्मानंदमूर्ती । अक्षरीं निर्गुण स्मरती । तेचि सूक्ष्म जाणावें ॥ ९५ ॥ सूत सांगे शौनकासी । अगस्ती सांगे सतीसी । केलिया ऐशा जपासी । पुरुष मुक्त होतो ॥ ९६ ॥ मूलभागीं वशषस । चौकडी जाणावी सुरस । गुह्यकस्थानीं षट्स । बकारादि जाणावे ॥ ९७ ॥ नाभीस्थानीं डकारादि दशक । बारा अक्षरें हृदयीं देख । असती ककारादिक । कंठीं सोळा स्वर असती ॥ ९८ ॥ तमोभागीं निर्गुण । बिंदुरूप गुणात्मक प्राण । नादरूप आत्मा पूर्ण । वसे ज्योति रूपांत ॥ ९९ ॥ विज्ञान चित्स्वरूपांत । केवल आनंद वसत । अक्षर स्वरूपांत । कर्म निर्हार रूपात्मक अजया असे ॥ १०० ॥ भुवयांमध्यें हकार । यांचा न्यास करी सत्वर । श्रेष्ठ निर्गुण ॐकार । शिरोभागी न्यासावा ॥ १०१ ॥ काया वाचा मन । सद्गुरुपदीं करोनि अर्पण । घेई मानवा जपज्ञान । गुरुमाउलीपासोनि ॥ १०२ ॥ जप साध्य होतां चित्तीं ।

पांचही गुणवृत्ती । निर्गुण ठायीं लीन होती । ज्योतिः-
स्वरूपीं तात्कालिक ॥ १०३ ॥ दर्शनें युक्त हवन । तेव्हां
होम होई पूर्ण ; आतां फलश्रुती सांगती सज्जन ।
होम हवन कर्मांची ॥ १०४ ॥ इंद्रिय-
दमन शम । दुसरा जाणिजे दम । अति कृच्छ
तिसरा उत्तम । तृष्णात्याग चवथा असे ॥ १०५ ॥
पांचवा अभयलाभ । सहावा सुखहोम सुलभ । सातवा
तितिक्षालाभ । आठवा शांतिलाभ जाणिजे ॥ १०६ ॥
नववा आनंदलाभ । जो येरव्हीं दुर्लभ । ये रितीं श्रीपद्म-
नाभ । प्रसन्न कर्मयोगियासी ॥ १०७ ॥ ब्राह्मणसंत-
र्पण । गृहस्थें करावें सदा तर्पण । तेणें पितर तृप्त पूर्ण ।
होवोनि शुभाशीर्वाद देती ॥ १०८ ॥ आनंददायिनी
देवता । दशानृतीं तत्वतां । प्रेमें पूजा करितां । देवतार्चन
या नांव ॥ १०९ ॥ जेधवां इंद्रियें तृप्त होती । तेव्हां
पुष्टी वृद्धी झाली म्हणती । ब्रह्मचारी गृहस्थ वा यती ।
मुक्त होय निःसंशयें ॥ ११० ॥ आयेसी अगस्ती
सांगती । ऐसी गृहस्थाश्रमाची रिती । लोपामुद्रा महा

मं. ... नं. ...

सती । पुनरपी प्रश्न करितसे ॥ १११ ॥ अगस्ती मुनी भगवान । सतीचें करितील समाधान । पुढिले अध्यायीं तें निरूपण । श्रोतीं श्रवण करावें ॥ ११२ ॥ श्रीहरिहरेश्वरलीलामृत । सातवा अध्याय विख्यात । ब्रह्मचर्य आणि गृहस्थ । आश्रम येथें वर्णिले ॥ ११३ ॥ सद्गुरूंनीं जैसें सांगितलें । तैसें लेखणीनें काम केलें । ज्याचें त्यानें करोनि घेतलें । आम्हाकडे काय गुण दोष ॥ ११४ ॥ पुढील कथा भाग अत्यद्भुत । लिहवितील श्रीगुरुनाथ । ते ऐकोत भाविक भक्त । सावधान अंतरीं ॥ ११५ ॥ श्रीहरिहरेश्वरलीलामृत । श्रीस्वामी समर्थ सांगत । ऐकती सकल सज्जन संत । सप्तमोऽध्याय गोड हा ॥ ११६ ॥ श्रीगुरुदेवदत्त अवधूत ॥

## अध्याय ८ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसद्गुरुवे नमः । मागिल अध्यायीं पवित्र । गृहस्थाश्रम धर्म विचित्र । लोपामुद्रेस निमित्त मात्र । करोनि कथिलें सर्वांसी ॥ १ ॥ गृहस्था-

श्रम निर्णय । ऐकोनि सती आनंदमय । पुनरपी प्रश्न पतीस काय । करी तें ऐका एकचित्तें ॥ २ ॥ भगवंत जे मूढ जन । आश्रम सीमे दुर्बल होवोन । वास करिती रात्रंदिन । सुटती कैसे भवचक्रांतुनी ॥ ३ ॥ जनांवर व्हावें उपकार । येतदर्थ कथा साचार । तुम्ही श्रीगुरु चतुर । वर्णावी मजप्रती ॥ ४ ॥ संतुष्ट होवोनि अगस्ती । साध्वीस पुनः सांगती । ठावें नसेल ज्ञान रिती । या गृहस्थाश्रम धर्माची ॥ ५ ॥ ज्यासि न घडे इंद्रिय-दमन । विरक्ती अंगीं बाणे न । त्यानें सत्संग साधून । परिसावी हरिहरकथा सादरें ॥ ६ ॥ भगवंताचें अवतार गुण । भक्तीयुक्त करावें कीर्तन । थोडा थोडा विवेक धरुन । मार्ग क्रमावा मुमुक्षुनें ॥ ७॥ ज्याप्रमाणें लांकडांत । सूक्ष्मरूपें अग्नी वसत । त्याप्रमाणें विवेकें होत । आत्मप्रादुर्भाव ग्रहस्थीं ॥ ८ ॥ आत्मज्ञानें जळे पाप । सद्गुरुभजनें जळे ताप । मग ब्रह्मांड आत्मस्वरूप । भासे अमूप ग्रहस्थासी ॥ ९ ॥ पूजा करी शुद्ध भक्तीनें । अंग थरथरे रोमांचानें । दासोऽहं म्हणोनि नमनें । पुनः पुनः

करावी ॥ १० ॥ प्राकृत भावांचा प्रवेश । जीव्यापीह्य-
दयाकाश । त्या गोष्टींवर विजय सावकाश । भक्तीसाधनें
मिळवावा ॥ ११ ॥ इंद्रियरूपी दरवडेखोर । कह्यांत
यावयास हा चोर । भगवद्भक्तीचा जोर । कमवावा
महत्प्रयासें ॥ १२ ॥ मग तीं इंद्रियें होवोनि दीन ।
विश्वरूपीं होती लीन । ब्रह्मांडनायक त्रिनयन । साक्ष
होतो आत्म्यासी ॥ १३ ॥ चंद्रोदय होतां शाश्वत ।
आनंदें आत्मजल उचंबळत । मग जीव अल्पकालांत
विसरे देह त्रिगुणात्मक ॥ १४ ॥ मग होवोनि आत्मैक-
तत्पर । सोडोनि दुःखसंग सत्वर । बुद्धीस प्राप्त सुत
थोर । होई विवेक म्हणोनि ॥१५॥ हा विवेक गुणवान ।
सुत जहाला निर्माण । याचें प्रेमें करोनि संगोपन ।
देहेंद्रियें सेवावीं ॥ १६ ॥ मनीं धरोनि धैर्य पवित्र ।
बुद्धी विवेकें स्त्रीपुत्र । पोषित जावें कलत्र । अवलोकी
लीला तयांची ॥ १७ ॥ विवेकसुत बाल्यावस्था । प्राप्त
करोनि दे वैराग्यावस्था । याचें निर्वेदासमोर उपनयन
होतां । करितो देहागुणविरहित ॥ १८ ॥ विवेक-

सुताचें पाणि ग्रहण । श्रद्धेसहित करावें जाण । क्रीडतां तीं दोघेजण । विराम पावे इंद्रिय ॥ १९ ॥ प्रौढत्व जेव्हां पावे विवेक । प्राप्त बुद्धी स्थिर ना ठीक । मग देहादिकाचें त्यजोनि कौतुक । यती व्हावें गृहस्थानें ॥२०॥ स्वचित्ताचा मठ करावा । तेथें श्रीगुरुनाथ स्थापावा । विझोनि जातां प्रकृतीवणवा । मग यतिपण सहजची ॥ २१ ॥ मनाचें संयमन । शौच आणि स्नान । जप चौथें अंगण । जिवीत्व पूर्ण तेजाचें ॥ २२ ॥ स्वानंद महापुरांत । न करी आणिक यातायात । स्वप्नजागृतीपलिकडे पोंचत । पैश्याच्चवृतीनें रहावें ॥२३॥ करोनि कांहीं न करी । प्रगट याचक अंतरीं निराहारी । न बोलतां भाषण करी । भगवंत गुणनाम वर्णन ॥२४॥ त्याचें चित्त न ढळत । पहात नाहीं आणिक पंथ । निजरूपीं देखे श्रीगुरुनाथ । हृदयेश्वर आत्मानंदीं ॥ २५ ॥ अनंतरूपी त्रिविध जग । असे एकरूप एकांग । ऐसें जाणोनि भोगी भोग । परमार्थाचे ॥ २६ ॥ ऐसा जो राजहंस । त्यासीच वदती हंस । जो अद्वैतीं करोनि विलास । समबुद्धी सर्वात्मक

होतसे ॥ २७ ॥ आत्मा केवल आनंदघन । ऐसें होई शुद्ध ज्ञान । तेधवां ठरेल अर्थहीन । पुनर्जन्म ही भाषा ॥ २८ ॥ मूढही व्हावा समर्थ । हें श्रुतीधर्मांचें सामर्थ्य । मग भक्तीवान ज्ञानवंत । त्याची योग्यता कोण वर्णी ॥ २९ ॥ संत सज्जन परम हंस । निस्पृह निर्भय तेजस । सर्व जनांचे हितास । जपती ते पूर्णयोगी ॥ ३० ॥ दयाळू शांत दांत । अंगीं अमानित्व अदंभत्व । त्यक्त परिग्रह वसोनी देशांत । वनचराप्रमाणें वागती ॥ ३१ ॥ ममत्वहीन निरहंकर । श्रद्धावान शांत नम्र । मितभाषी जितेंद्रिय उदार । निःसंग सदाचारसंपन्न ॥ ३२ ॥ विषयां-विषयीं विरक्त । ऐसा सत्‌शिष्य भक्त । सद्गुरूसी प्रिय अत्यंत । कृपादृष्टीं पहाती तया ॥ ३३ ॥ निश्चयें श्रीगुरूंची । सेवा करी साची । मग प्रसादलाभाची । कीर्ती कोण वर्णी ॥ ३४ ॥ विश्वामित्रादि मुनिश्वर । जनकादि गृहस्थाश्रमी थोर । याचि सद्धर्में साचार । परम गती पावले ॥ ३५ ॥ पांडवादि क्षत्रिय । याचि धर्में लाभले श्रेय । धर्मावांचूनि अन्य उपाय । नाहीं नाहीं

त्रिजगतीं ॥ ३६ ॥ धर्मानुसार गृहस्थाश्रम । पाळितां पावे आनंदधाम । प्रसन्न होवोनि पुरुषोत्तम । अंतीं नेई स्वपदातें ॥ ३७ ॥ असो झालिया प्राप्त ज्ञान । गृहस्थें पुत्रोत्पत्ती करोन । अगदीं सुखानें प्रव्राजन । संसारत्याग करावा ॥ ३८ ॥ विषयसुखें अनुभवावीं । मनाचीं कोडीं पुरवावीं । मग विरक्त होवोनि पहावी । वाट तपाची स्त्रीसह ॥ ३९ ॥ मुनीवृत्ती आदरावी । भूतमात्रीं मैत्री संपादावी । देहवल्ली शोषून टाकावी । चांद्रायण कृच्छव्रतांनीं ॥ ४० ॥ लाभालाभ मानापमान । जयापजय शत्रुमित्र जाण । अवघे लेखावे समान । मुनीवर्यानें ॥ ४१ ॥ त्यजावे शुष्क वाद । सदा भोगावा परमानंद । सोडोनि कौटिल्य खेद । लोभ परावृत करावा ॥४२॥ जितेंद्रिय होवोनि अष्टांग । करी मैथुनत्याग । सोसी सकलसुखदुःख भोग । अत्यंत धैर्य धरोनियां ॥ ४३ ॥ मदमत्सर त्यजोन । सर्वत्र पाहे उमारमण । संगावड असे जाण । तरी सत्संग धरावा ॥ ४४ ॥ कामी जनापासुन । दूर एकांतीं राहोन । संसर्गहीन होवोन । पक्षोपवास करावे

॥ ४५ ॥ ऋतुकालीं पिकणार । फलांचा करावा आहार । शक्ती अंगीं असेल थोर । वायू भक्षोनि राहावें ॥ ४६ ॥ अग्नेसर सुवासिक तैलें । त्यजावीं यतीनें भले । तीर्थसेवक व्हावें चांगलें । राहूं नये एक गांवीं ॥ ४७ ॥ जरी येईल अशक्तपणा । तरी चार दिवस रहाना । सशक्तांनीं मल्ला जाणा । पंच सहा कोस खेटिजे दिनीं ॥ ४८ ॥ करावें त्रिकाल स्नान । स्वाध्याय मंत्र जप हवन । शुद्ध भक्तीनें पाळिजे अनुदिन । यतील क्षण सत्य हें ॥ ४९ ॥ भवत्शास्त्रें झालिया शुद्ध । पाहूं नये शुद्ध विशुद्ध । होवो नये इतर शास्त्रबद्ध । इंद्रियदमन करावें ॥ ५० ॥ प्रपंचबुद्धी दूर सारुन । सत्यविवेकें करिजे मनन । ऐशिया रितीं वानप्रस्थ मन । आत्मारामीं मेळवावें ॥ ५१ ॥ वानप्रस्थ धर्माचार । आचरोनि वैराग्य प्रखर । प्राप्त झालिया नंतर । मग संन्यास करावा ॥ ५२ ॥ संन्यासाश्रम । हाचि कैवल्याश्रम । याचे पायीं अनंत धाम । प्राप्त होई मानवा ॥ ५३ ॥ जे इंद्रियदमन करूं शकती । त्यांसची पावे

ही गती । उगाचि दंभें संन्यास घेती । ते अधोगती पाव-
तील ॥ ५४ ॥ कुटीचक बहुदक हंस । चवथा जाणिजे
परमहंस । चहूं प्रकारचा संन्यास । वर्णिला असे वेदशास्त्रीं
॥ ५५ ॥ कुटीचकें स्वजनीं । करणें भिक्षान्न सेवनीं ।
शिखा यज्ञोपवीत तिनी । दंड कमंडलू बाळगावे ॥५६॥
बहुदकें करावा सर्व त्याग । असावे मोक्ष परायण निःसंग।
स्वजन स्वदेश त्याग । बहुदकें करावा ॥ ५७ ॥ तिजा
हंस त्रिकाल स्नान । करोनि राहे ओलेत्यान । यतिधर्मा-
नुसार चांद्रायण । वृक्ष मूल नदितिरीं वास करी
॥ ५८ ॥ एकचि वेणूचा दंड धरी । सदा देवाचें ध्यान
करी । अद्वैतबुद्धी अंतरीं। ऐसा हंस जाणिजे ॥ ५९ ॥
परमहंस कोणा वदती । स्वीकरी पैश्याच्चिक वृत्ती ।
वस्त्रें फेंकुनि दिगंबर मूर्ती । अपरिग्रह यती जाणिजे
॥ ६० ॥ सर्वाभुतीं एकतत्व । हस्तीं घेवोन भिक्षापात्र ।
हिंडे केवल परोपकारार्थ । तो परम हंस जाणावा ॥६१॥
ऐके लोपामुद्रे सती । ऐसें म्हणती श्रीअगस्ती । चारी
प्रकारचा यती । महाधर्म निवेदिला ॥ ६२ ॥ ब्रह्मचारी

गृहस्थ वानप्रस्थ । यांतून केव्हांहि व्हावें संन्यस्थ । जरी भार्या कलत्र पोषणास । पुत्र प्राप्त झाला असे ॥ ६३ ॥ अथवा भार्या पावली मरण । त्यानें घ्यावा संन्यास जाणा । परी इंद्रियदमन ही खूण । मुख्य यति आश्रमाची ॥६४॥ ऐसा मानवाश्रम धर्म । योग्य रितीं करोनि श्रम । आचरतां परम धाम । ब्रह्मपद जवळी करी ॥ ६५ ॥ ही आश्रम चतुष्टयाची कथा । पावन करी श्रोतावक्ता । श्रवण-भक्तीनें मोक्ष हातां । चारी पुरुषार्थ लाभती ॥ ६६ ॥ ब्रह्महत्यादि पापें थोर । स्मरणमात्रें कांपती थरथर । श्रीगुरुस्मरणें दुःखें दूर । होतील निःसंशयें ॥ ६७ ॥ भद्रे हें श्रेष्ठाख्यान । म्यां तुज केलें कथन । करितां पठण चिंतन । मोक्ष त्यासी सर्वदा ॥ ६८ ॥ अगस्ती श्रीसद्गुरुनाथ । निमित्त करोनि सती समर्थ । केवळ लोकोपकारार्थ । हें ज्ञान सांगितलें ॥ ६९ ॥ श्रोतीं होवोनि सावध सवेग । साधावा सत्संग । सेवावा महा-भाग । श्रीस्वामी समर्थ ॥ ७० ॥ आठवा अध्याय गिरिवर । वरी आश्रम चारी सुंदर । येथें करोनि विहार ।

आराम पावावें श्रोतियांनीं ॥ ७१ ॥ पुढें कथिती भैरव जन्म । कथनीं सादर व्हावें परम । वंदोनियां आनंदधाम । अवधान द्यावें भक्तीनें ॥ ७२ ॥ श्रीहरिहरेश्वरलीलामृत । श्रीस्वामी समर्थ सांगत । परिसोत आदरें संत । अष्टमोऽध्याय गोड हा ॥ ७३ ॥ श्रीगुरुदेव दत्त अवधूत ।

## अध्याय ९ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीहरिहरदेव पश्चिमद्वारीं । श्रीकालभैरव वास करी । भूतप्रेतादि निशाचरीं । मुक्तीदायक परमेश्वर ॥ १ ॥ श्रीकालभैरव अवतार । सद्भक्तांसी अभयकर । भूत प्रेत पिशाच्चें थोर । निवारण्यास्तव जाहला ॥२॥ तयाची जन्मकथा । मज सांगा हो श्रीगुरुनाथा । ऐसा प्रश्न सूता । शौनकादिक करिती स्वयें ॥३॥ सूत म्हणे मुनिजन । तुमचेनि मी धन्य । हरीहरलीलामृतपान । मजकरवीं करितसां ॥ ४ ॥ करावया जगदोद्धार श्रीपार्वती परमेश्वर । भूमंडळीं करिती संचार । संहरावया खलातें ॥ ५ ॥ शंकरांनीं भैरवरूप । धारण केलें अमूप ।

जगदंबा जोगेश्वरीरूप । धारण करिती भक्तकाजा ॥ ६ ॥
मनीं स्मरोनि श्रीहरिहरा । याची उपपत्ती श्रवण करा ।
आत्मकुल नाम तारा । भक्तीश्रवणें करोनी ॥ ७ ॥
पूर्वी वराह कल्पांत । शतघ्न नामें दुष्ट दैत्य । खल दुर्धर
अभक्त । अत्यंत महा पराक्रमी ॥ ८ ॥ गोब्राह्मणछलक
असुर । अधर्मी महाक्रूर । त्रिभुवन केलें जर्जर । नाश
थोर करोनियां ॥ ९ ॥ जिंकोनिया भूमंडळ । ब्राह्मणांचे
छेदिले कंठनाळ । हत्या सदा करी खल । कामधेनू
माउलीची ॥ १० ॥ ऋषीचे आश्रम केले उध्वस्त ।
उडवोनि दिले अग्नीहोत्र । ब्राह्मण मिळोनि एकत्र । भेणें
लपती गिरिकंदरीं ॥ ११ ॥ ऐसा दुष्ट शतघ्न राक्षस ।
आला शूर्पाकारास । जिंकोनि सकल लोकपालांस । ग्रह
तारे धरिले बळें ॥ १२ ॥ महा प्रळय करोन । हिरोनि
सकल त्रिभुवन । तो मायावी शतघ्न । राज्य करिता
जाहला ॥ १३ ॥ देव बनोनियां दास । वागती तयाचे
आसपास । जणुं कल्पांतींचा तामस । काल्दंड शतघ्न
॥ १४ ॥ शांतमय हरिहर पर्वतीं । साधूसंत वास करिती ।

त्यांसहि तो दुर्मती । छळूं लागला अत्यंत ॥१५॥ नाहीं-शी झाली नीती । गुप्त होती सिद्धक्षिती । वेदांची झाली अवनती । धुमाकुल मांडिला राक्षसें ॥ १६ ॥ जेवीं महाक्रूर रावण । तयाचे देव झाले बंदीजन । तेवीं शतघ्नांचे दास होवोन । पूजा करिती तये ग्रामीं ॥ १७ ॥ अंधारनाशक रवी जाणा । सकल ग्रहांत मुख्य म्हणा । तो घेवोनि हस्तीं विंझणा । वारा घाली शतघ्नासी ॥ १८ ॥ मंद सुगंध सुखकर । वायू करी श्रमपरिहार । असुरदासी अत्यंत सुंदर । देखोनि पूर्णचंद्र लज्जित ॥ १९ ॥ इंद्र पुसे असुरधाम । अश्वपती झाला यम । कुबेर होऊनि नम्र । वाढ करी खजिन्याची ॥ २० ॥ निर्बल झाले दिग्गज । भूषण बनलें इंद्रवज्र । ये रितीं सुर कामकाज असुरगृहीं करिताती ॥ २१ ॥ देवब्राम्हण मिळविती एक-तानता । विचार करोनी तत्वतां । ब्रम्हलोकीं विधाता । शरण सर्व गेले तया ॥२२॥ म्हणती शतघ्नें बहु गांजिलें । मुनि सिद्धांचे हाल झाले । गोब्राम्हण गिरींत लपले । शतघ्नभेणें करून ॥२३॥ तेहतीस कोटी अमर । शतघ्नें केले

जर्जर । देवललना थोर थोर । दासी करोनि ठेविल्या ॥ २४ ॥ हे भगवन् लोककार्यार्थ । उपाय योजीं दैत्य-वधार्थ । यासि मारण्या कोणी समर्थ । न दिसे या त्रिभु-वनीं ॥ २५ ॥ ब्रम्हदेव वदे सकलां । मजबरोबर कैलासीं चला । तो शिवसांब उदार भोला । संहारील दुष्टांतें ॥ २६ ॥ विमानीं बैसोनि सत्वर । जवळी केलें कैलास-शिखर । तो शिवलोक सतेज सुंदर । जणूं कोटी सूर्य एकवटले ॥ २७ ॥ अनुपमेयकलाधर्मदिक्षेचें । जणूं तें आदिमंदिर साचें । किं श्रीसांबसदाशिवाचें । कर्पूर शुभ्र मायारुप ॥ २८ ॥ लाल पद्मरागीं शोभत । इंद्रनील-मालिका दिसत । त्रिनेत्राप्रमाणें भासत । कैलास पद श्रेष्ठ तें ॥ २९ ॥ शिवलोक वृक्ष सुंदर । वरी शोभती चातक मयूर । फलपुष्पांचा संभार । मधुर भूकनाशक ॥ ३० ॥ शुभ्र स्फटिकांची भिंत । त्यांत मुखें होतीं प्रतिबिंबित । मृगादि तेथें सुखें चरत । अत्यंत निर्भयपणें ॥ ३१ ॥ येथें प्रवेशण्या भी अंधकार । सदा उदयीं दिनकर । लता वेली थोर थोर । कीं वाढती योगासिद्धी

॥ ३२ ॥ जेथें साक्षात शिवदयाळ । मातुश्री जगदंबा प्रेमळ । वास करिताती सोज्वळ । जयेस्थानीं ॥ ३३ ॥ अत्यंत पातकी मलीन । त्यासी पवित्र करी धुवोन । ती गंगामाई धांवोन । जे स्थळीं राहिली ॥ ३४ ॥ विघ्नहर्ता श्रीगजानन । जे स्थळीं विचरे पूर्ण । तेथें काय न्यून । पहाल तुम्ही ॥ ३५ ॥ कार्तिकस्वामी तेजःपुंज । जयासी कुमार म्हणती भुभुज । कोटी तपस्यांचें तेज । ओंवाळुनी टाकावें ॥ ३६ ॥ तो येथें राहे निःसंग । सकल भूतगण सवेग । योगिनी ऋद्धि सिद्धी चांग । सेवा करिती शिवाची ॥ ३७ ॥ ऐसें हें आनंदवन । येथें पातला कमलनंदन । सकल सुरनर संगें घेवोन । हस्त जोडोनि ठाकला ॥ ३८ ॥ श्रीशिवमूर्ती सगुण । करी सफल नेत्रजीवन । अरूप असोनी रूपवान । प्रेमपूर्ण पाहे भक्तांकडे ॥ ३९ ॥ रत्नखचित सुंदर सिंहासन । वरी बैसले दोघेजण । आदिमाया आणि त्रिनयन । एकरूप दोघेही ॥ ४० ॥ जेवीं वाणी आणि विचार । कीं तुष्टी आणि संचय थोर । शांती आणि संतोष । तेवीं

जोडपें प्रसिद्ध हें ॥ ४१ ॥ कीं भक्ती आणि संकल्प । माया आणि पुरुषचाप । विद्या आणि विज्ञानालाप । तेवीं अद्वैत अव्यय दंपत्य हें ॥ ४२ ॥ तेजमूल माया-संगम । स्मितवदनीं शोभे पुरुषोत्तम । कीं नेत्रीं उप-निषद्धाम । कंठीं सिद्धांतसार भरलें ॥ ४३ ॥ मस्तकीं पिंगट जटाभार । मध्यें वाहे गंगानीर । कपाळीं मंगळ चंद्रकोर । शोभे श्रीशंकराच्या ॥ ४४ ॥ ते नेत्र अती सुंदर । जणुं आपुल्या अनुचरावर । अमृताचा वर्षाव फार । करिताती स्वतेजें ॥ ४५ ॥ रूप मनोहर पयःफेन धवल कंठीं शोभे वरमुंडमाळ । इतस्ततः अंगीं फळ । रुद्राक्षाचें झळकतसे ॥ ४६ ॥ ज्यांच्या मुंडाची माळ । कंठीं घाली घननीळ । धन्य ते भक्त अढळ । माझा नमस्कार तयांसी ॥ ४७ ॥ सहस्र मुखांचा फणिवर । छत्र धरी डोईवर ? जयाच्या सर्वांगवर । सर्पभूषणें लोळती ॥ ४८ ॥ सस्मित वदन ओंष्ठारक्त । स्वरूप ठेविती हृदयीं भक्त । महास्मशानासक्त । नमस्कार माझा तयासी ॥ ४९ ॥ तो जगतसूत्रधार । रूप वैचित्र्य सुंदर । भाल लोचन अप-

र्णावर । राहो हृदयाब्जीं माझिया ॥ ५० ॥ शिवें ठेविलें जगदंबा माउली शुभांगी । लावण्यवती कोमलांगी । पार्वती आदि माया ॥ ५१ ॥ जिये वदनावरूनि चांगले । कोटि मदनाचे पुतळे । ओंवाळुनि टाकावे सगळे । ऐसें देखिले स्वरूप ॥ ५२ ॥ जिचे पाहोनि प्रेम-विलास । वैभव विसरे भवानीश । क्षण एक विसरोनि तपास । नृत्य तांडवी आनंदें ॥ ५३ ॥ जिच्या रूपें मोहोन । भ्रांत झाला भवभयहनन । त्याचे वामांगीं आलिंगन । देई पार्वती जगन्माता ॥ ५४ ॥ पार्वतीच्या अंकावर । क्रीडतसे गणवर । स्वामीराय कुमार । शिवांकीं विराजले ॥ ५५ ॥ भोंवतीं भूतमेळा शोभत । नारद तुंबर गीत गात । ऐसा कैलासीं आनंद होत । ॐ नमः शिवाय ध्वनीनें ॥ ५६ ॥ ऐसा पार्वती-परमेश्वर । देखोनि ब्रह्मा आणि अमर । करिती साष्टांग नमस्कार । सकल नरलोकही ॥ ५७ ॥ तेव्हां जगन्माता पार्वती । म्हणे सदाशिवाप्रती । बाळें ही कष्टी दिसती । काय कारण ना कळे ॥ ५८ ॥ पहातां कष्टी बाळें । मातृ-

हृदय कळवळे । काव्यीं शब्दचित्र रेखितां बळें । न साधेल कविश्वरांसी ॥ ५९ ॥ मातेची थोरवी । किती म्हणोनि वर्णावी । जितकी श्रोत्रीं आयकावी । तितकी थोडीच वाटे ॥ ६० ॥ असो जगन्माय कळवळली । मंगलमूर्ती पुसती झाली । ब्रह्मादिकासि ते वेळीं । सर्व कांहीं विदित करा ॥६१॥ माझिये भक्तांचा पाठिराखा ॥ मीच सदा असें देखा । कथन करा सकल दुःखा । निवारीन सांकडें ॥ ६२ ॥ जे मजसी अनन्य शरण । माझेंचि करिती चिंतन । तयांचें भव-भय-मरण । मीच हारीन जाणिजे ॥ ६३ ॥ मी भक्तकाजकल्पद्रुम । माझा एकची असे नेम । सदा चालवीन योगक्षेम । ममाश्रित भक्तांचा ॥ ६४ ॥ ऐसें परिसोनि अभय वचन । आनंदले सुरनरजन । जयजकारें करोन । लोटांगणें घालिती ॥६५॥ मग कोमलोद्भव अमरासहित । गाई प्रभुचें अपार स्तोत्र । जें ऐकितां होती पवित्र । अत्यंत पतित लोकही ॥६६॥ रम्य प्रभो तव जयजयकार । तूंचि श्रेष्ठ ज्ञानदात्र । सृष्टी पाळिसी मनोहर । संहारिसीहि योग्य कालीं ॥ ६७ ॥

मायामोहें उद्भवे भ्रम । तव स्मरणें हरे अज्ञानतम । तूं निर्गुण असुनी सगुणोत्तम । अनंत सर्वव्यापी तूं ॥ ६८ ॥ जो सकल ब्रह्मांडावरी । चालवी सर्व सत्ता भारी । तो दीर्घकाल अनंत परी । तुजपुढें केवल बापुडा ॥ ६९ ॥ त्रिविधरूपा त्रिगुणातीता । तूं सकल जगाचा पिता । तूंचि सकल बुद्धीदाता । विकृतीहीन तूंचि स्वामी ॥ ७० ॥ त्रिभुवनांचा जीवनांश । तूंचि अससी परमेश । नमो नमस्ते भवनीश । सिद्धनाथ स्वामी समर्थ ॥ ७१ ॥ पंचभूतें व्यापिसी । पंचबाणा विध्वंसिसि । पुनः अनंग करोनी जीवविसी । रतिवरी करोनि कृपा ॥ ७२ ॥ तूं शांतीचें माहेर । कृपेचा सागर । सच्चित्सुखाचें आगर । तुजवीण दुजें कांहीं नाहीं ॥ ७३ ॥ अनंतशक्ते श्रीशंकरा । आम्हांवरी कृपा करा । तुजवांचोनियां थारा । कोण करील आम्हांसी ॥ ७४ ॥ तूं जगदीश जगद्गुरू । मी तव केवळ लेंकरूं । माझें डळमळीत तारूं । संसारसागरीं सांभाळीं ॥ ७५ ॥ अमर पुनः नमन करित । तंव कोणी भयंकर अत्यंत । महापुरुष उत्पन्न होत । गंभीर वाणी

बोलतसे ॥ ७६ ॥ भिऊं नका सुरनरवर । तुमचें करीन रक्षण सर्व । विश्वास ठेवोनि निर्धार । सुखें जावें स्वस्थाना ॥७७॥ ऐसें वदोनि तो भीम । सोडोनि कैलास उत्तम । धरोनि उग्ररूप परम । सिंधुरतीरीं पातला ॥ ७८ ॥ शतघ्नें देखिला महापुरुष । जयाचे लांब केस । प्रसवती कालाग्नीस । नेत्र खदिरांगासमान ॥७९॥ जेवीं प्ऱ्हाद बाळाचें रक्षण । श्रीपाद श्रीभूषण । नृसिंहरूप उग्र विलक्षण । धरिती राक्षसा वधावया ॥८०॥ की पांच वर्षांचा शिवकुमर । रूप धरोनी भयंकर । मारी दैत्य तारकासुर । जेणें जग त्रासाविलें ॥ ८१ ॥ मुळींचा गोजिरवाणा गोविंद । जहाला जैसा तप्त पोलाद । जेधवां उतरिला कंसमद । मुष्टीक चाणूर मारिले ॥८२॥ कीं श्री शांता जगज्जीवनी । शांतरूप मनमोहनी । परी चंडिकावतार धरोनी । शुंभ निशुंभादि मर्दिले ॥ ८३ ॥ तेवीं येथें अवतार धरिती । उदरा कालभैरव ख्याती । जयाचे अंगावरी लोळती । भयंकर फणिवर ॥ ८४ ॥ तयाचा ओष्टोहंकार ।

मेरूसी कांपवी थरथर । खळबळ उडाली थोर । समुद्रांतही त्या वेळीं ॥ ८५ ॥ भैरव वेष भयंकर । लालबुंद मुख नेत्र । चावोनियां स्वधर । स्मित हास्य करी उत्साहें ॥ ८६ ॥ हस्तीं घेवोनि शस्त्र लाघव । करी तेधवां नृत्य तांडव । गर्जना करी भैरव । राक्षस पहातां जाहला ॥ ८७ ॥ अत्यंत मायावी राक्षस । उडोनि अंतरिक्षांस । अतिशरें वेष्टिला दिव्य पुरुष । श्रीकालभैरव शंकर ॥ ८८ ॥ त्या कालभैरवानें । शरवृष्टी कुसुमाप्रमाणें । धारिली स्वदेहीं कौतुकानें । अनेक शर गिळोनियां ॥ ८९ ॥ जेवीं पूर्वी स्कंद कुमार । मारिला दुष्ट तारकासुर । कीं शंकरें त्रिपुरासुर । मारोनियां टाकिला ॥९०॥ तेवीं श्रीकालभैरवानें । आपुल्या प्रचंड तलवारीनें । दुष्टासी घालोनि रक्तस्नानें । भूमीवरी पाडिला ॥ ९१ ॥ तों पातले त्याचे सेवक मित्र । शूर बली दैत्य सत्र । बांधिले केवळ पशू मात्र । सकल दैत्यसेनेसी ॥ ९२ ॥ सेनापती पावतां पतन । सैन्य सकल होई दीन । तेवीं तें दुष्ट सैन्य । पळूं पाहे भीतीनें ॥ ९३ ॥ जेधवां

शतघ्ना मारिलें । तेव्हां तच्छीर गगनीं उसळलें । ज्वाळांनीं तळपूं लागलें । तें शिर भयानक ॥ ९४ ॥ तें पातलें भैरवापासीं । म्हणूं लागलें धिटाईसी । तूं वंशावतार होसी । त्याचि महाशक्तीचा ॥ ९५ ॥ ज्या शक्तीनें विस्तारिलें जग । तो तूं काल महाभाग । विश्वोपाकाराास्तव जोग । घेवोनियां फिरसी तूं ॥ ९६ ॥ तूंचि सद्गुरू श्रीस्वामि समर्थ । अवतार धरिसी लोकहितार्थ । सफल आजि मम जिवितार्थ । भाग्य उदेलें अंतकालीं ॥ ९७ ॥ मी करोनि दुष्टपण । अवतार घडविला तुजकडुन । तूं माझें केलेंसि हनन । श्रेष्ठ गती आतां प्राप्त मज ॥ ९८ ॥ भैरव शांत होवोन । शिरासी वदे प्रसन्नवदन । कांहीं न लावितां विलंबन । प्रवेश करीं माझे ठायीं ॥९९॥ शिरानें करोनि प्रदक्षिणा । बहुत केली प्रार्थना । म्हणें दयाळा जगज्जीवना । येथेंच वास करावा ॥ १०० ॥ तथास्तु वदे भगवान । मग ज्योती निघाली शिरांतून । भैरवरूपीं मिळोन । परम धाम पावली ॥ १०१ ॥ श्रीकाल भैरवावर । पुष्पवृष्टी करिती सुरवर । कीं ते सुगं-

धाची धार । सर्वों लागली मेघोदरांतुनी ॥ १०२ ॥ गगनीं न मावे आनंद । गंधर्व करिती भेरीनाद । त्यजोनियां सकल खेद । नृत्य करिती अप्सरा ॥ १०३ ॥ कालभैरव पदाखालीं । होता शतघ्न देहबली । त्यासहित चंद्रमौळी । वंदिला सकलांनीं ॥ १०४ ॥ शतघ्नाचा सैन्यभार । कढोनि धांवे भैरवावर । भूतगणासी आज्ञा सत्वर । खा म्हणोनि केली भैरवें ॥ १०५ ॥ वेताल कपाल डाकिणी । कूष्मांड श्येन शाकिनी । क्षेत्रपाल चामुंड जखिणी । जमले सगळे भूतगण ॥ १०५ ॥ चहुं बाजोनि समरांगणावर । थडकले सर्व भूतवर । त्यानीं असुरसैन्य करोनि चूर । सकल रक्त प्राशिलें ॥ १०७ ॥ दैत्यांचें रक्त पिवोन । ते पराक्रमी भूतगण । भैरवासि म्हणती स्वामिन् । प्रसन्न आम्ही तुजवरी ॥ १०८ ॥ असेल तुझिया मनांत । तो वर मागें त्वरित । ऐकोनि हांसे जगन्नाथ । परी मनीं विचार करी ॥ १०९ ॥ प्राणी अनंत पापें करिती । पिशाच्चें होती जन्मांतीं । त्यांसी मिळावी उत्तम गती । ऐसा विचारी मनीं शिव ॥ ११० ॥ मग

म्हणे अहो भतगण । मजसी हें द्या वरदान । माझिये आज्ञेचें उल्लंघन । दुष्ट भूतगण करितील जे ॥ १११ ॥ त्यांसी तुम्ही बांधावें । मजजवळी आणावें । सर्व ये स्थलीं मुक्त पावावे । तृप्त व्हावे मोक्षश्राद्धें ॥ ११२ ॥ दूध गहूं गूळ मूग । तूप युक्त असावे हविर्भाग । तरीच मोक्ष श्राद्ध चांग । होईल तें ॥११३॥ श्राद्धामध्यें पाक क्रिया । न मिळे जरी उत्तम खाया । गो ब्राह्मण भूत गणाया । तरी तें श्राद्ध व्यर्थचि ॥ ११४ ॥ जरी ठाउकें नसेल नाम । कुल गोत्र ग्राम । तरी मोक्ष श्राद्ध गतिद परम । पावतें भैरव आज्ञेनें ॥ ११५ ॥ प्रदक्षिणा अर्घ्य स्वस्ति शब्द । दक्षिणा गोत्र आशिर्वाद । स्वागत पितृकर्म संबंध । सव्यानेंच करावीं येथें ॥ ११६ ॥ श्राद्धशेष न भक्षावें । श्राद्धांतीं स्नान करावें । पितर गतीस पोहोंचवावे । माझिये आज्ञें ॥ ११७ ॥ श्रीभैरव परमात्मा । ऐसा वर मागी उत्तमा । भूतगण म्हणती पुरुषोत्तमा । सत्य सत्य त्रिवार ॥ ११८ ॥ चंद्र सूर्य साक्षी ठेऊन । आम्ही दिलें वरदान । ऐसें आदरें बोलोन । नृत्य करिती उत्साहें

॥ ११९ ॥ डमरू वाद्य वाजविती । कोणी दीर्घ स्वरें गाती । कालभैरवासी अभिषेकिती । प्रेमाश्रूनें सर्वही ॥ १२० ॥ नभीं दुंदुंभी वाजली । देवांनीं पुष्पवृष्टी केली । आनंदवृत्ती जहाली । सर्व जनांची ॥ १२१ ॥ शौनकादिकांसी सूत । नैमिष्यारण्यीं कथा सांगत । शतघ्न वधांतरीं येथ । त्रिनेत्र वसे सर्वदा ॥ १२२ ॥ हा भैरव-पिशाच्चसंवाद । वाचा ऐका स्मरा गोविंद । मग न बाधे भूत समंध । हरीहरलीलामृत पानीं ॥ १२३ ॥ श्रीहरीहरेश्वरलीलामृत । वाचितां ऐकितां शाश्वत । ऐश्वर्य लाभेल सर्वांप्रत । अंतीं मोक्ष भैरवकृपें ॥ १२४ ॥ कार्तीक मास कृष्णाष्टम । ते दिनीं कालभैरव जन्म । मह्रा यात्रा अनुपम । हरिहरपर्वतीं भरतसे ॥ १२५ ॥ हें श्रीकालभैरवाख्यान । वाचितां प्राप्त कल्याण । संतती संपत्ती आयुष्यवर्धन । होईल हनन भवरोगाचें ॥१२६॥ श्रीहरिहरेश्वरलीलामृत । श्रीस्वामी समर्थ सांगत । आदरें परिसोत संत । नवमोऽध्याय गोड हा ॥ १२७ ॥

॥ श्रीगुरुदेवदत्त अवधूत ॥

## अध्याय १० वा.

श्रीगणेशाय नमः। भक्तानुग्रही श्रीकैलासनाथ। भैरवरूप धरोनि समर्थ। दुष्टहनन नाम सार्थ। केलें जगज्जीवनें ॥ १ ॥ श्रीकालभैरवस्तुती। गंधर्व सिद्ध मुनी करिती। लिहितों लघु स्तोत्र प्राकृतीं। श्रीस्वामीसमर्थआज्ञेनें ॥ २ ॥ जय जगदीशा जगत्पते। जय मंगल मंगलमूर्ते। हरिसी सकल भवरोगांतें। स्मरणमात्रें स्वामिया ॥ ३ ॥ विश्वव्यापी विश्वपाल। हस्तीं धरोनियां त्रिशूल। हरीसी दुष्टांचें बल। क्षणमात्रें करोनियां ॥ ४ ॥ तुज सदा असो नमन। भूताधार दयाघन। अष्टमूर्ती हास्यवदन। कालाचाही काल तूं ॥ ५ ॥ तूं प्रमुख सकल देवांत। पार पाडिसी भवदुःख अनंत। सकल दिक्पाळ तव कक्षांत। वर्तती तव आज्ञेनें ॥ ६ ॥ नष्ट करोनि भक्तापदा। त्यासी देसी मुक्तीसंपदा। हे सच्चिदानंदकंदा। शिवगोविंदा विश्वपते ॥ ७ ॥ शास्त्र वेदमार्ग प्रगटविसी। महाशब्दांचा अर्थ दाविसी। चंद्र मंगळ मस्तकीं धरिसी। तुझा महिमा अगमागम ॥ ८ ॥ जय

विद्यापते विराटरूपा । नामानामातीता रूपारूपा । धांवोनियां मायबापा । रक्षीं आम्हां सर्वस्वें ॥ ९ ॥ सत्वांशें तूं विष्णू देव । रजांशें सृष्टीकर्ता ब्रह्मदेव । तमांशें रुद्र महादेव । उत्पत्तीस्थितिलयकर्ता तूं ॥१०॥ सूर्य चंद्रादि ग्रह माला । नभीं चमकण्या तव हुकुम झाला । तोंपासून अनंत काला-। पर्यंत तळपतील तेजांशें ॥ ११ ॥ देवाधिदेवा अनंत-नयन । अनंत नाम अनंत वदन । तव अनंत महिमान । वर्णितां थकले सुरासुर ॥ १२ ॥ तेथें बापुडें दीन वदन । काय करील हें लेखन । परी समर्थाज्ञा शिरीं धरोन । लिहीतों जरी अज्ञानी ॥ १३ ॥ जयजयाजी श्रीहरिहर । तूं नानावतारी श्रीधर । तुझें रूप गुण अगोचर । महिमा न कळे कोणाही ॥ १४ ॥ सुरवर करोनि नमन । संबोखिती भैरव दयाघन । म्हणती तव गुणवर्णन । कैसें करावें नाकळे ॥ १५ ॥ देवाधि देव झाले प्रसन्न । म्हणती मागा वरदान । येरू म्हणती करुणाघन । आपण वसावें येच क्षेत्रीं ॥ १६ ॥ प्रसन्न श्रीकालभैरव । म्हणे हरीहर दिशा पूर्व । सोमदिशे मुख उर्ध्व । करोनि वसेन त्या

स्थानीं ॥ १७ ॥ जोगेश्वरी सह सर्वत्र । माझा वास अंश मात्र । परी ये जागीं पवित्र । पूर्णांशानें वसेन मी ॥ १८ ॥ रविवारीं वा मंगळवारीं । यात्रा करितील नर-नारी । अष्टमीस माझें स्मरण करी । त्यासि विघ्न बाधा होऊं न शके ॥ १९ ॥ विदेशि राहोनिही हें स्तोत्र । वाचिती ऐकती पवित्र । तया दुःख दारिद्र अणुमात्र । नाहींच म्हणोनि जाणावें ॥ २० ॥ अणि-मादि अष्टसिद्धी । साधतील तया नवनिधी । पिशाच्चबाधा कदा न बाधी । ग्रंथवाचनपूजनें ॥ २१ ॥ जो मी ॐकार स्थित । तोचि प्रगटलों पुण्यक्षेत्रांत । रक्षावया सज्जन संत । दुष्टहनन करावया ॥ २२ ॥ ऐसें श्रीधर बोलोन । उभा ठाकला सुहास्यवदन । क्षेत्रज्ञ संत सज्जन । देखती भक्ती-नेत्रें ॥ २३ ॥ मुनिश्वर अगस्ती । महालिंग स्थापिती । विधि हरीहर चवथी । आदिमाया प्रगटली ॥ २४ ॥ शिव म्हणे मीच भैरव । भक्तकाजा केली माव । भक्तांकरितांचि नांव । रूपहि धरिलें भयंकर ॥ २५ ॥ करावी भैरवपूजा । मग व्हावी शिवलिंग पूजा ।

तदनंतर पुनः पुजा । भैरवाचीच करावी ॥ २६ ॥ यात्रा-
प्रसंगीं हेचि काज । सदा श्रीकालभैरव पूज । माझेंचि
हें जाणिजे काज । ऐसें सदाशिव बोलिला ॥ २७ ॥
भैरवाची करितां भक्ती । तत्पदीं धरितां आसक्ती । मग
ऋद्धीसिद्धी मुक्ती । दासी होवोनि उभ्या पुढें ॥ २८ ॥
ऐसी श्रीकालभैरवलीला । ऐकोनि मुनिवर आनं-
दला । सूत सांगे शौनकाला । नैमिष्यारण्य आनंदवनीं
॥ २९ ॥ शौनकादि प्रश्न करिती । सद्गुरो आम्हावरती ।
कृपा करोनियां कथामृतीं । पूर्णपणें बुडवावें ॥ ३० ॥ श्रीहरि-
हर पर्वत । त्याचें दिव्यनामामृत । पाजी आम्हांसि त्वरित ।
मायसी होई बाळांसी ॥ ३१ ॥ संतोषें डोले श्रीस्वामी
समर्थ । म्हणे ऐका नामाष्टकार्थ । भावें ऐकतां स्वार्थ ।
परमार्थ हि साधतसे ॥ ३२ ॥ हरिहरासी साम्य पावला ।
या स्थलीं म्हणोनि पर्वताला । देती त्याच नामाभिधा-
नाला । भक्त भाविक बुधजन ॥ ३३ ॥ श्रीहरी हा
भर्ता । हर संहारकर्ता । म्हणोनि या दिव्य पर्वता । निरा-
कारहि म्हणती जन ॥ ३४ ॥ कोणी पूर्ण ज्ञानमूर्ती

वदत । कोणी त्रिशिरा म्हणतात । कोणीं रवीचा पर्वत । म्हणोनी नमस्कारिती ॥३५॥ कोणी नाम देती शिवाद्री । कोणी वदती हर्षणाद्री । कोणी ब्रम्हाद्री करुणाद्री । नाम देती या क्षेत्रां ॥ ३६ ॥ कोणी म्हणती विष्णुगिरी । कोणी वदती आनंदगिरी । अर्थाची घ्यावया माधुरी । प्रत्यक्ष दर्शन घ्यावें हो ॥ ३७ ॥ कोणीं म्हणती करुणाचल । येथें राहिला शिवदयाल । मुक्त जाहली तात्काल । शापापासोनि गायत्री ॥ ३८ ॥ कोणीं म्हणती पुष्पपर्वत । कीं धारणा एकाग्रस्थित । कीं पुष्पसुगंधें श्रम हारित । म्हणोनि पुष्पाद्री नाम पावला ॥ ३९ ॥ कीं पोषण पुष्टी देणारा । कीं सुमन इंद्रियनिग्रह खरा । कीं विचार सारासारा । पुष्प नाम पावला तेवीं ॥ ४० ॥ कीं झालिया कल्पांत । जलमय होईल जगत । परि हा तरेल पुष्पवंत । म्हणोनि म्हणती पुष्पाद्री ॥ ४१ ॥ ऐश्या प्रकारें हरिहर पर्वत । पावला अनेक नामांप्रत । जैसे सद्भक्तांचें मनोरथ । ईश रहाटी तेचि परी ॥ ४२ ॥ भगवद्गीतीं मधुर वचन ।

बोलिला राजीवलोचन । जे रीतीं मज भजती जन । तैसेंचि फळ पावती ते ॥ ४३ ॥ जमाखर्चाची मेळवणी । हिशेब पहावा बुधजनीं । महत्भाग्यें एका जनार्दनीं । येच रितीं मेळविला ॥ ४४ ॥ असो हे नामाष्टक । परम पवित्र पुण्यकारक । वाचितां ऐकितां धारितां विवेक । प्राप्त आयुरारोग्य ऐश्वर्य ॥ ४५ ॥ शौनकादी ऋषी वदती । अमृत पाजिलें आम्हां प्रती । सद्गुरु दयामूर्ती शंका निवृत्ती करावी ॥ ४६ ॥ पूर्वी गौतम महामुनी । गोहत्या पापापासुनी । येथें मुक्त झाला ये वचनीं । आम्हीं ऐकिलें आपुले मुखें ॥ ४८ ॥ महातपस्वी गौतम । महान्यायीं वेदोत्तम । गोहत्या पाप परम । तयें कैसें केलें हो ॥ ४९ ॥ सांगा वर्णन मुळींहुनी । झाला मुक्त कोण उपायांनीं । आपण गुरुजनीं । साद्यंत निवेदिलें पाहिजे ॥ ५० ॥ सूतासी अत्यंत संतोष । म्हणे या भूमीवरी साठवर्ष । झाला बहुत लोकनाश । अनावृष्टि होवोनि ॥ ५१ ॥ लुटारूंनीं देश गांजिला । लोक बहु कासाविस झाला । औषधी लताग्राम जळोनि गेला । भस्म झाला मुळीं-

ना.

हुनी॥५२॥जपतप योग याग। कोणी न करिती यथासांग। ऋषी मुनी महाभाग। वरुषें काढिती दीनापरी ॥५३॥ पुढें सकल पौरवजनीं। विचार केला एकत्र जमुनी। दीर्घ-तपा गौतममुनीं। पोषण करील प्रजेचें ॥ ५४ ॥ सकल ऋषी कुटुंब सहित। पातले गौतमआश्रमाप्रत। गौतमें अर्घ्यपाद्यें यथास्थित। पूजा केली तयांची ॥५५॥ सकलांसि अर्पोनि भोजन। गौतम विचारी कुशल प्रश्न। साधो या स्थलीं कोठून। येणें जहालें आपुलें॥५६॥ काय कामानिमित्त। येणें येथ जाहलें प्राप्त। बोलती सकल ऋषी संत। दीन वदनें मुनीसी॥५७॥देशांत घोर अवर्षण।नष्ट झालें धनधान्य। लुटारूंनीं पृथ्वीस गांजून। कहर असे मांडिला ॥ ५८ ॥ बहु दिन चालविलें तप। संपूर्ण व्हावें निष्पाप। म्हणोनि मायबाप। रक्षीं आम्हां सर्वस्वें ॥५९॥ तेव्हां कृपाळू गौतम। म्हणे धन्य झाला हा आश्रम। घडला मज संतसमागम। भाग्य चालोनि आलें घरा ॥ ६० ॥ संग्रहीं पाहिजे बहुत पुण्य। तेव्हां भेटतील संतजन। पुण्याईचें फल बिलक्षण। संत महंत संग घडणें

॥ ६१ ॥ तरी दयाळुवा येथेंचि रहावें । इष्ट पाहिजे तें घेत जावें । तपसामर्थ्यें आनंदवावें । आश्रमजीवन ॥ ६२ ॥ ऋषी गौतम अती उदार । तपयोगें अन्न पुरविणार । त्याचे आश्रमीं सर्व मुनिवर । सुखें राहिले कलत्र सहित ॥ ६३ ॥ जैसें द्यावें तैसें घ्यावें । जमाखर्च पंढरी नावें । या महावाक्यासि बरवें । ठेवावें ध्यानीं श्रोते हो ॥ ६४ ॥ भूतदयेनें प्रेरित होवोन । अभय वचन देवोन । सत्पात्रीं करितां अन्नदान । जनार्दन संतुष्ट ॥ ६५ ॥ न पहावा पंक्तीप्रपंच । ब्राह्मण असोवा शुद्र साच । जाहला पीडित त्यासच । अन्न प्रथम द्यावें हो ॥ ६६ ॥ आपण जेवणें तदनंतर । वैश्वदेवाचें हेंचि सार । हृदयीं ठेवावें निरंतर । गृहस्थाश्रमवासियानीं ॥ ६७ ॥ बहुतांचें सुख बहुत । सर्वांशीं पहावा श्रीमदनंत । हाचि धर्म भागवत । उपदेशिला एका जनार्दनें ॥ ६८ ॥ श्रीमद्भगवत्गीता । हेंचि सांगे तत्वता । धर्मक्षेत्रीं विजय बुडतां । कर्माकर्म संशयार्णवीं ॥ ६९ ॥ असो गौतमें दिला आश्रय तपा । म्हणुनि तया म्हणती

दीर्घतपा । तया घरीं हविक्रिया बापा । योग्य रीतीनें सदा चाले ॥ ७० ॥ पुढें संतोषोनि मेघराज । करी भूवरी वृष्टी सहज । आला पशुपक्षांदिकांसी माज । धान्यें विपुल झालीं म्हणोनियां ॥ ७१ ॥ रसयुक्त औषधी जीवन्नली । पुष्पाफलांची लयलूट लागली । जनवृत्ती आनंदली । मृग सुखें चरूं लागले ॥ ७२ ॥ तेव्हां ते मुनिजन । परतण्याविषयीं उत्सुक होवोन । घेवों पहाती निरोप जाण । गौतम महामुनीचा ॥ ७३ ॥ गौतमाग्रह वाढे आदर । ऋषींचें केलें निवारण थोर । ऋषी विस्मित झाले फार । कष्टी होती अंतरीं ॥ ७४ ॥ गौतम आज्ञा नाहीं देत । म्हणोनि एकत्र केली मसलत । दर्भ धेनू वत्सा सहित । निर्मिली तपःसामर्थ्यें ॥ ७५ ॥ मायावती गाय । गौतम शेतीं चरोनि खाय । मुनीनें दर्भ टाकिताचि हाय । गतप्राण जहाली ॥ ७६ ॥ ऋषींनीं तें पाहोन । म्हणती हा गोहनन । याचे घरीं अन्न । घेऊं नये साधूनें ॥ ७७ ॥ तो वदे पापाचा शमावा दाह । येतदर्थ मज करा अनुग्रह । होतां अनिष्ट सकल ग्रह । साधूसंतकृपें

मुक्ती मिळे ॥ ७८ ॥ तुम्हीं माझे माय बाप । नष्ट करा गोवधपाप । ऋषी वदती तूंचि बाप । मायसा होवोनि पोशिलेंसी ॥ ७९ ॥ आम्हीं न जाणों उपाय । करी जें तुज योग्य होय । गोवध महापाप भय । आम्हां अशक्य निवारण्या ॥ ८० ॥ ऐसें म्हणुनी मुनिश्वर । कलत्र घेवोनि सत्वर । चालूं लागले मार्ग । आपुल्या स्वस्थलाचा ॥ ८१ ॥ पुण्य असो वा पाप किती । कृतघ्नांची हीच रीती । अती तेथें जाण माती । चित्तीं सदा ठेवावें ॥८२॥ भयभीत झाला गौतम जाण । पंचनदांत करोनि स्नान । घेतलें पातालेश्वराचें दर्शन । निष्पाप व्हावया ॥ ८३ ॥ दाल्भेशाहुनी सावित्री । वाहे पापनाशिनी पवित्री । सकलां सदा सुखदात्री । तिज जवळी जाई गौतम मुनी ॥ ८४ ॥ जों करी तिज अवलोकन । तों प्रगटला भैरव दयाघन । विनोदें वदे हास्यवदन । येथें पापी प्रवेशूं न शके ॥ ८५ ॥ हें पापहारी क्षेत्र । विश्वकर्में निर्मिलें पवित्र । याचे भोक्ते संत । पाप्यांसी योग्य न हें स्थान ॥ ८६ ॥ गौतम मुनी दीन-

वदन । श्रीकालभैरवा करी वंदन । म्हणे मत्पाप नसे स्वेच्छपूर्ण । कालकर्ता मम पातकाचा ॥ ८७ ॥ ब्रम्हा-पासोनि स्थावरपर्यंत । कालवशत सर्व जगत । मी जाणें हीच मात । कालकर्ता सकलांसी ॥ ८८ ॥ परी ही त्रिपदी माता । पवित्र चरण स्पर्शण्या आतां । मी झालों प्राप्त तत्वतां । शरण तुज संरक्षी मज ॥ ८९ ॥ शिव मज देईल दर्शन । ऐसा करी उपदेश गहन । श्रीकाल-भैरव दयाघन । कृपा करोनि बालकावरी ॥ ९० ॥ हांसोनि म्हणे भैरव । कैसा भ्रांत झाला तव भाव । शुद्ध असतां तव नांव । आचरणहि शुद्ध तुझें ॥ ९१ ॥ धरोनि खोटा अभिमान । करिसी प्रायश्चित्त याचन । तूं श्रेयस्कामाचा गुरु जाण । दुर्लभ देवादिकांसी ॥ ९२ ॥ परिसोनि कालभैरववचन । गौतमा अंतरीं पटली खूण । सकळ इंद्रियें आवरोन । समाधी साधिली अंतरीं ॥ ९३ ॥ लावोनी समाधी गौतमासी । सागराजवळीं सोडिलें तयासी मग गुप्त झाला श्रीहरिहरवासी । कालभैरव कृपाळू ॥ ९४ ॥ स्वस्थ होवोनि मुनिश्वर । शांत लोचन उघडी सत्वर ।

पुढें देखे दिव्य गिरिवर । सांप्रत हरेश्वर म्हणती जया ॥ ९५ ॥ श्रीहरिहरेश्वर पर्वत । निराकार निर्गुण शांत । व्हावया प्रसन्न अपर्णाकांत । गौतम करी महातप ॥ ९६ ॥ यथाविधी कुंडें खणोन । करी शिवस्वरूप ध्यान । घेत राहिला शिव दर्शन । अंतर्बाह्य तल्लीन शिवरूपीं ॥ ९७॥ जें असुनी इंद्रिय प्रकाशकु । अलिप्त राहे सकौतुक । सकलाधार असुनीं धाक । ज्याचा सकल वाहती ॥ ९८ ॥ गुणमय गुणातीत । भावनामय भावातीत । तेंचि शिव स्वरूप शाश्वत । हृदयीं ठेवीं गौतममुनी ॥ ९९ ॥ जयाचें मस्तक आकाश । भुजा लोकपालेश । सुगंध वायू ज्याचा श्वास । पृथ्वी पद जयाचें ॥ १०० ॥ अग्नीचंद्र भास्कर । हे जयाचे त्रयनेत्र । जयाचे कर्ण दिशा पवित्र । आकाश हृदय जयाचें ॥ १०१ ॥ उपस्थ जयाचा समुद्र । नक्षत्रें जयाचीं रोमरंध्र । इंद्रियें म्हणजे देवेंद्र । अग्नी मुख जयाचें ॥ १०२ ॥ ऐसा विश्वव्यापी परमेश्वर । कृपाळू श्रीहरिहरेश्वर । त्यासि माझा नमस्कार । साष्टांगीं सर्वदा ॥ १०३ ॥ ऐसा परमपुरुष । गौतमें देखिला गिरीश ।

अध्याय वाचितां अहर्निश । परमानंद प्राप्त त्यासी ॥ १०४ ॥
त्यासी नव्हे पुनर्जन्म । श्रवण कीर्तनें मोक्ष परम । बौद्धीक
सुखानंद धाम । प्राप्त होई पारायण प्रदक्षिणें ॥ १०५ ॥
श्रीहरिहरलीलामृतासी । सूत सांगे शौनकादिकांसी । सं
श्रोते मिळाले प्रेमरसीं । रंग कीर्तनीं चढलासे ॥ १०६ ॥
श्रीहरिहर नामाचा गजर । हरीहरस्मरण वारंवार । करो
सकल नारीनर । हेंचि माझें मागणें ॥ १०७ ॥ श्रीहरि
हरेश्वर लीलामृत । श्रीस्वामी समर्थ सांगत । ऐकत
प्रेमें सज्जन संत । दशमोऽध्याय गोड हा ॥ १०८ ॥

॥ श्रीगुरुदेवदत्त अवधूत ॥

## अध्याय ११ वा.

श्रीगणेशाय नमः । ॐनमः सिद्धं । श्रीगुरुदेवताभ्यो नमः
श्रीकुलदेवताभ्यो नमः श्रीस्थानदेवताभ्यो नमः श्रीग्रामदेता-
भ्यो नमः श्रीमातापितृभ्यो नमः श्रीहरिहरेश्वरलीलामृत ।
दशमाध्यायापर्यंत । सद्गुरूंनीं कथिलें विस्तृत । गुणी जन
श्रोतीं ऐकिलें ॥ १ ॥ हृदयीं स्फुरोनि जगन्नाथ । माझीये

मस्तकीं वरदहस्त । ठेवोनि लीहवि तें समस्त । वाचोत आदरें संतजन ॥ २ ॥ पाहोनि गौतमाचा शुद्ध भाव । श्री हरीहर कालभैरव । देती तयासी तपवैभव । तेजोद्भव अधिक देखा ॥ ३ ॥ श्रीहरीहरलीलाकीर्तन । करूं या आतां सिंहावलोकन । शास्त्राधारें अवतराणिका गान । केलें पाहिजे कळसाशाध्यायीं ॥ ४ ॥ प्रथमाध्यायीं मंगलाचरण । प्रेमें केलें शांताध्यान । मांगिरीश माता पिता गुरुजन । संत श्रोत्यांही वंदिलें ॥ ५ ॥ दुसऱ्याध्यायीं महाख्यान । महाबल दैत्य केला पावन । महाबलेश्वर लिंग निर्मोन । सुखविलें सद्भक्तांसी ॥ ६ ॥ पवित्र तिसरा अध्याय । झाला श्रीहरीहरोदय । गायत्री सावित्री महामाय । ब्रम्हयागमहिमा वर्णिला ॥ ७ ॥ सकल तीर्थ महिमा वर्णन । चवथ्यांत केलें संपूर्ण । अध्यायीं देतां पूर्णावधान । तीर्थस्नानसम पुण्यप्राप्ती ॥ ८ ॥ पांचव्यांत पुनरावृत्ति । कुलदेवीची केली स्तुती । जे काव्यदेवता महासरस्वती । कवित्वभिक्षा मागितली ॥ ९ ॥ भावीक बाल बालि-

कांसी । सहाव्यांत वंदिलें आदरेंसी । ब्रह्मचारी प्रथमाश्रमासी । साद्यंत वर्णिलें असे ॥ १० ॥ सातवा अध्याय उत्तम । कथियेला गृहस्थाश्रम । आठव्यांत पूर्ण यतिधर्म । आठवा वंदोनि कथियेला ॥११॥ नववा अध्याय सुंदर । प्रसन्न होवोनि हरिहर । धरोनि भैरवावतार । शतघ्नासुर मारिला ॥ १२ ॥ दहाव्या अध्यायीं श्रीभैरव । करिती विनोद अभिनव । गौतमासि देवोनि तप वैभव । सुखी केला तात्काळीं ॥ १३ ॥ अकराव्या अध्यायीं समर्थ । नामधारकाकरवीं लिहवित । श्रीहरिहरेश्वरलीलामृत । अवतरणिका सुप्रसिद्ध ॥१४॥ संतसज्जन हृदयकमल । पुलकित व्हाया हें ग्रंथदल । कीं शब्दरूपीं सुगंधपरिमल । हृदयाकाशीं कोंदिला ॥ १५ ॥ सर्व धर्मांचें सार । एक श्रीहरिहरेश्वर । त्यजोनि काम मदमत्सर । जनार्दन वोळखी जनस्वरूपीं ॥ १६ ॥ श्रीहरिहरेश्वरलीलामृत । कृपा करोनि स्वामी समर्थ । संपूर्ण केला ग्रंथ । परोपकारा कारणें ॥ १७ ॥ सर्वाभूतीं एक तत्व । ऐसें बोधिला बोधिसत्व । परी शास्त्रा-

धारें कुलगोत्र । नामोच्चारिलें पाहिजे ॥ १८ ॥ गोमांतक मूळ नगर । कुवलय मंगेशी संस्थानें सुंदर । तेथें पार्वती परमेश्वर । स्वेच्छें करोनि नांदती ॥ १९ ॥ स्वीकारोनि शांता नाम । महामाया वसे उत्तम । तें कवळें नामक ग्राम । गोमंतकीं शोभत ॥ २० ॥ तेथोनि थोड्या अंतरावर । बांधिवडें नाम येर । श्रीमहालक्ष्मी स्थान सुंदर । ती पालवी आमुच्या कुला ॥ २१ ॥ पुढें श्रीमंगेशी स्थान । जेथें श्रीसांब त्रिनयन । तारावया भक्तजन । नांदतसे संस्थानीं ॥ २२ ॥ या आमुच्या कुलदेवता । राखोत कुलासी प्रेमरतां । सुप्रसन्नें सायुज्यता । देवोत कुलासी ॥ २३ ॥ उपनाम वर्दे कुलांत । वत्स गोत्रज सारस्वत । ज्याचें नाम यशवंत । भगवद्भक्त गोसखा ॥ २४ ॥ तयाचा दत्तक सुत । नाम तयाचें श्रीरघुनाथ । तो या देहाचा तात । भगवद्गीता प्रिय ज्यासी ॥ २५ ॥ कौंडिण्य गोत्रज भाई । धुमे कुलवंशजपाही । तत्कन्या श्यामबाई । विद्यादात्री तीच मज ॥ २६ ॥ तिचें नाम सावित्री । ती आमची जन्मदात्री । जिनें झटोनि अहो रात्रीं । आम्हांकरितां कष्ट सो-

शिले॥२७॥ मज गाईस दिलें दान । म्हणोनि तीही माते-
समान । सावित्री गायत्री महिमान । निधान मज लाभलें
॥ २८ ॥ सद्गुरू श्रीस्वामी समर्थ । आत्मानंद सरस्वती
सार्थ । कुलाचार्य श्रीदिनानाथ । वत्स गोत्रज देऊळकर
॥ २९ ॥ माता पिता गुरुधनी । एकरूप श्रीदत्तात्रेयमुनी ।
सद्भावें । यांसी नमुनी । कालक्रमण करितसे ॥ ३० ॥
जन्मनाम यशवंत । उगीच अभिमान अशाश्वत । जीवा-
धार श्रीगुरुनाथ । सत्यशाश्वत तोचि कर्ता ॥ ३१ ॥
सकल साधू संतवर । पुनः पुनः त्यां नमस्कार । हरि-
हरेश्वर यात्रा चार । सद्भावें ऐकिजे भक्तजनीं ॥ ३२ ॥
मुंबापुरी प्रसिद्ध नगर । मोठे व्यापारी बंदर । तेथोनि
निघतां तास चार । लागती क्षेत्रीं जावया ॥३३॥ बाष्प-
नौका प्रभातकालीं । जयगडावरी जाणेवाली । तींत बैसोनि
भक्त मंडळी । जाती क्षेत्रयात्रेसी ॥ ३४ ॥ बाणकोट गडा-
समोर । बंदर हरिहरेश्वर । तेथोनि थोड्या अंतरावर ।
डोंगर हरीहरेशाचा ॥ ३५ ॥ श्रीभैरवचरणधुळीं ।
प्रथम लावावी कपाळीं । पांच प्रदक्षिणा घाली । भैरव

भैरवीसी ॥ ३६ ॥ समोर शिवालय थोर । त्यांत चहुं लिंगें थोर । ब्रह्मा विष्णु महेश्वर । चवथें स्थापिलें पार्वती नामें ॥ ३७ ॥ नमा शिव पंचायतन । नंदी आणि श्रीगजानन । मग प्रेमें घाली प्रदक्षण । सोमसूत्री अभंग ॥ ३८ ॥ पुनः यावें भैरवापासी । समोर बसावें सेवेंसी । स्पर्श करी गोपाउलासी । प्रत्यक्ष पुढें उमटले दिसे ॥ ३९ ॥ भैरव जोगेश्वरीस नमस्कार । पुनः पुनः घाली साचार । मग सुखें यात्रा कर । श्रीहरिहरेश्वर क्षेत्रीं ॥ ४० ॥ घाली पर्वत प्रदक्षिणा । शुक्रतीर्थी स्नान दाना । अगस्ती आश्रमासी नमना । करावें क्षेत्रवासीयांनीं ॥ ४१ ॥ कार्तिक मासीं कृष्णाष्टमी । तेचि भैरव जन्माष्टमी । या दिनीं यात्रा नामी । होत पुण्य क्षेत्रांत ॥ ४२ ॥ जय जगदीश्वरा जयेशा । जगज्जीवना जीवेशा । जाश्वनीला पुराणपुरुषा । पाहें मज कृपादृष्टीं ॥ ४३ ॥ मत्स्य कच्छ वराह । उग्र रूप नारसिंह । तुंवां उतरिला बलीचा मोह । वामनरूप घेउनी ॥ ४४ ॥ परशुराम श्रीराम । श्रीकृष्ण परम धाम । तूंचि

बुद्ध गौतम । तूंचि कलंकी अवतारी ॥ ४५ ॥ तूंचि श्रीगुरुदेवदत्त । तूं जगताचें परमतत्व । तूंचि श्रीस्वामी समर्थ । अक्कलकोटीं नांदसी ॥ ४६ ॥ तुझें गावया गुण प्रीती । मज दिधलीस काव्यगती । तूं सदय कारुण्यमूर्ती । सद्भक्तांसी रक्षिसी सप्रेमें ॥ ४७ ॥ श्रोतीं परिसिला हा ग्रंथ । पूर्वी कोणीं केला विस्तृत । आतां परिसिजे सावचित्त । साद्यंत वर्णितसे ॥ ४८ ॥ मूल ग्रंथ सटीक संस्कृत । बाळकृष्ण अनंत विरचित । वाचोनि हृदयीं स्फुरण होत । व्हावें कवित ओंवीबद्ध ॥ ४९ ॥ कवित्व स्फुरतां हृदयकमळीं । स्तविला सदाशिव चंद्रमौळी । मग भैरवपदयुगुलीं । प्रसादकळी लाविली ॥ ५० ॥ उत्तम जाहला सुप्रसाद । हृदयीं नमावें आनंद । परी तेथें नव्हती सिद्ध । लेखनसामग्री पुरेशी ॥ ५१ ॥ शके अठराशें सत्तेचाळीस । धातूनाम संवत्सरास । माघशुक्ल अष्टमीस । प्रथम प्रसाद पावला ॥ ५२ ॥ यात्रा होवोनि मुंबईत । पुनः परतलों भजन करित । मानसीं इच्छा कीं त्वरित । लेखन सुरु व्हावें ही ॥ ५३ ॥ गुर्वाज्ञांकित अंतःकरण ।

परी सेवाधर्म महा कठिण । माध्यान्ह समयाची आठवण । लेखन सुचूं देईना ॥५४॥ ऐसा गेला थोडा काल। मग पातली शुभ वेळ । हृदयीं ध्यावोनि जाश्वनीळा । ग्रंथलेखन आरंभिलें ॥ ५५ ॥ महामाया विधि हरिहर । श्रीस्वामी समर्थ सद्गुरुवर । यांचा केला जयजयकार । गुरुवार होता त्या दिनीं ॥ ५६ ॥ कृष्ण षष्ठी माघ मास। पवित्र ब्राम्ह मुहूर्तास । प्रारंभ केला लेखनास । हृदयीं स्मरोनि गुरुपदातें ॥ ५७ ॥ मातापिता गुरुजन । कवि श्रेष्ठ संत सज्जन । यांसी चित्तीं करोनि वंदन । प्रेमें लेखन आरंभिलें ॥ ५८ ॥ शके अठराशें अठ्ठेचाळिस । चातुर्मासांत प्रथम मास । श्रावण कृष्णाष्टमी खास । पूर्ण झाला शुभदिनीं ॥ ५९ ॥ कृष्णाष्टमी कालाष्टमी । कोणी म्हणे जन्माष्टमी । माध्यान्हीं आला सहस्ररश्मी । तेव्हां ग्रंथपूर्ती जाहली ॥ ६० ॥ शुभदिन सोमवार । त्यांत रोहिणी नक्षत्र । अमृत योग पवित्र । प्राप्त झाला गुरुकृपें ॥ ६१ ॥ वृषभस्थ उच्च चंद्र । मीनस्थ प्रजापती इंद्र । एकादशस्थ बलभद्र । बृहस्पती सुरगुरु

॥ ६२ ॥ नवमस्थ सिंहेचा रवी । जो सकल ग्रहचक्रा हलवी । सकल मनोरथ पुरवी । भक्त जनांचे ॥ ६३ ॥ जो भागवत–धर्म–प्रस्थापक । कौरवांतक पांडवपालक । तो वासुदेव कालकारक । अवतार धरी ज्या दिनीं ॥ ६४ ॥ तोचि अत्यंत शुभ दिन । ज्या दिनीं प्रगटे दयाघन । ऐशा शुभलग्नीं संपूर्ण । ग्रंथ केला स्वामिरायें ॥ ६५ ॥ श्रीहरिहरेश्वरलीलामृत । संपूर्ण झाला ग्रंथ येथ । जय शिवशंकर उमानाथ । तुज प्रीत्यर्थ हो कां सदा ॥ ६६ ॥ हर ॐ हर हर हर । या नामाचा करा गजर । नादें कोंदो हृदयांबर । ॐ नमः शिवाय ॥ ६७ ॥ श्री हरिहरेश्वर लीलामृत । स्वामी समर्थ सांगत । आदरें परिसा संत । एकादशोऽध्याय गोड हा ॥ ६८ ॥ एकंदर ओंव्या १३४० ॥ शुभं भवतु ॥

श्रीगुरुदेव दत्त दिगंबर अवधूत श्रीपाद श्रीवल्लभ नरसिंह सरस्वती अक्कलकोटनिवासी सद्गुरू श्रीस्वामी समर्थ महाराज की जय ॥

REFBK-0003147
REFBK-0003147 

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः ॥

## आरती.

**चाल-**( आवडी गंगाजळें देवा न्हाणीलें, )

क्षेत्र राज श्रीहरीहरेश्वर ओंवाळूं चला ।
पंचप्राण पंचारती दीप उजळीला ॥ १ ॥
सोन्यासम हा सुदेह आपुला लावुनि गुरुचरणीं ।
हरि-हर-लीला जयजयकारें गाजवूं ही धरणी ॥ २ ॥
अनंत नामीं अनंत रूपीं प्रगटसी देवा ।
शेषभूषणा जोगेशरिशा कालभैरवा ॥ ३ ॥
जीव शिवातें ऐक्य पावण्या आरति ओंवाळी ।
यशवंताची विनती चरणीं भक्तां सांभाळीं ॥ ४ ॥

## ॥ प्रार्थना ॥

ाग-सारंग. चाल-हे प्रभु त्राता मंगलदाता॥

जय जय कालभैरव स्वामी दीन जनांचा कैवारी ॥
जय जगदंबा शांता दुर्गा महालक्ष्मि श्रीजोगेश्वरी ॥
हरिहरब्रह्मा एक होउनी पावन केली पुण्य भुमी ॥
अष्टोतर शत तीर्थें वसती नमस्कारितों तयांस मी ॥
ज्या साधूंच्या पुण्य प्रतापें प्रगट झाले श्रीभगवन् ॥
अगस्ती मुनिंना हात जोडुनी असो सर्वदा मन्नमन ॥
जय शिवशंकर नमामि शंकर स्वामि समर्था गुरुराया ॥
जय गोविंदा बाल मुकुंदा नमन असो तव मृदु पाया ॥
जय जय ब्रह्मा साधुजनांच्या हृदयकमळीं तूं वससी ॥
रघुनाथसुत यशवंताचा प्रणाम घ्यावा दिवसनिसीं ॥

## ॥ स्तुती ॥

काले वर्षतु पर्जन्या पृथ्वी सस्यशालिनी ।
देशोऽयं क्षोभरहितो ब्राह्मणः संतु निर्भयाः ।
अपुत्राः पुत्रिणाः संतु पुत्रिणः संतु पौत्रिणः ।
अधनाः सधनाः संतु जीवंतु शरदः शतम् ।
स्वामिन् सर्वे जनाः सुखिनो भवंतु ।
स्वामिन् सर्वे जनाः सुखिनो भवंतु ।
स्वामिन् सर्वे जनाः सुखिनो भवंतु । तथास्तु तथास्तु तथास्तु ।
। ॐ तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु ।
। शांतिःपुष्टिस्तुष्टिश्चास्तु ।

---

मुद्रकः—रा. रा. चिंतामण सखाराम देवळे,
मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीज्
होम, सँढर्स्ट रोड, गिरगांव-मुंबई.
प्रकाशकः—हिरानाथ रघुनाथ वर्दे,
रामराव दळवी यांचें घर ४ शेणवी गल्ली
कांदेवाडी मुंबई.